

साप्ताहिक

# माणूस

२७ ऑगस्ट ८३ | दोन रुपये





## तामिळ लिबरेशन टायगर्स विरुद्ध श्रीलंका

## १८५७ सावरकर आणि कार्ल मार्क्स

## गुप्त कारस्थानाचा शेवटचा पंचनामा

## इस्लामिक बॉम्ब

साप्ताहिक
**माणूस**

वर्ष : तेविसावे
अंक : तेरावा

२७ ऑगस्ट १९८३
किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
संजय पवार

# डॉ. वि. वि. तथा अप्पा पेंडसे

राजकीय क्षेत्रात नेतृत्व गवताऐसे उदंड वाढलेले आहे. युवक नेत्याची माळका लागलेली आहे; पण सांस्कृतिक, शैक्षणिक किंवा समाज-सेवा क्षेत्रात मात्र ते अभावानेच तळपत असते. चटकन डोळ्यासमोर येणारे नाव एखादेच. बाबा आमटे हा अपवाद. शेकडो तरुणाना बाबा आमटे यांनी प्रभावित केले व सेवा-विकास कार्याकडे आकृष्ट केले. असेच एक दुसरे नाव डॉ. वि. वि. तथा अप्पासाहेब पेंडसे यांचे. नुकतेच शुक्रवार १९ ऑगस्ट या दिवशी त्याचे निधन झाले. शेकडोच नव्हे अक्षरशः हजारो तरुणांना हे नाव, हे व्यक्तिमत्व प्रेरणा देऊन गेले. यापुढेही देत राहील. अगदी तटस्थपणे, पूर्वग्रह न बाळगता विचार केला तर असा युवक-संग्रह, अराजकीय क्षेत्रात आज कोणालाही साधलेला नाही. अप्पा पेंडसे यांनाच हे वैभव लाभलेले होते, नव्हे, त्यांनी ते स्वपराक्रमाने मिळवलेले होते. शेकडो-हजारो शैक्षणिक-सास्कृतिक सस्था आज अस्तित्वात आहेत; पण यातून बाहेर पडणारे युवक-युवती विशिष्ट ध्येय-वादाने भारलेले, प्रभावित झालेले आहेत असे दिसत नाही. अप्पा पेंडसे यांची ज्ञानप्रबोधिनी मात्र याला अपवाद आहे. या शिक्षणसंस्थेत व्यवहारोपयोगी ज्ञानविज्ञानाबरोबरच विशिष्ट संस्कार साधण्याचा, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विशिष्ट प्रकारे घडविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न होतो. अर्थातच हे संस्कार हिंदुत्ववादी आहेत. कारण श्री. अप्पा पेंडसे हे रा. स्व. संघाचे एकेकाळचे पूर्णवेळचे कार्यकर्ते होते व विवेकानंदांच्या आचार-विचारांचा त्यांच्यावर दाट परिणाम होता. या हिंदुत्ववादी पूर्वपिठिकेमुळे श्री. अप्पा पेंडसे याच्या कार्यावर, ते शास्त्रीय आहे की अशास्त्रीय आह हे न पाहता, अनेकदा टीकाही झाली; पण कार्य मात्र वाढतच गेले. प्रबोधिनीचा विस्तार झाला व गुणवत्ताही टिकून राहिली. सर्व शैक्षणिक-सांस्कृतिक क्षेत्रात आज ध्येयवादाचे दिवे मंदावले मालवलेले आहेत. भ्रष्टाचार न करता आहेत त्या संस्था पुढे चालवणारी माणसेही दुर्मिळ होत चालली आहेत. अशा वेळी अप्पा पेंडसे यानी मागे ठेवलेले ध्येयवादी तरूण कार्यकर्त्यांचे बळ कुणीही हेवा करावा असेच आहे. अप्पा पेंडसे याना हे बळ कसे लाभले ? त्यांनी हे बळ सतत वाढते-विस्तारते कसे ठेवले ? ही एक विद्याच म्हटली पाहिजे व ज्यांना सस्था चालवायच्या-वाढवायच्या आहेत त्यांनी पूर्वग्रह बाजूला ठेवून ही विद्या नीट आत्मसात करायला हवी. राजकीय नेतृत्वाची परंपरा पुढे चालविणे, औद्योगिक क्षेत्रातील सातत्य टिकवणे हे तुलनेने सोपे आहे. कारण मामला इष्टफलप्राप्तीचा असतो. सत्ता आणि संपत्ती याचे आकर्षण सार्वत्रिक असते; पण शैक्षणिक-सांस्कृतिक क्षेत्रात, समाजसेवेत असे दृश्य फळ कुठलेच नाही. झगमगाट नाही; प्रसिद्धी, पैसा किंवा मान-सन्मान नाहीत. तरीही युवकांना, प्रौढांना या क्षेत्राकडे कसे खेचून घ्यायचे ? कुठला तरी ध्येयवाद, कुठली तरी जबरदस्त

प्रेरणा असेल तरच हे उलटच्या प्रवाहातले पोहणे शक्य होते. अप्पांजवळ असा ध्येयवाद, अशी प्रेरणा, अशी निष्ठा शेवटपर्यंत होती. हा त्याना रा. स्व. संघाकडून-विवेकानंदांकडून लाभलेला वारसा. तो त्यानी प्राणांतापर्यंत जपला, एवढेच नाही तर, त्यात आपली अशी काही नवी भरही टाकली. त्यांचा नेतृत्वशिक्षणशास्त्रातील अभ्यास व हा निष्ठेचा–त्यागाचा संघ-विवेकानंद वारसा यांच्या मिश्रणांतून त्यांची ज्ञानप्रबोधिनी उभी राहिली. व अप्पाची प्रयोगशीलता, धडाडी व निष्ठा जोवर नवीन पिढीत कायम राहील तोवर प्रबोधिनी वाढतही राहील. अचाट कल्पना उराशी बाळगून जगलेला हा माणूस होता. यातील काही कल्पना साकार झालेल्या पाहण्याचे भाग्य याला लाभले. पण न साकार झालेल्या, अपुऱ्या राहिलेल्याही कित्येक असतील. या सर्व, त्यात कालमानाप्रमाणे योग्य ते बदल करून, साकारण्याची जबाबदारी आता पुढीलांची आहे. संस्थांची बहुतेक झाडे आज वठलेली आहेत. संस्थापकांचा ध्येयवाद संस्थापकाबरोबरच संपतो. पण अप्पांनी लावलेले ज्ञानप्रबोधिनीचे झाड या सार्वत्रिक स्थितीला एक अपवाद ठरू शकतो. कारण अप्पांचे सहकारी, त्यांचा वारसा पुढे चालवू म्हणणारे बहुतेकजण तरूण व प्रौढ आहेत. त्यांच्यातील साहसवृत्ती अद्याप मावळलेली नाही. किती जणांना असे सहकारी सध्याच्या काळात लाभतात ? अप्पांना हे भाग्य लाभले. आपले कार्य पुढे नेणाऱ्या, वाढवू पाहणाऱ्या तरुणांच्या संगतीतच त्यांचे शेवटचे दिवस गेले. अप्पा ब्रह्मचारी होते; पण केवढा हा वंशविस्तार आहे ? ध्येयवादी कार्यकर्त्यांचा हा वंश. क्षेत्र कुठलेही ठरो, काम कोणतेही असो; आंध्रातील वादळग्रस्ताचे पुनर्वसन, पेटलेल्या पंजाबातील दौरा किंवा प्रबोधिनीच्या कारखान्यातील माल परप्रांतात जाऊन खपवणे-जी जबाबदारी अंगावर पडेल, जे काम सस्था सागेल ते स्वार्थाचा, अडचणींचा विचार न करता काटेकोरपणे पार पाडणाऱ्या शेकडो-हजारो विद्यार्थी-कार्यकर्त्यांचा हा वंश. सामाजिक बाधिलकी मानणाऱ्या युवकाचा आणि युवतींचा हा वंश. आजच्या वैफल्यग्रस्त आणि निराशाप्रेमी युगात पुरुषार्थाची प्रेरणा जागवू पाहणाऱ्यांचा हा वश. हा वाढावा-विस्तारावा हीच कुणाचीही इच्छा राहणार. ती पुरी करणे न करणे अप्पाच्या उत्तराधिकाऱ्यांच्या हाती आहे. अप्पाचीही दुसरी-तिसरी इच्छा काय असणार ? 'राष्ट्रार्थ जन्म मम' या दृढ भावनेने अप्पानी आपले जीवन घडवले, व्यतीत केले. हीच प्रेरणा या जीवनापासून इतरांना लाभो.

¤

वशविस्तार कसा होत राहतो हे पाहण्यासारखे आहे. म्हैसाळचे मधुकरराव देवल आणि अप्पा पेंडसे. रा. स्व. संघाच्या दैनंदिन कार्यातून साधारणतः एकाच सुमारास मुक्त झालेले दोन पूर्णवेळ कार्यकर्ते. दोघेही ब्रह्मचारीच. सघस्वयंसेवकानी केवळ शाखा एके शाखा न करता समाजातील सर्व क्षेत्रात जावे, तेथे कार्य करावे असा या दोघांचा विचार; पुढे या दोघांनी दोन भिन्न क्षेत्रे निवडली. मधुकरराव देवलांनी तळागाळाचा वेध घेतला. या क्षेत्रात आपल्या संघ-विशिष्ट कार्यपद्धतीने एक नवाच आदर्श उभा केला. म्हैसाळचे कार्य आज अनेक दलित-नेत्यांनाही एक आशास्थान ठरत आहे व ते वाढतेही आहे. अप्पा पेंडसे दुसऱ्या टोकाला, समाजातील निवडक थराकडे गेले व या वर्गातील बुद्धिमान तरुणांवर त्यांनी राष्ट्रभावनेचे संस्कार केले. ही दोन्ही टोके नेहमी एकत्र येत होती, परस्परात जुळतही होती. म्हैसाळची, नवीन कार्यकर्ते तयार करण्यासाठी होणारी शिबिरे संयोजित करण्यासाठी, त्यातील कार्यक्रम, बौद्धिके घेण्यासाठी अप्पांच्या संस्थेतील प्रशिक्षित विद्यार्थी जात असत. तळागाळातील माणसे-कार्यकर्ते आणि उच्चशिक्षित तरूण याच्या सहजीवनातून सामाजिक-सांस्कृतिक समरसतेचे वातावरण आपोआपच तयार होत होते. अशा वातावरणातून जी कार्यवृद्धी झाली किंवा यापुढेही होईल, ध्येयवादी कार्यकर्त्यांचा जो वशविस्तार साधेल त्याला निश्चितच एक मोल आहे अप्पा पेंडसे ही व्यक्ती गेली तरी असा वंशविस्तार होतच राहील अशी आशा वाटते-विश्वास वाटतो.

—श्री. ग. मा.


वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर याचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**


**लेखिका : सौ. वीणा गवाणकर**

दुसरी आवृत्ती

मूल्य : तीस रुपये

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पुणे ३०



# मुंबापुरी

## राग मल्हार, वडाचं झाड

गेला जवळजवळ महिनाभर पावसाने नासिकराव तिरपुडयांनाही लाजवणारा राग दाखवला. तिरपुडयांविषयी बोलताना अनेकजण ‘गरजेल तो बरसेल काय’ या वाक्प्रचाराची आठवण करून देतात; परंतु या परवाच्या पावसाने कसलीही बोंबाबोंब न करता आपलं काम केलं. म्हणजे गरजला नाही फक्त बरसलाच अन असा बरसला म्हणताय की, मुंबईचे टाके ढिले पडले.

मुंबई महानगरपालिकेतल्या अधिकाऱ्यांना ऐनपावसात दरदरून घाम फुटतो. या वेळी तर त्यांच्या नाकाला बुडबुडेच आले म्हणा ना. जागोजागी रस्ते फुटले, खळगे, खड्डे झाले. मोठमोठाल्या ट्रंक रोड्सची हालत तर विचारूच नका. बसमध्ये बसून अख्खा स्वामी विवेकानंदमार्ग अंमळ फिरून या म्हणजे कळेल. ड्रायव्हरमंडळी रस्त्याचा उद्धार करत आहेत. अन् रस्ताखात्याचे हपिसर निमूटपणे ऐकून घेतायेत. दुसरं करणार तरी काय ?

रस्तादुरुस्ती–री–सरफेसिंगचं कंत्राट देणार स्थायी समिती. या स्थायी समितीचे सदस्य आणि कंत्राटदारांचे मेतकूट. दहा टक्के कमिशनचं राजकारण. त्याच नगरसेवकांनी त्याच कामचुकार कंत्राटदारांना कंत्राटं द्यायची अन् नंतर स्थायी समितीत मानभावीपणे बोंब उठवायची. या अशा परिस्थितीत हपिसरांनी काय करायचं ? पुन्हा सिटी इंजिनियर या बंधुभावाने आणि परस्पर सौहार्दाने खाबूगिरी करायच्या खात्यात तर सगळाच आनंद आहे.

तुंबलेली गटारं, फुटलेले रस्ते या ज्वलंत विषयावर महापालिकेच्या सभा गाजताहेत. पालिका आयुक्तांनी रस्ते–दुरुस्तीचं खणखणीत आश्वासन दिलं आहे. तरीही ही चर्चा संपेलच असं नाही. पुढच्या पावसाळ्यापर्यंत कोल्हेकुई होत राहील.

‘डेली’ या इंग्रजी दैनिकाने मोडकळीस आलेल्या रस्त्यांबद्दल महापालिकेला कोर्टात खेचलं आहे. हे सगळे पब्लिकला खूष करण्यासाठी स्टंट्स आहेत.

मंगळवारी टॅक्सीवाल्यांनी महापौर सरदार मनमोहनसिंग बेदींना घेराव घातला. हा घेरावसुद्धा एक बेमालुम स्टंटच होता. टॅक्सीवाल्यांना जनता पक्षाच्या सोहनसिंग कोहलींनी धरून आणलं म्हणतात. आता बेदी–कोहली भाई भाई दोघे जनतावाले. तेव्हा काय समजायचं ते समजा.

नंतर भाजपच्या युवकांनी दुसरा घेराव घातला. बेदींना आणि इतर नगरसेवकांना या युवक कंपनीने आपली जागृत युवाशक्ती दाखवण्याच्या नादात मेयरच्या दालनाचं दार तोडून टाकलं. मोर्च्याचं नेतृत्व भाजपचे आमदार नानूभाई पटेल यांच्याकडे होतं. या पटेलांना रात्री आठनंतर कोणताच रस्ता नीट दिसत नाही असं म्हणतात. म्हणू दे.

पेपरवाल्यांची या वर्षी चांगलीच भंबेरी उडाली. आमचा नेहमीचा खाक्या असा की, प्रचंड पाऊस पडला की, गेल्या वर्षीची कॉपी बघून, त्यालाच इकडे-तिकडे काटून-छाटून रिपोर्ट तयार करायचा; पण या वर्षी धडाधड घरं कोसळू लागल्याने तुमानी वर दुमडून ‘घटना–स्थळाला’ भेट देणं भाग पडलं. वर्तमानपत्रात सध्या रात्रपाळीला असलेले भिडू जीव मुठीत धरून आहेत. कधी फोन खणखणेल आणि भायखळ्याला चार मजली इमारत कोसळल्याचा पुकारा होईल कळत नाही.

एकूण हा पाऊस भलताच खूष करून गेला. मुंबईकरांना सहसा गोष्टी आठवत नाहीत. अगदी काल–परवा घडलेल्यासुद्धा; परंतु हा पाऊस मनात घर बांधून गेलाय. गाड्यांचा गोंधळ असल्यामुळे सपेदपोश बाबू लोक लवकर घरी येतात. घरी कांद्याची गरमागरम भजी खाऊन पाऊस बघत बसतात. रिट्ज हॉटेलातले अरबी व्यापारीही हेच करतात.

तिकडे सेंट झेवियरच्या बंदिस्त सभागृहात पंडित जसराज राग मल्हार सुरू करतात आणि त्यांच्या समेवर येण्याची वाट न बघता बोरीबंदरजवळचं एक मोठालं वडाचं झाड उन्मळून पडतं...

¤

## ‘हे मानवा !’

गेल्याच आठवड्यात आम्ही सौराष्ट्रातील पूरग्रस्त विभागाची पाहणी करून आलो. गुजराथ सरकारने मुंबईहून ही प्रेसपार्टी नेली होती. मागेच आम्ही आपणास पिकनिक हा प्रेसपार्टीला समानार्थी शब्द असल्याचे सांगितले आहे. (पाहा : ऑक्सफर्ड डिक्शनरी, पृष्ठ १२३५) त्यामुळे एका गुजराथी वृत्तपत्राचे प्रतिनिधी चक्क कॅसेट टेपरेकॉर्डर घेऊन आले. आम्हालाही आपण बाजा घेऊन आलो असतो तर बरे झाले असते असे वाटले, असो.

गेला दीड महिना सतत पडत असलेल्या पावसाने आणि पुरामुळे जुनागढ जिल्हा कसा उद्ध्वस्त झाला आहे त्याबद्दल येथे काही लिहीत नाही. तो या सदराचा विषय नाही; पण शापूर या गावी आलेला एक अनुभव सांगण्यासारखा आहे.

जुनागढहून शापूरला जाताना वाटेत इतका पाऊस झाला होता की, गावात जायला असलेला नदीवरला पूल सहा फूट पाण्याखाली गेला होता. बस गावाबाहेरच थांबली. आम्ही बसमधून उतरलो तेव्हा कासम इब्राहिम या माणसाची भेट झाली. कासम शापूरमध्येच गुजराथ इलेक्ट्रिसिटी बोर्डात काम करतो. बावीस जूनला जो प्रचंड मोठा पूर आला त्याच्या पंधरा दिवस आधीच त्याच्या धाकट्या मुलीचे लग्न कणजा गावातल्या एका शिक्षकाशी झाले होते. पुराच्या दोन दिवस आधीच ती घरी

राहायला आलेली होती.

ज्या दिवशी पूर आला त्या दिवशी तिच्या सासरचे लोक गावातच त्यांच्या शेतावरील घरात होते. पाणी वाढायला लागले तसे तिचा नवरा, सासु-सासरे, दोन दीर, त्यांच्या बायका आणि दोन लहान मुले छपरावर चढून बसले. मध्यरात्रीच्या सुमारास पाण्याच्या जोरामुळे घराच्या तीन भिंती कोसळल्या आणि सकाळ झाली तोवर तिचा मोठा दीर काय तो उरलेल्या भिंतीच्या आधाराने जिवंत राहिलेला! त्याचेही नाव कासम. कासम सुलेमान! संपूर्ण घरदार वाहून गेलेले आणि शेतजमीनही उद्ध्वस्त झालेली!

मी कासम इब्राहिमला भेटलो तेव्हा हा कासमही त्याच्याजवळ उभा होता. मी त्याला विचारले, 'आता तुम्ही काय करणार?'

त्याने काहीच उत्तर दिले नाही.

पण थोडा वेळ थांबून विचारले,

'तुम्ही कोठून आलात?'

'मुंबईहून.'

'मी पण बहुधा मुंबईला जाईन!'

'–हे मानवा, जेव्हा तुझे घरदार नष्ट होईल आणि शेतीवाडी उद्ध्वस्त होईल तेव्हाच तू मुंबईला ये!'

¤

---

## आकाश–दीप

ऑगस्टच्या पाच तारखेला ऑपेराहाउसजवळची 'आकाश–दीप' ही सहा मजली इमारत कोसळली आणि समस्त पब्लिकच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला! आपण ज्या इमारतीत आठ तास खर्डेघाशी करतो ती इमारत केव्हाही खाली येऊ शकते असा ठाम विश्वास लोकांच्या मनात निर्माण करणारे पालिका–अधिकारी, सरकारी नोकर आणि नगरसेवक–आमदार-मंडळी आता 'आकाश-दीप'च्या दुर्घटनेची जबाबदारी आपल्यावर अजिबात नाही असा देखावा करत आहेत!

मुळात प्रश्न असा आहे की, वीस वर्षांपूर्वी बांधलेली आर. सी. सी. ची इमारत इतक्या लवकर कशी काय कोसळली? आजवर झोपडपट्टीचा, फूटपाथवर राहणाऱ्यांचा, जुन्या मोडकळीस आलेल्या चाळीचा प्रश्न मुंबईला भेडसावत होता!

आता 'आकाश–दीप' नंतर नव्या कोऱ्या–करकरीत इमारतीही कोसळतात की काय अशी भीती निर्माण झाली आहे.

आमदार–नगरसेवकांनी पालिकेवर झोड उठवली आहे. आधी केवळ दोनच मजले असलेल्या या इमारतीवर नतर तीन मजले चढवण्याचा शहाणपणा कोणाचा? याला पालिकेने परवानगी कशी काय दिली? चार मजले वर चढवताना पश्चिम रेल्वेला विचारण्यात आलं होतं काय? १९७९ मध्ये बिल्डरला नोटिस देण्यात आली होती असं खुद्द महापालिका–आयुक्तांनी सांगितलं; परतु या बिल्डरनं ही नोटीस केराच्या टोपलीत टाकली!

या दुर्घटनेमुळे आणखी एक गोष्ट स्पष्ट झाली ती ही की, १८८८ साली तयार करण्यात आलेला मुंबई महानगरपालिका कायदा हा अत्यंत सदोष आणि अपुरा आहे.

गेल्या वर्षी 'आकाश–दीप' मधल्या काही रहिवाशानी महापालिकेकडे बिल्डिंगला डागडुजी करण्याची मागणी केली. बिल्डरविरुद्ध कारवाई करण्याचीही मागणी केली. महापालिकेने बिल्डरला दोनदा केवळ तीनशे रुपये दंड भरायला सांगितले आणि ४९९ कलमाखाली रहिवाशानीच स्वतःच्या बळावर पुढची दुरुस्ती करण्याविषयी सुचवले. दोनदा तीनतीनशे रुपये दंड भरून मालक कायद्याच्या कचाटयातून सुटला! १४ माणसं मात्र परवा ढिगाऱ्याखाली सापडून प्राणास मुकली. माणसाची किंमत फक्त सहाशे रुपये आहे काय?

आमदार आणि नगरसेवकांनी 'आकाश–दीप' दुर्घटनेची न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी केली आहे. महापालिका-आयुक्तानी ही मागणी धुडकावून लावली आहे न्यायालयीन चौकशी न होण्यातच सगळ्यांचं भलं आहे. जर न्यायालयीन चौकशी सुरू झालीच तर काही सनसनीखेज पडद्याआडल्या गोष्टी बाहेर येतील असं बोललं जातं. त्यात अनेकांची कडक इस्त्री मोडेल.

कंत्राटदार, बिल्डर, स्ट्रक्चरल अभियंते, आमदार, नगरसेवक आणि पालिका–अधिकारी या सगळ्यानी एकत्र येऊन आपापल्या दोषाचा वाटा उचलायला हवा.

बिल्डिंग कोसळून डझनभर माणसे मेल्यावर आणि त्याहून चौपट माणसे बेघर झाल्यावर सगळ्याना शहाणपण सुचतं; पण राजकीय पक्षाना पैसाअडका पुरवणाऱ्या धूर्त कंत्राटदारांना ब्लॅक–लिस्टमध्ये टाकण्याचं मनोधैर्य राजकीय नेते दाखवणार नाहीत आणि तोवर असंच होत राहील की:

'बाढ की संभावनाएँ सामने हैं
और नदीयों के किनारे घर बने हैं'

— विष्णु जयदेव

---

## कोसळणाऱ्या इमारती

# मृत्यूच्या छायेत २ लाख माणसं!

कपिल पाटील

'आकाशदीप'नं अर्ध्या मुंबईकरांना हैराण केलय. या मूळच्या दोन मजली इमारतीवर साताठ वर्षांपूर्वी कायदा धाब्यावर बसवून बेजबाबदारपणे चढविण्यात आलेले पाच मजले पश्चिम रेल्वेच्या रुळावरच कोसळले आणि पश्चिम रेल्वेची उपनगरी वाहतूक पार कोलमडली. आता पंधरा वीस दिवस होत आले तरी ढिगारा उपसण्याचे काम संपलेले नाही. त्यामुळे रेल्वेचे वेळापत्रक पूर्ववत रुळावर येण्यास अजून काही दिवसांचा अवधी लागेल.

मुंबईत दरवर्षी १०० घरांच्या पडझडी होतात; पण लक्ष कोण देतो? आकाशदीप इमारत रेल्वेरुळावरच कोसळल्याने मुंबईकरांवर आकाश कोसळल्याची स्थिती निर्माण झाली आणि कोसळण्याच्या मार्गावर उभ्या असलेल्या मुंबईतील इमारतीचा प्रश्न आज आणीबाणीसारखा पुढे आला, याला आकाशदीपची दुर्घटनाच कारणीभूत ठरली आहे. आकाशदीपच्या रांगेत उभ्या असलेल्या

**वीस हजार इमारतींमधून राहणाऱ्या किमान दोन लाख माणसांचं आयुष्य आज, उद्या धोक्यात आहे !**

आडव्या-तिडव्या पसरलेल्या ओंगळवाण्या झोपडपट्ट्या हे जसं मुंबईचं वैशिष्टय आहे, तशाच पडझडीला लागलेल्या या २०–३० हजार जुन्या व नव्या इमारती आणि त्यातून राहणारी माणसं बकाल मुंबईचं प्रतिनिधित्व करतात. झोपडया आणि मोडकळलेल्या इमारती या मुंबईच्या बऱ्याचशा समानधर्मी समस्या आहेत. मोडकळीला आलेल्या घा चाळीमधील दोन लाख माणसं आज अक्षरशः मृत्यूच्या छायेखाली वावरत आहेत. झोपडया आणि मोडकळलेल्या इमारती या दोन्ही समस्या समानधर्मी आहेत असं वर म्हटलंय. कारण या चाळकऱ्यांचं जीवन झोपडपट्ट्याहून फारसं वेगळं नाही तुंबलेले संडास, मोडकळलेले आणि कचऱ्याने भरलेले जिने, चौकात कुजून पडलेला कचरा, खिडक्या–दारांची झालेली दैना, वाकलेल्या गॅलऱ्या आणि टेकूसाठी उभं केलेलं बांबूचं जंगल, हे या चाळीच आजच चित्र आहे या चाळीतील एक-दोन खोल्यांच्या घरात एकच कुटुंब राहत नाही पडदे लावून पोटभाडेकरूंची दोन तीन कुटुंब दाटीवाटीने कोंबलेली असतात !

पावसाळा आला की, मुंबईतील जुन्या इमारती पडायला सुरुवात होते. अनेकांचे प्राण जातात आणि जगलेल्यांच्या पुढं निवाऱ्याचा प्रश्न उभा राहतो. मुंबईत दरवर्षी साधारण १०० घरं कोसळतात किंवा त्यांची पडझड होते. मुख्यमंत्री अंतुलेंच्या कारकीर्दीत १० जून ते १५ जानेवारी, ८१ या आठ महिन्यात मुंबईत ११४ इमारती कोसळल्या होत्या. त्या वर्षी काळबादेवी येथील एक जुनी इमारत आणि मुंब्रा येथे वर्षभरापूर्वी बांधलेली नवी इमारत कोसळून ५० लोक ठार व २५ जखमी झाले होते. ही संख्या पुढल्या वर्षातही थोडया-फार फरकाने कायम राहिलेली दिसते. यंदाच्या पावसानेही मोठया पडझडी घडवल्या २३ ते२५ जुलै या तीन दिवसात १४ इमारतींची पडझड झाली. पैकी ४ मोठया पडझडी आहेत आणि एकूण बळींची संख्या पंचवीसच्या घरात आहे !

**मंद पुनर्वसन**

मुंबई इमारतदुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने केलेल्या १९७६ च्या पाहणीत २० हजार घरं मोडकळीस आल्याचं आढळलं. येत्या १०–१५ वर्षांत या घरांतील लाख–दोन लाख माणसं रस्त्यावर येतील ! खुद्द मुंबई महानगरपालिकेच्या १२७ इमारती कोसळण्याच्या मार्गावर आहेत तर आकाशदीपसारख्या किती तरी इमारती उद्याचा धोका घेऊन पश्चिम व मध्यरेल्वे यांच्या मार्गाला लागून उभ्या आहेत. लाखोचं आयुष्य असं असुरक्षित असताना त्यांच्या सुरक्षेचं किंवा पुनर्वसनाचं कामही मंदगतीनेच चालू आहे. अगदी ताजी आकडेवारी उपलब्ध नाही होऊ शकली; परतु ही मंदगती दर्शविणारी, जुलै १९७९ मध्ये विधिमंडळाच्या अधिवेशनात देण्यात आलेली आकडेवारी पुरेशी ठरू शकेल, तेव्हाचे गृहनिर्माण–राज्यमंत्री डॉ जमखानवाला यांनी विधानपरिषदेत दिलेल्या माहितीनुसार १ जानेवारी ७७ ते ३१ मार्च ७९ पर्यंत १९७ इमारती दुरुस्तीकरता हाती घेतल्या होत्या. ३४ इमारती पुनर्बांधणीसाठी, तर ४१६८ स्थलांतर–छावण्या बांधावयास घेतल्या गेल्या. पुनर्वसनाच्या या समस्येत आणखी दुसऱ्या समस्या गुंतलेल्या आहेत. संक्रमण–छावण्यात हलविण्यात येणाऱ्या भाडेकरूना पूर्वीच्या भाडयापेक्षा तिप्पट–चौपट भाडे जादा द्यावे लागते. ज्या नवीन जागा बांधल्या गेल्या आहेत, त्याचे भाडे पूर्वीच्या भाडयापेक्षा १० पटीपर्यंत जास्त आहे आणि भ्रष्टाचाराला तर सुमारच नाही ! मुंबईतील अनेक चाळीत एका घरात दोन–तीन कुटुंबे राहतात. अशा वेळी नवी जागा मिळताना ती एकाच कुटुंबाला मिळते. बाकीच्याना रस्त्यावर यावं लागतं !

**घरदुरुस्ती व पुनर्रचना–मंडळ**

मुंबईतील कोसळणाऱ्या घरांच्या समस्येचा अभ्यास करून शिफारसी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने १९६५ मध्ये बेडेकर समितीची नियुक्ती केली. या समितीच्या शिफारसीचा परिणाम म्हणून मुंबई घरदुरुस्ती आणि पुनर्रचना कायदा १९६९ मध्ये सरकारने संमत केला. या कायद्यान्वये १९७१ मध्ये घरदुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाची स्थापना झाली. या मंडळाकडे मुंबईतील जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती (Structural Repairs) करणे आणि आर्थिकदृष्ट्या दुरुस्तीपलीकडील इमारतींची पुनर्बांधणी करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. मुंबईतील इमारतीपुरताच हा कायदा मर्यादित आहे. या कायद्यान्वये इमारतीचे त्यांच्या वयोमानानुसार वर्गीकरण करण्यात येऊन दुरुस्ती–उपकर (Cess) आकारण्यात येतो. अशा प्रकारे वर्गीकरण करण्यात आलेल्या इमारतींचा तपशील मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने प्रसिद्ध केला आहे. (तपशील शेवटी दिलेल्या चौकटीत पहा).

इमारतीवरील दुरुस्ती–उपकर मुंबई महानगरपालिकेतर्फे वसूल करण्यात येऊन सरकारकडे जमा केला जातो. ज्या इमारतीची दुरुस्ती करावयाची असेल त्याचा खर्च सरकारने ठरवलेल्या मर्यादेत असेल तर तो खर्च दुरुस्तीनिधीतून भागवला जातो. अधिक खर्च भाडेकरूंकडून घेतला जातो. (सरकार दुरुस्तीनिधीतून दर चौरस मीटरला २००|– रुपयांपर्यंत खर्च करते).

**भ्रष्टाचार**

घरदुरुस्ती आणि पुनर्बांधणीच्या या कामात भ्रष्टाचाराला मर्यादा नाही. त्यामुळे कोसळत्या इमारतीतून बाहेर पडणाऱ्या माणसाची आर्थिक स्थितीही पार ढेपाळते. दुसऱ्या बाजूला नोकरशाहीच्या लाल फितीत पुनर्वसन मंदगतीने पुढे सरकत असते, तर तिसऱ्या बाजूला नव्या बांधकामातील भ्रष्टाचाराने, त्या बांधकामाचं आयुष्य कमी केलेलं असतं ! आणि तेवढया आयुष्यातही ती बांधकामं राहणाऱ्यांना पावसाळ्यात आंघोळी घालत असतात, असं हे त्रांगडं आहे.

कोसळणाऱ्या घरांचा प्रश्न केवळ जुन्या इमारतीपुरताच मर्यादित नाही. भ्रष्टाचार व भेसळबाजीने पोखरलेली नवी बांधकामंही अपेक्षित काळ टिकत नाहीत. २५–५० वर्षं ज्यांचं आयुष्य असायला हवं ती बांधकामं ७–८ वर्षांत कोसळतील अशी साधार भीती निर्माण झाली आहे. या नव्या समस्येबाबत मुंबईचे एक तरुण संरचना शास्त्रज्ञ जयंत कुलकर्णी यांनी दिलेली माहिती या समस्येमागील गैरव्यवहारावर झोत टाकू शकेल.

पृष्ठ ३२ वर

## मुक्ताफळे

# एका गुप्त संघटनेची माहिती

'त्या तिथे पलीकडे, माझिया प्रियेचे झोपडे' किंवा 'खेड्यामधले घर कौलारू' या कै. ग. दि. माडगूळकराच्या काव्याशिवाय, दूरदर्शनवर वारवार होणारा टोळी-भावगीतांचा कार्यक्रम पुरा होत नाही. या ह्य पक्ती ऐकताना आम्हाला मात्र गलबलल्यासारखे होते. आम्ही ज्या सहकारी वसाहतीत रहातो, तिथे तिन्ही दिशानी, खिडकीतून बाहेर पाहिले की, झोपड्याच झोपड्या दिसतात. त्याना झोपडी म्हणणे कठीणच; परंतु झोपडीपेक्षा किंवा खोपटीपेक्षा कनिष्ठ वर्जाच्या म्हणजे-डब्याचे गंजलेले पत्रे, फाटकी गोणपाटे, प्लॅस्टिकची लक्तरे यांनी झाकलेल्या आडोशाला काय म्हणावे हे माहीत नसल्याने आम्ही झोपडी या शब्दाचा वापर केला. झोपडीप्रेमी काव्य-गान-रसिकानी आम्हाला त्याबाबत क्षमा करावी.

तर अशा या झोपडीतून आमची एखादी प्रिया रहात असेल ही कल्पना सहन होत नाही. तसेच वर्षातून एकदा आम्ही खेड्याकडे कोकणात जातो. तिथे कौलारू घरे वगैरे असतात; पण आत डोकावले तर गलितगात्र झालेली, रुग्ण म्हातारा-म्हातारी मरणाची वाट पहात आहेत असेच दृश्य बहुधा दिसते. यामुळे खेड्यातल्या त्या कौलारू घराची आम्ही धास्तीच घेतली आहे. तीनचतुर्थांश भारत खेड्यात रहातो ही कुणी तरी केव्हा तरी मारलेली थाप असावी. ज्याला रहाणे म्हणता येईल ते फक्त काही प्रमाणात शहरांतून, शहराच्या उपनगरांतून व शहरसदृश्य नगरांतूनच आज शक्य आहे- आणि आता तर हे शहरातले रहाणेही धोक्यात आले आहे.

शहरात आज भरमसाट लोकसंख्येचा प्रश्न आहे. घरांचा प्रश्न आहे. वाहतुकीचा प्रश्न आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे. सांडपाण्याचा प्रश्न आहे. यामुळे देह-स्वास्थ्याचा प्रश्न आहे, सुरक्षिततेचा प्रश्न आहे. ओसंडून वाहणाऱ्या कचराकुंडीचा प्रश्न आहे, मोकाट गुरांचा प्रश्न आहे, मुलांच्या शाळा-प्रवेशाचा प्रश्न आहे-प्रश्न नाही अशी एकच गोष्ट आहे, ती म्हणजे संतती-वाढ ! आता प्रश्न गंभीर झाला की, त्यातून आनंद-हास्यही निर्माण होते. याचे उदाहरण आम्ही नुकतेच पाहिले. एका वाड्यासमोर बँड वाजत होता म्हणून आम्ही कुतूहलाने चौकशी केली. तेव्हा कळले की, वाड्यात रहाणाऱ्या एका गृहस्थाकडे भाव्याच्या दुकानातून आज बरशेन गॅस येणार आहे, त्याचा हा आनंदोत्सव होता. 'अतिपरिचयात् अवज्ञा' हा नियम गॅसलाही लागू आहेच. आता गणपतीप्रमाणे वर्षातून एकदाच सिलिंडर येणार असल्याने त्याच्या स्वागतात निराळा आनद भरतो आहे भरी गॅस आल्यावर महिला कारकून, कचेरीत फक्त महिला सहकारकुनांनाच पार्टी वगैरे देतात. तात्पर्य शहरातून चिघळलेल्या प्रश्नाची सर्वांना माहिती असली तरी याबद्दल कुणी काही करू शकेलसे दिसत नाही.

शहरात रस्त्यात पडणाऱ्या घाणीची तर आता अतोनात वाढ झाली आहे. पूर्वी रस्त्यावर केळ्याच्या साली, शेंगाची टरफले, विड्याची थोटके, सर्व प्रकारचे कागद, मुलांचे शी शू, अन्नाची खरकटी, शहरात गोमातांचे दर्शन भाविकांना सुलभ व्हावे म्हणून मालकांनी शहरात सोडलेल्या गाईंचे गोधन, वापरलेल्या ब्लेडस् या सर्व गोष्टी पहाण्याचा नजरेला सराव झालेला होताच. आता या घाणीत 'लक्षणीय' भर पडली आहे वापरलेल्या निरोधाची ! निरोध वापरावा हे रोज आकाशवाणी आणि दूरदर्शनवरून सरकार लोकाना सागते; पण वापरलेला निरोध टाकावा कुठे याचे मार्गदर्शन नसल्याने लोकांनी तरी काय करावे बरे ?

शहरातील या स्थितीला खरजेसारखी शहरभर पसरणारी झोपडपट्टी कारणीभूत आहे या गैरसमजुतीने वा समजुतीने मुंबई म्युनिसिपल कमिशनरानी बेकायदा झोपड्या पाडण्याचे काम सुरू केले. यावरून शहरात कायदेशीर झोपड्या पण आहेत हे आपल्या लक्षात येईल. तर हे सुरू केलेले काम बंद पडले म्हणून 'पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज्' या सस्थेने सुप्रीम कोर्टापर्यंत प्रकरण नेले. म्हणून सुप्रसिद्ध विचारवत दुर्गा भागवत यानी या संस्थेच्या मुंबई शाखेच्या उपाध्यक्षपदाचा ताडकन राजिनामा दिला. गेल्या काही वर्षांत दुर्गाबाईंनी इतक्या गोष्टीचा राजिनामा दिलेला आहे की, अजून त्याच्यापाशी राजिनामा द्यायला संस्था असाव्यात याचेच आम्हाला भारी कौतुक वाटते. दोन गोष्टी यामुळे झाल्या. दुर्गाबाई या सस्थेच्या उपाध्यक्ष होत्या हे सर्वांना कळले आणि महत्त्वाच्या प्रश्नाला जाहीर वाचा फुटली. बेकायदा झोपडपट्टीची बेसुमार वाढ याबद्दल दुर्गाबाईंनी सरळ पंडित नेहरूनाच जबाबदार धरले हे चागले झाले. कारण आता ते हयात नाहीत ! त्या म्हणतात-

'हा प्रश्न इतका बिघडला, याचे कारण ब्रिटिशाकडून ज्यानी राज्यसूत्रे घेतली ते आमचे राज्यकर्ते होत. या मंडळीना राज्य कसे चालवावे याचे आकलन नव्हते...देशात संतति-नियमन जारी करा असे अनेक देशी-परदेशी तज्ज्ञानी सागितले; पण नेहरूंना जनतेला दुखवायचे नसल्याने, त्यांनी ते केले नाही. त्या अस्थिर काळात नेहरू समान-नागरी कायदा लागू करते तर मुकाटपणे तो कायदा मान्य झाला असता. अशा या कल्पक-दूरदृष्टी नसलेल्या राज्यकर्त्यांनी... वगैरे.'

आम्ही दुर्गाबाईंशी मुळीच सहमत नाही. संतति-नियमन जारी करताना कै. संजय गांधी या महान देशभक्त तरुणाचे काय झाले ? निरोधही गेला-विरोधही गेला ! अमेठी गेली-रायबरेली गेली ! आमच्या दृष्टीने, ज्या अर्थी हा शहरातील बिकट प्रश्न आपण सोडवू शकत नाही त्या अर्थी त्यामागे

परकीय हात आहे. असलाच पाहिजे. आसाम-प्रश्नात, पंजाब-प्रकरणात, जातीय दंग्यात, तामिळींच्या प्रश्नात जसा तो आहे तसाच तो या प्रश्नातही आहेच.

आम्ही बारकाईने तपास केला तेव्हा यामागे परकीय हातांची एक प्रचंड संघटना असल्याचे आमच्या निदर्शनास आले. फॉरिन हॅन्डस् इन इंडिया-*FHI*-फही-या संघटनेचे हस्तक सरकारात, नगरपालिकांतून, सर्वत्र पेरलेले आहेत असे आम्हास आढळून आले. आम्ही या संस्थेच्या प्रवक्त्याची, त्याचे नाव गुप्त राखू या अटीवर भेट घेतली.

आम्ही त्यांना सरळच विचारले-

'भ्रष्ट नगरसेवक हे शहराचे साक्षात दुर्दैव आहे असा सुबुद्ध शहरवासियांचा समज आहे. नगरसेवकांनी मताच्या गठ्ठ्यासाठी स्वतःच्या झोपडपट्ट्या तयार केल्या आणि हे करताना नगरपालिकांचा नोकरवर्ग व अधिकारीवर्ग भ्रष्ट बनवला, यामुळे नगरपालिकेचे अधिकारी बेकायदा बांधकामे तोडण्याऐवजी ती कायम कशी होतील याच्याच प्रयत्नात रहातात असा लोकांचा आरोप आहे.'

प्रवक्ता म्हणाला-

'हा सर्व आरोप निराधार,खोटा,बिनबुडाचा द्वेषमूलक आहे. भारतातील नगरसेवक, विशेषतः इंदिरा कांग्रेसचे नगरसेवक-यांच्यासारखे प्रामाणिक नगरसेवक जगात इतरत्र आढळत नाहीत. जनसेवेसाठी त्याना पैशाची गरज सतत लागते; पण हा पैसा त्याना मिळेल याची व्यवस्था फही ही आमची संस्था करते.'

'नवी झोपडपट्टी बांधताना तुम्ही काय मदत करता?'

'जिथे कचराकुंडी महिना-महिना ओसंडून वाहिली तरी त्याचे कुणाला काही वाटत नाही त्या देशात रातोरात पंचवीस-तीस झोपड्या उठवणे भारतीयाना शक्य आहे काय? यासाठी आमची संस्था मदत करते. बांबू, तट्टचा, पत्रे, सिमेंट हे सर्व सामान आमची संस्था पुरवते व रातोरात हे काम करण्यासाठी ब्राझिलचे तज्ज्ञ येतात. ते मार्गदर्शन करतात.'

'तज्ज्ञ ब्राझिलचेच का?'

'कारण ब्राझिलमध्ये ज्या झोपडपट्ट्या आहेत त्यामानाने इथले प्रोजेक्टस् काहीच नव्हेत. कधीकधी हाँगकाँग-तज्ज्ञ येतात तर कधी व्हेनिझूलाचे येतात!'

'याव्यतिरिक्त आपण काय कामे करता?'

'आम्ही जातीय दंगे पेटवतो. एखाद्या शहरात गुण्यागोविंदाने हिंदू-मुसलमान रहात असले तर आम्ही आमची माणसे तिथे धाडतो'

'हे तज्ज्ञ कोठून येतात?'

'पाकिस्तानातून-हे तज्ज्ञ इथल्या शांतताप्रिय मुसलमान-मौलवीत सहज मिसळू शकतात-'

'या उद्योगासाठी आपल्याला पैसा कोण पुरवतो?'

'बडी राष्ट्रे!'

'का बुवा?'

'अहो, त्याना सारखी भीती वाटते की, भारत बलवान होईल आपली प्रतिष्ठा धोक्यात येईल!'

'अरे तिच्या! पण भारत सरकारला जर हे माहीत आहे की, इथे परकीय हात काम करतात तर भारत सरकार तुम्हाला परदेशी तज्ज्ञ वगैरे आणायला परवानगी का देते?'

'तुमचा हा प्रश्न फारच महत्त्वाचा आहे. भारत सरकारला आमच्या संस्थेची नितात गरज आहे. कारण हे प्रश्न त्यांना सुटत नाहीत. जनता आरडाओरडा करते. अशा वेळी परकीय हाताचे हे काम आहे असे सरकार सांगू शकते की नाही?'

'उदाहरणार्थ-'

'आता हा शहराचा प्रश्न घ्या. महात्मा गांधी-अॅटेनबरोचा-यांनी सांगितले आहे-खेड्यात चला! लोक तर जात नाहीत. शहरातच गर्दी करतात. अशा वेळी शहरातील जीवन अत्यत खडतर, धोक्याचे, अति गलिच्छ केल्याशिवाय लोक शहरे सोडून जातील का? म्हणून मग आमची गरज लागते. आम्ही शहरात अलीकडे एक नवीन उपक्रम सुरू केला आहे. गणेशोत्सव आणि नवरात्र! नाक्यानाक्यावर टोळकी हे उत्सव साजरे करतात. दहा दहा दिवस आसपासच्या लोकांना ते झोपू देत नाहीत-'

'यामागेही तुम्ही आहातच का?'

'अहो, आमच्याशिवाय काय होणार? या मंडळीना आम्ही रात्रभर कानठळ्या बसवणारा आवाज करण्यासाठी रेकॉर्ड-प्लेअर्स, टेपरेकॉर्डर्स, टेप्स् पुरवतो. सगळे जपानी सोनी किंवा शार्प मेकचे! घरचे तुमचे एक वेळ बिघडतील; पण हे बिघडणे शक्य नाही! माणसाचे स्वास्थ्य हरण करणारा प्रचड आवाजासारखा दुसरा मित्र नाही! आता हे जातीय दंगे! आम्ही पाकिस्तानातून तज्ज्ञ मागवले नाहीत तरी जोपर्यंत भारतीय मुसलमान हे बहुसंख्येने शिक्षित, विज्ञाननिष्ठ व तारतम्य वापरून कुराण मानणारे असे होत नाहीत, समान नागरी कायदा पत्करीत नाहीत तोपर्यंत सतत होणारच! अशा वेळी 'परकीय हात' हे कारण सरकार सांगू शकते.'

'भारत सरकार तुम्हाला काही अनुदान वगैरे देते का?'

'ते आम्ही सांगणार नाही. वाटल्यास सेमूर हर्शला विचारा!'

-ग्यानबा


सुमारे ३९० दिवाळी अंकातून निवड केलेल्या उत्तम साहित्याचा ग्रंथ.

**अक्षर दिवाळी-१९८२**/मूल्य रु. ४८

संपादक-प्रा. म. वि. फडके, प्रा. स. शि. भावे, प्रा. गो. म. कुलकर्णी अरुणा ढेरे व प्रा. अंजलि सोमण

मूळ मूल्य रु. ४८/ ३०-९-८३ पर्यंत सवलतीचे मूल्य रु. ३६

**अक्षर दिवाळी-१९८१**/ मूल्य रु ४०

**अक्षर दिवाळी-१९८०**/ मूल्य रु. ३५

● दि. ३०-९-८३ पर्यंत तीनही ग्रंथ घेणारास रु. ९०/- फक्त व पोस्टेज माफ

● एकाच पत्त्यावर किमान तीन प्रती मागवणारास पोस्टेज माफ

● १९८२ च्या दहा प्रती घेणारास रु. ३३०/- फक्त व पोस्टेज माफ

आपल्या मागणीची रक्कम मनिऑर्डरने अगर पुणे बँकेवरील ड्राफ्टने धाडा

**विश्वकर्मा साहित्यालय** २०३५ सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे-३०

# ललित मुंबई

# कामाठीपुऱ्यातली कीड

मुंबईतल्या ६५ नंबरच्या बसनं तुम्ही कधी प्रवास केला आहे ?

किंवा त्या मार्गावरून ?

मी मात्र त्या बसनं, त्या भागातून जाण्याचं नेहमीच टाळत आले आहे.

तसे माझ्यासारखे इतरही असंख्य मुंबईकर, पांढरपेशे, सुसंस्कृत नागरिक तो भाग नक्कीच टाळत असतील; असतातच.

कारण उघड आहे.

कामाठीपुरा भागातून जाणारा रस्ता. ओंगळ उघडया मानवी देहांनी लडबडलेल्या इमारतींच्या खिडक्या. त्यांच्याकडे बघण्यासाठी नव्वद अंशांचा कोन करून बसच्या खिडकीतून वळणाऱ्या माना, किळसवाणे हावभाव. कोणत्याही मठ्ठ हिंदी चित्रपटातल्या तकलादू आणि ग्लॅमरस गरिबीच्या तोंडात मारील अशी गलिच्छ गरिबी, बटबटीत रंगीत प्रकाश, रोगण थापलेले निर्बुद्ध चेहरे, पिंजऱ्यात अडकलेली मुकी जनावरं !

हे दृश्य आणि त्यात रंगून जाणाऱ्या तितक्याच निर्बुद्ध जनावरांना वाटणारी मौज हे दोन्हीही पहाणं मानसिक शक्तीपलीकडचं काम आहे.

त्यामुळे साधारण सभ्य मुंबईकर त्याबद्दल एकच करतो, दुर्लक्ष !

ही परिस्थिती समाधानकारक नव्हेच. त्याबद्दल काही तरी हालचाल करायला हवीच. ती केली शीला बारसेनी. या भागातल्या गुन्हेगारांची यादी, पत्ते त्यांनी पोलिसांच्या हवाली केले. पोलिसांनी वस्तीवर धाड टाकली.

एका जबाबदार संपादकानं यावर प्रतिक्रिया व्यक्त केली—

—व्हाय, धिस इज स्पॉईलिंग द फन !

—ही 'फन' म्हणायची ? कुणाचीही आणि कसलीही किंमत, कुणीही द्यावी आणि त्याला मौज म्हणावं ? या मौजेची व्याख्या तरी काय ? त्यामध्ये संमतीचा काही भाग येतो की नाही ? आणि एका जबाबदार संपादकानं असे ताशेरे झोडावेत हा तर शेलका असा घरचा अहेरच म्हणायला हवा !

शीला बारसे इंग्रजीतून वृत्तपत्रकारिता करतात. नुकतंच काही वृत्तपत्रकारितेच्या विद्यार्थ्यांसमोर त्या बोलत होत्या— 'कस्टमर ओरिएंटेशन—प्रॉस्टिटयूशन' अशा विषयावर. या भ्रष्टाचाराची पाळंमुळं खणून काढण्यासाठी त्या बरंच काही करताहेत आणि या सर्व करण्याचा ठाशीव जोर, विषयाबद्दलची आत्मीयता त्यांच्या बोलण्यातून ठिकठिकाणी जाणवत होती.

वेश्याव्यवसायात सहभाग मुख्यत: दोघांचा. विकणाऱ्याचा आणि खरेदी करणाऱ्याचा. नेहमीच्या व्यापारात ग्राहक दुबळा ठरतो अनेकदा; पण इथे मात्र तो अधिक शक्तिमान असतो. कारण त्याला खरेदी करण्याचा अथवा न करण्याचा पर्याय असतो. हा शारीरभोग त्यानं खरेदी केलाच पाहिजे असं नाही. मात्र विकणाऱ्या स्त्रीला दुसरा पर्याय नसतो. तिच्याकडे असतं अफाट दारिद्र्य ! गाठीला पैसा नाही, शिक्षण नाही, जोपासना केलेली बुद्धीमत्ता नाही की कसलं कसब नाही. अशा अवस्थेत विकण्यासारखी वस्तू एकच—स्वत:चं शरीर ! याहून दुसरा-तिसरा आर्थिक पर्याय तिच्याकडे नाही. तिनं स्वत:चं शरीर विकलं नाही, तर तिच्यासाठी डाळ—तांदळाची पंचाईत उभी रहाणार आहे !

स्त्रिया वेश्या—व्यवसायाकडे वळण्यात गरिबी हे किती महत्त्वाचं कारण असतं या संदर्भात एक पहाणी केली गेली होती. इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायजेशननं बँकॉकमध्ये केलेला हा अभ्यास सर्वच विकसनशील—खरं म्हणजे गरीब देशांना लागू पडण्यासारखा आहे. इथे मूल ६—७ वर्षांचं झालं की त्यानं कुटुंबाच्या आर्थिक मिळकतीला हातभार लावावा अशी अपेक्षा असते आणि ग्रामीण भागातल्या ८५ टक्के स्त्रिया वेश्या असतात! केवढी भयंकर आकडेवारी आहे ही !

वेश्याव्यवसायाच्या समर्थनार्थ बरीच तथाकथित बुद्धीला किंवा भावनेला पटणारी स्पष्टीकरणं पुढे केली जातात. एक म्हणजे अर्थातच वेश्याव्यवसाय किती प्राचीन, तेव्हा तो किती थोर वगैरे. इथे भारतीय संस्कृती आणि जागतिक परंपरा इत्यादींचा हवाला-बिवाला देण्यात येतो. तेव्हा मतलब काय तर वेश्या-व्यवसाय आहे आणि तो असायचाच. वर असंही सांगण्यात येतं की, वेश्या आहेत म्हणून उरलेल्या सभ्य स्त्रिया सुरक्षित आहेत. त्या आपला सभ्यपणा टिकवू शकतात. वेश्या म्हणजे जणू काही एक कॅथार्सिसचा मार्ग, समाजाची सेफ्टी व्हॅल्व आणि वेश्या नसत्या तर सभ्य स्त्रिया रस्तोरस्ती धोक्यात आल्या असत्या !

आता या विधानात फसवणुकी दोन. आज वेश्या तर आहेतच; पण असली एक सेफ्टी व्हॅल्व आहे, म्हणून कुठल्या 'सभ्य' स्त्रीला कधी सुरक्षितपणा वाटला आहे का ? रात्री अपरात्री, नाही तर निवांत दुपारी, निर्जन किंवा कमी रहदारीच्या रस्त्यावरून चालताना कोणत्या स्त्रीला सुरक्षित वाटू शकेल ! रात्री नऊनंतर फोर्ट विभागात कोणती स्त्री निधडेपणे एकटी वावरू शकेल ? अंधाऱ्या बसस्टॉपवर निर्धास्तपणे बसची वाट पाहू शकेल? तेव्हा वेश्या तेवढया कॅथार्सिससाठी आणि उरलेल्या स्त्रिया माता-भगिनीसमान असं असायला हे मराठी नाटक नव्हे !

आणि अशा रीतीनं कुणा स्त्रीला, कुणा माणसाला पकडणं आणि साऱ्या समाजाचा कॅथार्सिस त्याच्यावर ओतणं, एखाद्याला बळीचा बकरा बनवणं हे न्यायाला, माणुसकीला कितपत धरून आहे ? लहान मुलांना पुरून विहिरी खोदल्याच्या आणि पूल बांधल्याच्या दंतकथा आपल्या लोकवाङ्मयात

वैपुल्यानं सापडतात; पण अशा दुष्ट परंपरा प्रत्यक्षात आमच्या डोळ्यांपुढे आजही चालू आहेत आणि आम्ही त्या चालू देतो आहोत !

आणि अशा या फॅंटासिसची गरज काय, तर म्हणे पुरुषाचा स्वभाव. त्याचा पुरुषीपणा अमुक वयापासून सुरू होणाऱ्या आणि तीव्रतेनं जाणवणाऱ्या त्याच्या लैंगिक भावना ( आणि हे वयही लवकरच येतं त्याच्या आयुष्यात—पहा—कुठलीही भिकार मराठी कादंबरी) तर त्याचा दांडगेपणा आणि उद्दाम वासना, अनावर लैंगिक वासना आणि या साऱ्यांतूनच (केवळ) शाबित होणारं त्याचं पौरुष !

या जगाच्या लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या स्त्रियांची आहे. या स्त्रिया देखील माणसंच आहेत आणि 'आहार-निद्रा-भय-मैथुन' या सर्वच मानवी गरजा तिलाही आहेत. कारण त्या माणसाच्या प्राथमिक गरजा आहेत; परंतु काही अपवाद वगळता स्त्रियांच्या लैंगिक गरजाचा असा प्रचंड बडिवार माजवलेला कुठे दिसत नाही. त्याच्या लैंगिक गरजा त्यातून शाबित होणारं त्यांचं स्त्रीत्व, त्या वासनांचा अनावरपणा आणि मग त्या भागवण्यासाठी खास ब्रॉथेल्स असं दृश्य काही आपल्याला तितकसं परिचित नाही. कारण ते मुळी दुर्मिळच आहे. लग्नाची वाट पहात स्त्रिया आपल्या लैंगिक भावनांना आवर घालू शकतात, तर रानटी, राकट इत्यादि—इत्यादि पुरुषपणाचे हे देव्हारे कशासाठी ? कधी कधी असं वाटतं की, हे असलं पौरुष वगैरे सर्व सांस्कृतिक बनवा—बनवीचा भाग आहे. समाजान अशी एक पौरुषयुक्त प्रतिमा तयार केली आहे आणि स्त्रिया जशा आपल्या तथाकथित 'स्त्री—प्रतिमे'ला जपण्यासाठी धडपडत रहातात, तशीच जीवघेणी धडपड पुरुषही 'ही—मॅन'ची दुर्दम्य प्रतिमा टिकविण्यासाठी करत रहातात आणि मग अशा या 'पुरुषा'च्या समाधानासाठी वेश्या—व्यवसाय आणि त्याचं तथाकथित तार्किक समर्थन अशा तर्कदुष्टतेला बळी पडावं लागतं.

## तो बलात्कारच !

माणसं भुकेनं मरतात, तहानेनं मरतात, श्रमानं मरतात; पण लैंगिक इच्छांपायी कुणी मेल्याचं काही ऐकिवात नाही. म्हणजे जी गरज एवढी अपरिहार्य नाही, त्यासाठी कुणाचा तरी बळी. बहुधा वयात येण्याआधीच अजाणतेपणे विकल्या जाणाऱ्या कोवळ्या मुली, नाही तर दारिद्र्यानं नडलेल्या स्त्रिया किंवा एकदा फसून—फसवून 'कुमार्गा'वर शिक्कामोर्तब झालेल्या दुर्दैवी महिला बलात्कार रस्त्यावर केला, तर तो दखलपात्र गुन्हा ठरतो. त्यासाठी अटक होते, शिक्षा होते, दंड भरावा लागतो; पण रेड लाइट एरियात जाऊन पाच रुपडचा फेकल्या म्हणजे तोच बलात्कार हे एक कायदेशीर कृत्य ठरतं. कायद्याचा गाढवपणा तो हा असा !

वेश्या—व्यवसायाचा हा प्रश्न हा आमच्या समग्र जीवनपद्धतीचा, मूल्यव्यवस्थेचा प्रश्न आहे. हा प्रश्न माणूसपणाचा प्रश्न आहे. वेश्येकडे जाणं हा मौजेचा भाग होऊ शकतो का ? ज्या स्त्रीला पूर्वी कधी पाहिलं नाही आणि कदाचित परत कधी पहाणार नाही, जिची ना जान—पहचान, ना ओळख, ना कसला काही संबंध त्या संबंधात प्रेम, विश्वास, एकनिष्ठा, कोवळिक, हळुवारपणा, रोमांचकारी अद्भुतता, मोकळेपणा या कशाचा काही लवलेश नाही. उलट कुठला रोग जडवून घ्यावा लागेल अशीच धास्ती आणि कुणी पाहिलं का ही भीती ! गलिच्छ, अंधाऱ्या, एकांतहीन खोल्या नाही तर पडद्याचे आडोसे अशा वातावरणात चोरटेपणे भागवलेली शरिराची खाज ही मौज होऊच कशी शकते ?

या शरीरसंबधासाठी उभय पक्षांचं प्रेम, किमान संमती तरी आवश्यक नसते का ? पैशासाठी असे संबंध करणारी वेश्या ते स्वेच्छेनं करते, असं मानणं हा भ्रम आहे. जिनं सरळ, साधं—भोळं आयुष्य जगणं, आपल्या छोटचा गावात—खेडचात रहाणं पसंत केलं असतं, अशा मुलीशी, स्त्रीशी संबंध ठेवणं, यात तिच्या संमतीचा भाग कुठे आला ? हे बलात्काराइतकंच अमानवी, बेकायदेशीर कृत्य ठरतं. हे तर केवळ पशूंचे मार्ग झाले !

माणसाच्या माणूसपणाचा हाच तर गाभा आहे की, त्याला सुबुद्ध विचार आणि भावना आहेत. स्वतःचा आणि दुसऱ्याचा तो माणूस म्हणून विचार करू शकतो. निव्वळ शारीरिक गरजांपलीकडे पोचलेलं माणूसपण आणि त्या माणूसपणानं नियत केलेल्या गरजा, इच्छा असं सारं असणारा तोच तर माणूस. हा माणूसपणाचा पाया जिथे हादरत असेल अशा गोष्टी आमच्या समग्र मूल्यव्यवस्थेत खिंडार पाडणाऱ्या आहेत.

वेश्याव्यवसाय आणि मूल्यव्यवस्था म्हटल्यावर गोष्ट सहजच वृत्तपत्रकारितेकडे वळली आणि ते साहजिकच होतं. बोलणारे आणि ऐकणारे सर्वच वृत्तपत्रव्यवसायातले. वेश्याव्यवसायाचं मूळ भ्रष्टाचार. माणसाचा, माणूसपणाविषयीचा लोप पावलेला आदर यात जशी दुसऱ्याबद्दल नाही, तशी स्वत बद्दलही आत्मगौरवाची भावना नाही. तत्त्वांची जपणूक नाही आणि सदसद्विवेकबुद्धीचं अनुसरणंही नाही. मग राहिलं काय ? आधळं जगणं, क्षणाच्या भावना, क्षणाच्या चिंता याचीच तमा...सगळं आयुष्य म्हणजेच एक धकवाधकी, जमेल त्याची. यातूनच तर येतं लांगूलचालन. सभ्य शब्दात 'कस्टमर ओरिएंटेशन' हे जसं वेश्येला असतं, तसंच वृत्तपत्राला असू शकतं, वार्ताहराला असू शकतं. वारा वाहेल तशी पाठ फिरवता येते आणि खपेल ते स्पेशल, सनसनाटी खळबळजनक लिहिता येतं. खरं म्हणजे वर्तमानपत्रीच लेखन हा आमच्या ऐतिहासिक लेखनाचा एक भाग आहे, ती एक इतिहासाची नोंद आहे त्यानं सत्य तेच नोंदवावं, असं वजन आपल्या लेखनात येण्यासाठी किती वृत्तपत्रलेखक प्रयत्न करतात ? आणि कितपत ? शीला बारसे म्हणतात, मी एक वाक्य लिहिते, तेव्हा त्या प्रत्येकामागे दहा हजार वाक्यं लिहिण्याइतका माझा अभ्यास असतो.

आणि अशी जबरदस्त लेखणी इतिहास लिहिते, तेव्हा ती इतिहास घडवतेही. त्यातून सिंहासनं उलथतात, सरकारी कायदे, बिल कचऱ्याच्या टोपलीत जातात, सत्ताधाऱ्याची, पोलिसांची कृष्णकृत्यं उजेडात येतात. हे सारं घडतं, तेव्हा ती लेखणी आणि त्या लेखणीमागचं मन अनुसरत असतं सत्याला, आपल्या सदसद्विवेकबुद्धीला. सवंग उथळपणाचा मोह दूर सारत.

वेश्याव्यवसाय हा काही पीडित स्त्रियांचाच केवळ प्रश्न नाही. ती आहे एक जबर कीड, समाजाला आणि मनाला लागलेली!

—ललिता बर्वे



## ह्या ना त्या निमित्ताने

# सहावी घटना-दुरुस्ती

फिरोझ रानडे

'आता असे जर तुमचे विचार असतील तर मग पुढे काय बोलणार ?' असे म्हणत दुसऱ्या मजल्यावर रहाणारा तरुण कामत रागारागाने निघून गेला

श्यामच्या काही मताबद्दल राग व नापसती कामत काही आज पहिल्यानेच दाखवत नव्हता.; पण पूर्वी तो रागारागाने कधी निघून गेला नव्हता.

बहुधा लोकसभेचे वेळोवेळी येणारे वृत्तात वाचून वाचून त्याच्यावरही परिणाम झाला असावा. लोकसभेत नाही का कधी मत्र्याच्या उडवाउडवीच्या उत्तरावर रागावून वा सभापतीच्या निर्णयाचा निषेध म्हणून बाजपायी, लोकदलाचे नेते, कधी द्रमुकच्या वा कधी लाल, कधी पिवळया साम्यवाद्यांबरोबर रागारागाने सभात्याग करीत ? कामतने त्याचेच अनुकरण करावयाचे ठरवले असावे.

ह्या सभागृहातून रागारागाने बाहेर जाण्याच्या कल्पनेनेच श्यामला हसू येत असे. बाजपायी, चरणसिंग, मिश्रा, बहुगुणा वगैरे मात्तब्बर मंडळी रागात बाहेर जाताना कशी दिसत असतील नाही ? व परत पाच-सहा मिनिटानी परत येत असतील व त्या वेळी त्याचे चेहरे-मोहरे कसे दिसत असतील ह्याची चित्रे अर्थातच रंगीत-श्याम मनाशी रंगवत असे.

पण विरोधी पक्षाच्या नेत्याप्रमाणे कामत परत येण्याचा काही संभव नव्हता. आपण कामतला नाहकच नाराज केले ह्याची चुटपुट श्यामला लागली; पण आपण तरी काय करणार ? एखाद्या गोष्टीबाबत चर्चा वा वादविवाद सुरू झाला की, हात राखून बोलणे आपल्याला जमत नाही हेच खरे.

आज सकाळी-सकाळीच कामत श्यामकडे आला होता. श्रीलकेत वणवा पेटून त्याच्या-बद्दलच्या बातम्या सर्व वर्तमानपत्रातून आल्या होत्या. पूर्वाश्रमीच्या भारतीयाची मोठी होरपळ झाली होती, त्याच्यावर अनन्वित अत्याचार झाले होते व होत होते. त्याची घरे जाळून टाकली गेली होती. त्याच्या कारखान्याना आगी लावल्या गेल्या होत्या. त्याची दुकाने-कचेऱ्या भस्मसात झाल्या होत्या.

असंख्य हिंदी बाधवाप्रमाणे कामतचा जीव तळमळला होता. श्यामही त्याच्या तळमळीशी सहभागी झाला होता. ह्या आपल्या सिहली बांधवाकरता काही तरी केले पाहिजे ह्या कल्पनेने तो झपाटून गेला होता त्याबद्दल कॉलनीतल्या लोकांनी काही तरी करावे म्हणून तो श्यामशी बोलायला आला होता.

'आता इंदिरा गाधीनी ह्याबद्दल काही करायला नको का ?' कामतने येता येताच प्रश्न टाकला.

काही करायला नको का ? म्हणजे काय करायला पाहिजे ?' श्यामने शांतपणे विचारले.

काही नाही, धाडकन आपले सैन्य पाठवायचे व चक्क श्रीलंका काबीज करावयाचे.'

कामत तरुण होता, त्यामुळे थोडा उतावळापण होता. आपण परदेशात होणाऱ्या घटनाविषयी बोलतो आहोत ह्याचे भान त्याला राहिले नसावे.

'असं कस करता येईल ?'

'न करता यायला काय झालं ? आपण काश्मिरमध्ये सैन्य पाठवले, गोव्यात युद्ध केले, हैद्राबादेत पोलीस-ॲक्शन घेतली की नाही ?'

'अरे, पण ते आपल्या देशाचे भाग होते.'

'मग तसं बघितलं तर श्रीलका पण भारताचा भाग आहे-म्हणजे होताच की-अगदी रामायणाच्या काळापासून !'

'कामत, पुराणाच्या गोष्टीचा दाखला तर आजकाल चालणार नाहीच; पण इंग्रजाच्या राज्यावेळचा दाखला पण आता उपयोगी पडणार नाही !'

'अगदी १९२०-२१ सालापर्यंत ब्रह्मदेश, सिलोन वगैरे हिंदुस्थानाचे भाग होते हे खरे; पण ते इंग्रजाच्या राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीने केलेले. आता ती राष्ट्रे आपल्यासारखीच सार्वभौम आहेत त्याना गोवा-हैद्राबादचा नियम लागू करता येणार नाही.'

'मग आपल्या तामिळ बाधवाना तसेच मरू द्यावयाचे की काय ?'

'तसे कोण म्हणतो ? इंदिराजीनी आपल्या परराष्ट्रमंत्र्याना पाठवलेच की लगोलग !'

'नुसत्या रावाना व पंताना पाठवून काय उपयोग ? चांगले सैन्य पाठवायचे, विमाने पाठवावयाची व तसे जमले नाही तर बागलादेशमध्ये पाठवल्या तशा मुक्ति-वाहिन्या पाठवावयाच्या !' कामत तावातावाने बोलायचे थाबत नव्हता.

'हे बघ कामत, असे तावातावाने बोलून काही प्रश्न सुटणार नाहीत. ह्या झगड्यामागचं मूळ काय आहे हे माहीत आहे ना तुला ?'

'आहे ! तर तामिळ लोकांना आपली संस्कृती, आपली भाषा जतन करावयाची आहे. मग आपण त्यांना मदत करायला नको ?'

'ती तर करायला पाहिजेच; पण तामिळ लोक तेव्हढयावर थांबत नाही आहेत ज्या भागात त्यांची संख्या जास्त आहे तो भाग

तोडून स्वतंत्र मागताहेत. त्यांना स्वतंत्र राज्य पाहिजे आहे !'

'मग काय हरकत आहे ? ह्या सिंहली राज्यात त्यांच्यावर अन्याय होत असेल तर स्वतंत्र राज्य हाच एक उपाय नाही का ?'

'हरकत ? आपल्या लोकांचा व त्या सिंहली लोकांचाही त्याला विरोध असला पाहिजे. आपल्या देशातल्यासारखा बावळट-पणा चालू दिला जाऊ नये. आपल्या येथे काय कुणीही उठावे व स्वतंत्र राज्य मागावे !'

'मग तुम्हांला काय म्हणावयाचे आहे ? तामिळ लोकांवर अन्याय तसेच चालू रहावेत की काय ?'

'हे बघ अन्याय–अत्याचार चालू रहावेत वा मुळात ते व्हावेत असे कोण म्हणेल ? ते तावडतोब थाबले पाहिजेतच; पण त्याचबरो-बर तामिळ लोकांची स्वतंत्र राज्याची मागणी पण थाबली पाहिजे. हे लोक श्रीलंकेत गेले दोन–अडीचशे वर्षं रहाताहेत, तेथे खात–पीत आहेत, व्यापार-उदीम करता-हेत तरी पण स्वतःला सिंहली लोकापासून नुसतं वेगळेच समजत नाहीत तर त्यांच्या-पेक्षा श्रेष्ठ समजताहेत ! हे कसे चालेल ? आपण महाराष्ट्रात चालवून घेऊ का ? तेथल्या तामिळ लोकांनी श्रीलंकेच्या लोकांशी जुळवून घेतलेच पाहिजे. आपली स्वतंत्र–राज्याची मागणी परत घ्यायलाच पाहिजे !'

'आणि त्यांनी तसे केले नाही तर ?'

'नाही तरी सिंहली सरकारने सहावी घटना दुरुस्ती आणली आहेच.' श्यामने त्या दिवसाचे वर्तमानपत्र काढले व तो वाचू लागला–

'जो माणूस वेगळ्या व स्वतंत्र राज्याची मागणी करेल त्याचे नागरिकत्वाचे अधिकार काढून घेतले जातील. त्याची मालमत्ता जप्त केली जाईल. त्याला कायदे–मंडळात बसता यावयाचे नाही. त्याला कोणताही धंदा व उद्योग करायची मुभा राहणार नाही ! ही घटना–दुरुस्ती पास होणारच ! शाब्बास जयवर्धने !'

श्यामने सिंहली राष्ट्राध्यक्ष जयवर्धनेंना शाब्बासकी दिल्यावरोबर कामत तडकला व रागारागाने 'तुमचे असे विचार असतील तर पुढे काही बोलण्यात अर्थ नाही' असे म्हणून तो बाजपायी वगैरे विरोधी नेत्यांप्रमाणे सभात्याग करून चालता झाला !

श्यामच्या हातात ते वर्तमानपत्र तसेच होते. त्याच्या मनात आले की, एवढे पाकि-स्तान होऊन व देशाचे विभाजन होऊनही आपण काही धडा घेतला नाही ना ? त्या वेळी इग्रज राज्यकर्ते होते; पण स्वतंत्र भारताच्या घटनेत तरी अशा फुटीर मनो-वृत्तीचा बंदोबस्त करायला नको होता का ? बरे, त्या वेळी एक राहिले असेल; पण त्यानंतर भारताच्या घटनेत भारंभार घटना-दुरुस्त्या केल्या गेल्या; पण त्या सगळ्या अशा तशाच. चाळीस वा बेचाळिसावी घटना-दुरुस्ती तर पंतप्रधानांच्या, उपराष्ट्रपतीच्या व राष्ट्रपतीच्या निवडणुकीविरुद्ध कोर्टात जाता येणार नाही, अशा तऱ्हेची काही तरी होती म्हणजे स्वतःचे स्थान बळकट करण्या-करता वा पक्षाचे स्थान बळकट करण्याकरता घटनादुरुस्त्या; पण सगळ्या राष्ट्राचे स्थान बळकट व्हावे म्हणून मात्र काही विचार नाही !

आता आपल्या सरकारने पण अशीच सहावी म्हणा सेहेचाळीसावी म्हणा, घटना दुरुस्ती करून श्रीलंकेच्या सरकारसारख्याच शिक्षा ठेवायला पाहिजेत.

वेगळे राज्य मागणारे मुळात भारतीयच न राहिले पाहिजेत. म्हणजे मग आज आझाद काश्मिर मागा, उद्या खलिस्तान मागा, परवा तामिळनाडू मागा, नागालँड मागा ह्या मागण्या बंद पडतील.

आता पहिली गरज असेल ती 'सहाव्या घटना-दुरुस्तीची !

## श्रीलंकेतल्या दंगली

# तामिळींनी फुटीरतावाद सोडून द्यायला पाहिजे !

अभय गोखले

श्रीलंकेतील वांशिक दंगली जरी थोडया-फार थंडावल्या असल्या तरी सिंहली व तामिळी याचे मनोमीलन होण्यास बराच काळ लागेल. त्याकरिता प्रथम श्रीलंकेतील तामिळींनी आपली स्वतंत्र राष्ट्राची अतिरेकी मागणी सोडून द्यावयास हवी. अर्थात सिंहली व व तामिळी याच्यातील ही पहिली दंगल मुळीच नाही. आपल्याला दुसऱ्या दर्जाची वागणूक मिळते ही भावना तीव्र झाल्याने तामिळींनी यापूर्वीही १९५६,६२,७७,८१ मध्ये असाच दंगा केला होता; परंतु त्याची व्याप्ती कोलंबोपर्यंत न पोचता बहुसंख्य तामीळ–वस्ती अस-लेल्या जाफना भागापुरतीच मर्यादित राहिली होती.

तामिळी व सिंहली यांच्यात दंगल कोणत्या कारणांवरून झाली व त्याचे पर्यवसान कशात झाले याचा तपास करण्याअगोदर याचा पूर्वेतिहास पहायला हवा. श्रीलंकेत तामिळी लोक पहिले गेले की सिंहली या वादात न शिरता ते कोठून गेले हे पहाता येईल. काहींच्या मते सिंहली लोक हे आर्यवंशाचे असून ते भारतातील बंगाल व ओरिसा भागातून श्रीलंकेत गेले. त्यांच्यापाठोपाठ तामिळी लोक मद्रास व इतर द्राविडी प्रांतातून तिकडे गेले. नंतर श्रीलंका ब्रिटिशांच्या ताब्यात असताना ब्रिटिशांनी चहा व कॉफीच्या मळ्यांत काम करण्यासाठी मद्रास व इतर दक्षिणात्य प्रदेशांतून जे कामगार नेले त्यात बहुसंख्य लोक हे तामिळीच होते. त्यांना आता भारतीय तामिळ संबोधण्यात येते. श्रीलंकेची सध्याची लोकसंख्या एक कोटी पन्नास लाख असून त्यात सिंहलींची संख्या सुमारे एक कोटी दहा लाख, श्रीलंका तामिळींची संख्या १७ लाख, भारतीय तामिळींची संख्या

सुमारे १३ लाख तर मुस्लिमांची संख्या दहा लाखांच्या आसपास आहे. अर्थात या मुस्लिमात सिंहली व तामिळी आहेतच श्रीलंकेतील तामिळी हे जरी सर्व श्रीलंकेत पसरले असले तरी तुरळकच आहेत. त्यांची दाट वस्ती जाफना विभागात व ईशान्य भागात आहे.

१९४८ साली श्रीलंका स्वतंत्र होण्यापूर्वी श्रीलंकेत सर्व ठिकाणी तामिळींचा वरचष्मा होता. मळ्यामध्ये ते मजूर व मालक या दोन्हीही वर्गात होते. शिक्षणसंस्थात, कचेऱ्यात, कारखान्यात, सरकारी नोकऱ्यात त्यांनी आपले अंगमेहनतीने व एकमेकाला धरून पुढे जाण्याच्या वृत्तीने (जी वृत्ती तामिळींना मुंबई काबीज करण्यास उपयोगी पडली) वर्चस्व ठेवले होते. मात्र श्रीलंका स्वतंत्र झाल्यावर तामिळींच्या वर्चस्वास धक्का बसला. १९४८ साली सध्या शासन चालवणारे सरकार (युनायटेड नॅशनल पार्टी) सत्तेवर आले. भारताप्रमाणे श्रीलंकेत सतत एकच पक्ष सत्तेवर राहिला नाही तर युनायटेड नॅशनल पार्टी व श्रीलंका फ्रीडम पार्टी हे दोन पक्ष आलटून-पालटून सत्तेवर येत राहिले. १९४८ च्या युनायटेड नॅशनल पार्टीच्या कोटेलावाला सरकारने नागरिकत्वाचा नवा कायदा करून सुमारे एक लाख तामिळींचे नागरिकत्व रद्द करून टाकले व त्यांचे संसदेतील प्रतिनिधित्व कमी केले. नंतर पंतप्रधान कोटेलावालाने बौद्ध भिक्षूंविरुद्ध भूमिका घेतल्याने १९५६ च्या निवडणुकात युनायटेड नॅशनल पार्टीचा दणदणीत पराभव झाला व सोलमन बंदरनायके यांची श्रीलंका फ्रीडम पार्टी सत्तेवर आली. बंदरनायकेंच्या या सरकारने सिंहली ही राष्ट्रभाषा म्हणून जाहीर केली. त्यामुळे अर्थातच तामिळींना दुय्यम दर्जा प्राप्त झाला. तामिळींना सिंहलींच्या स्पर्धेत टिकून रहाण्यासाठी आता सिंहली भाषा शिकणे क्रमप्राप्त झाले. त्यावरून श्रीलंकेत तामिळींनी दंगा केला व त्यात कित्येक लोकांना प्राण गमवावे लागले ! बंदरनायके यांनी त्यानंतर तामिळींना काही सवलती देण्याचा प्रयत्न केला; पण बहुसंख्य सिंहलींपुढे त्यांना नमते घ्यावे लागले. श्रीलंकेतील भारतीय वंशाच्या लोकांची जबाबदारी घेण्याच्या प्रश्नावरून मग श्रीलंकेत वादळ माजले. १९६४ मध्ये पंतप्रधान सिरीमाओ बंदरनायके व भारतीय पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्यात एक करार घडून आला. त्यानुसार भारतात परतणाऱ्या दर सात तामिळी लोकांमागे चार जणांना श्रीलंकेचे नागरिकत्व देण्याचे सिरीमाओ बंदरनायके सरकारने मान्य केले. मात्र त्याची अमलबजावणी करण्यात सुरुवातीला जो उत्साह दिसत होता तो नंतर कमी कमी होत गेला व सुमारे पावणेतीन लाख लोक भारतात परतले असून पावणेदोन लाख तामिळींना श्रीलंकेचे नागरिकत्व मिळाले. अजून सुमारे ८ लाख तामिळी श्रीलंकेत असे आहेत की, ते श्रीलंकेचे नागरिक नाहीत व भारताचेही नागरिक नाहीत आणि शास्त्री-बंदरनायके करार १९८१ मध्येच संपुष्टात आलाय.

१९६५ ते १९७० या काळात युनायटेड नॅशनल पार्टी तामीळ-फेडरल पार्टीच्या सहकार्याने सत्तेवर राहिल्याने तामिळींना काही सवलती मिळाल्या व त्यांच्यातील आपणाला दुय्यम दर्जा मिळत असल्याची भावना थोडी कमी झाली; परंतु १९७० मध्ये श्रीलंका फ्रीडम पार्टी पुन्हा सत्तेवर आल्यावर सिरीमाओ बंदरनायके यांनी धडाधड तामिळीविरोधी निर्णय घेण्यास सुरुवात केली. सिंहलीला राष्ट्रीय भाषा म्हणून दर्जा देण्यातच आला होता; पण त्यात भर म्हणून सिंहली शिकण्याची सक्ती तामिळींवर करण्यात आली. सरकारी नोकऱ्यात, खाजगी संस्थात, शैक्षणिक संस्थात आतापर्यंत तामिळींचे वर्चस्व होते ते मोडून काढण्यात आले व सर्व ठिकाणी सिंहलींना प्राधान्य देण्यात आले. बौद्ध धर्मास राष्ट्रीय धर्म म्हणून घोषित करण्यात आले व त्यामुळे तामिळी आणखीनच भडकले. कारण बहुसंख्य तामिळी हे बौद्ध नाहीत. तामिळी लोकांच्या चार संघटना होत्या-सुंदरलिंगम पार्टी, पोन्नामबालम पार्टी, फेडरल पार्टी ऑफ चेल्वानायकम, सिलोन वर्कर्स पार्टी ऑफ थोंडामन. या सर्व पक्षांनी एकत्र येऊन तामीळ युनायटेड लिबरेशन फ्रंटची स्थापना केली व तामिळींच्या न्याय्य हक्काकरिता तीव्र लढा देण्याचा निर्णय घेतला.

१९७४ साली जाफना येथे जागतिक तामीळ परिषद भरली होती. या परिषदेत तामिळी युवकांनी स्वतंत्र तामीळ राज्याची कल्पना हिरीरीने मांडली तामिळींना जी दुय्यम दर्जाची वागणूक मिळते त्यावर हाच एक उपाय आहे असे त्यांचे मत बनले होते. ही परिषद काही कारण नसताना काही सिंहली अतिरेक्यांनी उधळून लावली व त्यातूनच वैतागून काही अतिरेकी तामीळ युवकांनी लिबरेशन टायगर्स या संघटनेची स्थापना केली. या संघटनेच्या स्थापनेपासून त्यांचे हिंसात्मक उद्योग सतत चालू आहेत. तामिळींचे स्वतंत्र राष्ट्र ही एक कलमी मागणी लिबरेशन टायगर्सची आहे. तामीळ युनायटेड लिबरेशन फ्रंटने काही दिवसांनी लिबरेशन टायगर्सची स्वतंत्र तामीळ राष्ट्राची मागणी उचलून धरली. त्या वेळेस श्रीलंकेत सिरिमाओ बंदरनायके यांनी आणीबाणी घोषित केलेली होती. अर्थात या आणीबाणीचा तामिळी चळवळीशी काही संबंध नव्हता, तर १९७१ मध्ये श्रीलंकेत नक्षलवाद्यांनी जो उठाव केला होता तो दडपण्याकरिता व स्वतःचे आसन बळकट करण्याकरिता सीरिमाओंनी आणीबाणी घोषित केली होती व आपल्या सरकारची मुदतही दोन वर्षांनी वाढवून घेतली होती.

## भारत सरकारची भूमिका

१९७७ च्या निवडणुकात भारतीय पंतप्रधान इंदिरा गांधीप्रमाणे श्रीलंकेत सिरिमाओ बंदरनायके यांचा व त्यांच्या पक्षाचा पराभव झाला. जयवर्धने यांची युनायटेड नॅशनल पार्टी सत्तेवर आली. बंदरनायके यांच्या पक्षाला फक्त आठ जागा जिंकता आल्या तर तामीळ युनायटेड लिबरेशन फ्रंटला अठरा जागा मिळाल्या व त्यांचे नेते अमृतलिंगम विरोधी पक्षनेते बनले. युनायटेड नॅशनल पार्टीचा कल तामिळींना काही सवलती देण्याकडे होता. स्वतः जयवर्धने तामिळींबद्दल सहानुभूती बाळगून होते. जयवर्धने यांनी प्रथम तामिळी भाषेला राष्ट्रीय दर्जा प्राप्त करून दिला सुमारे पंचेचाळीस हजार भारतीय वंशाच्या तामिळी मळे-कामगारांना एका फटक्यात श्रीलंकेचे नागरिकत्व बहाल केले. निरनिराळ्या समित्या नेमून तामिळी लोकांच्या समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला. मात्र सिंहली अतिरेक्यांनी, लिबरेशन टायगर्सनी जयवर्धनेंना बराच विरोध केला. लिबरेशन टायगर्सनी मग हिंसाचारास ऊत आणला. युनायटेड (तामीळ) लिबरेशन फ्रंटचा लिबरेशन टायगर्सच्या हिंसाचारी कृत्यास पाठिंबा नव्हता; पण लिबरेशन टायगर्स तामिळी लोकांची सहानुभूती आपल्याकडे वळवण्यात यशस्वी झाले होते. त्यानंतर श्रीलंकेत

झालेल्या अध्यक्षीय निवडणुकीवर व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पोट-निवडणुकांवर बहिष्कार घालण्याचे आदेश लिबरेशन टायगर्सनी तामिळींना दिले व त्याला पाठिंबा न देणाऱ्यांना अद्दल घडवण्यात आली. यावरून तामीळ युनायटेड लिबरेशन फ्रंट व लिबरेशन टायगर्स यांच्यातील मतभेद विकोपास गेले. ज्या चार पक्षांनी एकत्र येऊन टी. यु. एल. एफ. ची स्थापना केली होती त्यातील तीन पक्ष अगोदरच सोडून गेले होते. त्यातील सिलोन वर्कर्स कांग्रेसच्या थोंडामान यांनी सत्ताधारी युनायटेड नॅशनल पार्टीत प्रवेश केला व आज सत्ताधारी मंत्रिमंडळात जे तीन तामिळी मंत्री आहेत त्यातील थोंडामान हे एक मंत्री आहेत.

जुलै १५ (१९८३) या दिवशी लिबरेशन टायगर्सच्या चार्लस अँटोनी ऊर्फ सीलन या नेत्याचा आणि एका टायगरचा जाफना येथील मेसाली जंगलात खून करण्यात आला. ही एवढीच गोष्ट लिबरेशन टायगर्सना दंगा करण्यास पुरेशी होती स्वतंत्र तामीळ राष्ट्राची मागणी करणाऱ्या या दहशतवादी लिबरेशन टायगर्सनी जाफनामध्ये एका लष्करी जवानांना घेऊन जाणाऱ्या ट्रकवर बॉबहल्ला केला. या बॉबहल्ल्यातून सुटून पळून जाणाऱ्या जवानांवर चोहोबाजूंनी बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव करण्यात आला व एकही जवान जिवंत राहिला नाही! एकंदर तेरा जवान ठार झाले ! हे वृत्त रेडिओवरून समजताच इतके दिवस लिबरेशन टायगर्सच्या दहशतवादी कृत्यांचा बदला घेण्यासाठी टपून बसलेल्या सिंहलींना आयती चांगलीच संधी दारी चालून आली. मग प्रथम कोलंबो शहरात व सिलोनमध्ये इतरत्र सर्व ठिकाणी तामिळी लोकांना मारण्यात, त्यांची घरे-दारे-दुकाने जाळण्यात सिंहली लोकांमध्ये अहमहमिकाच लागली. हजारो तामिळी लोक जिवाच्या आकांताने संरक्षणासाठी घरेदारे सोडून मंदिरे व चर्चेसकडे धावले. सिंहलींचा उत्साह इतका दांडगा होता की, त्यांनी बहुतेक सर्व तामिळी लोकांच्या घरादारांची दुकानांची, व कारखान्यांची तर वाट लावलीच; पण त्याशिवाय कित्येक तामिळींना जिवंत जाळले! सरकारी आकड्यांनुसार मृत तामिळींची संख्या ३०० सांगण्यात येते; पण तामिळी संघटनांच्या म्हणण्याप्रमाणे किमान तीन हजार तामिळी या दंगलीत मारले गेले. जवळजवळ पन्नास कोटी रु. मालमत्तेचे नुकसान झाले व जे कारखाने, बँका व इतर उद्योगधंदे नष्ट करण्यात आले ते नुकसान कधीही भरून येणारे नाही! सरकारने कोलंबो, गांफा, कालुतारा आणि जाफना या भागात कर्फ्यू जारी केलीच. कोलंबो म्हणजे जणु काही रणांगण भासत होते ! लिबरेशन टायगर्सचे स्वयंसेवक कोलंबो शहरात घरांच्या छपरांवर बसून सैनिकांवर गोळीबार करत होते. एकीकडे लूटमार करणाऱ्या सिंहलींना अटकाव करणे व दुसरीकडे लिबरेशन टायगर्सशी दोन हात करणे अशा दोन्ही आघाड्यांवर लष्कराला तोंड द्यावे लागत होते. जाफना शहराचा संपर्क–पूल उखडून दिल्याने व टेलिफोनच्या तारा तोडल्याने जगाशी राहिला नव्हता आणि मग आणखी एक धक्कादायक बातमी आली. कोलंबोमधील वेलीकाडे तुरुंगात ३७ तामिळी कैद्यांना तेथील सिंहली कैद्यांनी काठ्या, लोखंडी कांबी व इतर आयुधांनी अक्षरशः जनावराप्रमाणे बुकलून ठार मारले! या कैद्यांमध्ये (ठार मारल्या गेलेल्या) कुट्टीमनी, ज्याला तामीळ युनायटेड लिबरेशन फ्रंटने संसदेच्या निवडणुकीकरिता उमेदवारी दिली होती याचा व इतर दोघा लिबरेशन टायगर्सच्या नेत्यांचा समावेश होता !




हजारो तामिळी लोक हे सुरक्षिततेसाठी जाफनाकडे सरकू लागले. भारत सरकारनेही जहाजे पाठवून तामिळींना जाफनाकडे नेण्यास मदत केली. श्रीलंकेत चाललेल्या तामिळी हत्याकांडाकडे भारत तटस्थपणे पहाणे शक्यच नव्हते. एक तर श्रीलंकेत भारतीय वंशाच्या तामिळींची संख्या बरीच आहे. शिवाय त्यांचे भाईबंद व सगेसोयरे तामिळनाडूत आहेतच. तेव्हा तामिळनाडूमध्ये त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविकच होते. श्रीलंकेतील तामिळींच्या हत्याकांडाच्या निषेधार्थ मग प्रथम अण्णा द्रमुकच्या सरकारने आपल्याच राज्यात बंद पुकारला. नंतर मग करुणानिधींच्या द्रमुकने रेल्वे रोको आंदोलन जाहीर करताच त्या दिवशी तामिळनाडूतील संपूर्ण रेल्वेसेवाच बंद ठेवण्यात आली. काही अतिरेकी नेत्यांनी भारताने श्रीलंकेत लष्करी हस्तक्षेप करावा अशी मागणी केली. अर्थात केंद्र सरकारने ही मागणी ताबडतोब धुडकावून लावली हे बरे झाले. त्याचबरोबर परराष्ट्रमंत्री नरसिंहराव यांना ताबडतोब श्रीलंकेत पाठवून भारतीय सरकारने या प्रश्नाबाबत आपल्या भावना किती तीव्र आहेत याची जाणीव श्रीलंकेला दिली हेही बरे झाले. तामिळींची समस्या ही श्रीलंकेची अंतर्गत बाब आहे, त्यात आम्ही ढवळाढवळ करू इच्छीत नाही, ही भारत सरकारने घेतलेली भूमिका अत्यंत समतोल अशीच होती. श्रीलंकेतील तामिळींच्या फुटीरवादी चळवळीस भारत पाठिंबा देऊच शकत नाही. कारण याच प्रश्नावर भारतात अतिरेकी शिखांनी पंजाब पेटवला आहे. तामिळींच्या स्वतंत्र राष्ट्राच्या मागणीला


आमचा मुळीच पाठिंबा नाही हे भारतीय पंतप्रधानांनी वारंवार जाहीर केले आहे. या बाबतीत भारत जास्त उत्साह दाखवू शकणार नाही. तामिळींना भारत निरनिराळ्या प्रकारची मदत करू शकेल पण त्यांचे प्रश्न व समस्या त्यांनी श्रीलंका सरकारशी वाटाघाटी करूनच सामंजस्याने सोडवायच्या आहेत. प्रथम तामिळींनी स्वतंत्र राष्ट्राची मागणी सोडून द्यावयास हवी. श्रीलंका सरकारने तीन कम्युनिस्ट पक्षावर बंदी घातलीच आहे. शिवाय ससदेत एक बिल पास करुन फुटीरतावादी पक्षावर बंदी घालण्याचे अधिकारही मिळवले आहेत.

## अर्थव्यवस्था कोलमडली

साधारणत. श्रीलंकेतील काय किंवा भारतातील काय तामिळी हे राष्ट्रीय प्रवाहात पूर्णपणे कधीच मिसळले नाहीत. स्वत.चे वेगळे अस्तित्व कायम ठेवण्यातच त्यानी धन्यता मानली. प्रादेशिक पक्षाना उत्तेजन दिले. श्रीलकेत ज्याप्रमाणे तामिळींनी सिंहली भाषेला विरोध केला त्याप्रमाणे भारतातील तामिळींनी हिंदी या राष्ट्र-भाषेला सतत विरोध केला. मध्यंतरी ऑल इडिया रेडिओऐवजी आकाशवाणी हा शब्द उपयोगात आणला जात असता तामिळींनी एवढा गहजब केला की, आकाशवाणी हा शब्द रद्द करून पुन्हा ऑल इंडिया रेडिओ हा शब्द उपयोगात आणावा लागला ही घटना तशी क्षुल्लक होती; परतु अशा कित्येक प्रसंगी तामिळींनी हटवादी भूमिका घेऊन राष्ट्रीय प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्याचा उद्योग केला आहे व मतांचे राजकारण करणाऱ्या केंद्रशासनाने त्याना या बाबतीत प्रोत्साहनच दिले आहे. या तामिळींना दुसऱ्यांची भाषा शिकावयास नको, परंतु सर्व ठिकाणी वर्चस्व मात्र गाजवायला हवे. आज भारताच्या काना-कोपऱ्यात सर्व ठिकाणी तामिळी लोक मोठ्या पदावर आहेत. निरनिराळ्या संस्थामध्ये त्यांचे वर्चस्व व आधिक्य आहे; परंतु तेथील स्थानिक भाषा त्यांना शिकावयास नको. एकमेकांना धरून रहाण्याचा व आपल्या जमातीचा उत्कर्ष करण्याच्या त्यांच्या वृत्तीला तोड नाही; परंतु ज्या ठिकाणी ते नोकरी करतात तेथील स्थानिक लोकांशी, स्थानिक भाषेशी त्यांचे कधीच सख्य असत नाही. मुंबईचेच उदाहरण घ्या. आज हजारो तामिळी मुंबईत मोठमोठ्या नोकऱ्या व जागा अडवून बसले आहेत. त्यातील किती तामिळींना मराठी भाषा अवगत आहे ? येथील स्थानिक लोकांशी त्यांचे संबंध कधीच सलो-ख्याचे नव्हते. श्रीलंकेतील तामिळींवर अत्याचार झाल्यावर मुंबईतील हजारो तामिळींनी मोर्चा काढला. त्यात जी हुल्लडबाजी झाली ती सर्वांना ज्ञात आहेच; परंतु ह्या तामिळींकरीता एक खास लोकल सोडण्यात आली होती, ही केवढी चीड आणणारी गोष्ट आहे. या तामिळींचे हात वरपर्यंत पोचले आहेत हीच गोष्ट यावरून सिद्ध होत नाही का ? आज शिवसेनेसारखी संघटना मुंबईत आहे म्हणून ठीक नाही तर मुंबईचा मद्रास होण्यास वेळ लागला नसता. तेव्हा या तामिळींच्या श्रीलंकेतील भाईबंदासाठी भारत सरकारने मोठा आटा-पीटा करण्याचे कारण नाही. आसाममध्ये मोठ्या प्रमाणात मुस्लि-मांचा सहार झाला तेव्हा पाकिस्तान, बागला देश, अरब राष्ट्रे व इतर मुस्लिम देशांनी भारतात आपले परराष्ट्रमंत्री पाठवल्याचे ऐकिवात नाही. त्यांनी तो भारताचा अंतर्गत प्रश्न मानला व सौम्य निषेध नोंदवल्यावर भारताने जो खुलासा केला त्याने वरील राष्ट्रांचे समाधान झाले. या मुस्लिम राष्ट्रांनी आसाममधल्या मुस्लिमांना कोणतीही मदत केली नाही व कोणतेही निधी उभारले नाहीत. मग श्रीलंकेतील अत्याचारग्रस्त तामिळींकरिता भारत सरकारने निधी उभारण्याचे कारण काय ? असा प्रश्न एखाद्याला पडेल याचे उत्तर म्हणजे एक तर केंद्र हे तामिळनाडूच्या दबावाखाली आहे शिवाय अत्याचार झालेल्यात भारतीय वंशाच्या तामिळींची सख्या मोठी आहे तेव्हा त्याना मदत करणे हे भारत सरकारचे कर्तव्यच आहे. तरीसुद्धा सौराष्ट्र, कोकण, मराठवाडा येथील पूरग्रस्ताना मदत करण्याकरिता उत्साहानं निधी गोळा करण्याकरिता केंद्राने पावले उचलावयास हवीत. कारण हे सर्व भाग भारतात आहेत व त्या भागात कोटयवधी रुपयाच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे. कोकणाकरिता महाराष्ट्र सरकारने केंद्राकडे जी मदत मागितली आहे ती अजून मजूर झालेली नाही.

श्रीलंकेतील तामिळींची समस्या ही अशी नाजूक बाब बनली आहे जयवर्धने सरकारला तामिळींचा प्रश्न मनापासून सोडवण्याची इच्छा आहे; परतु बहुसंख्य सिंहलींच्या दबावापुढे त्याना नमावे लागते. शिवाय तामिळींची जास्त वस्तीही जाफना व ईशान्य भागात आहे. इतरत्र ते संख्येने नगण्य आहेत. तेव्हा सत्ताधारी पक्षाला मतांचे राजकारणही करता येत नाही. तामिळ लिबरेशन टायगर्स ही सत्ताधारी पक्षाची मोठी डोकेदुखी आहे. या सघटनेने श्रीलकेतील हिंसाचारी कृत्याची सीमा गाठली आहे तामिळ युनायटेड लिबरेशन फ्रटमध्ये अमृतलिंगम सारखे सामंजस्य असलेले नेते आहेत; परतु त्यानाही लिबरेशन टायगर्स त्रास देत असतातच सिंहली लोकानी जे भयानक हत्याकाड घडवून आणले त्यामुळे टी यु. एल एफ चे नेतेसुद्धा आता सरकारशी समझोत्याचो बोलणी करण्यास फारसे उत्सुक नाहीत. त्यातच भारतातील तामिळी नेते अतिरेकी प्रतिक्रिया व्यक्त करून श्रीलंका सरकारचे व टी. यु. एल. एफ.चे काम अवघड करत आहेत. प्रथम हजारो पीडित तामिळींचे पुनर्वसन करणे ही श्रीलका सरकार समोरची मोठी कामगिरी आहे. त्याकरिता श्रीलकेला भारतासकट अनेक देशांची आर्थिक मदत घ्यावी लागेल. आधीच श्रीलका सर-कारची आर्थिक स्थिती चांगली नाही त्यातच कोटयावधी रुपयाची मालमत्ता नष्ट झाल्याने श्रीलका अर्थव्यवस्थेचे पेकाटच मोडले गेले आहे. तामिळींबरोबरच श्रीलका सरकारला कम्युनिस्टाकडून त्रास होत आहे. सिंहली–तामिळी दंगलीत कम्युनिस्टांनी आपले हात धुऊन घेतले. या रशियावादी कम्युनिस्टांना जयवर्धने सरकार उलथ-वून सीरिमाओ बंदरनायके यांचे सरकार पुन्हा सत्तेवर आणावयाचे आहे. कारण जयवर्धने सरकार अमेरिकावादी असून त्यांनी नेहमीच कम्युनिस्ट विरोधी भूमिका घेतलेली आहे.

तामिळींना खरोखरच आपली समस्या सोडवून घ्यावयास हवी असेल तर त्यानी आपली फुटीरतावादी वृत्ती सोडून द्यावयास हवी. सामंजस्याने श्रीलका सरकारबरोवर वाटाघाटी करावयास हव्यात. त्याकरिता भारतात आलेल्या टी. यु एल. एफच्या अमृतलिंगमना भारत सरकारने तयार करावयास हवे. श्रीलकेतील तामिळींना चिथावण्याचे व भडकवण्याचे उद्योग भारतातील तामिळींनी बद करावेत. त्यातच त्याचे व त्यांच्या श्रीलंकेतील भाईबंदाचे हित आहे. □



# दि इस्लामिक बॉंब


लेखक : स्टीव्ह वेसमन
हर्बर्ट क्रोस्ने

रूपांतर : मो. ग. तपस्वी
दिल्ली


लेखांक : सातवा

## गुप्त युद्धाचे पाठीराखे कोण ? इस्रायली की इराणी ?

औसिराक या इराकी अणुकेंद्रावर इस्रायलने १९८१ मध्ये जो जबरदस्त हल्ला चढविला होता त्याच्याआधी १९७९ च्या एप्रिलपासून वर्ष–दीड वर्ष घातपात आणि दहशतीचे वातावरण फ्रान्स आणि इटलीमध्ये कसे निर्माण झाले होते त्याचे वर्णन आम्ही त्या प्रकरणात केले आहेच. त्यातील गूढ असे आहे की, या सर्व प्रकारांच्या मुळाशी कोण आहे याचा अखेरपर्यंत पत्ताच लागला नाही !

६ एप्रिल १९७९ रोजी तूलोनजवळील सेनेसुरमेर या ५० हजार वस्तीच्या गावात 'सीएनआयएम' नावाच्या त्या इंजिनियरिंग कंपनीतून इराकसाठी अणुभट्टीची सर्व गामा सामग्री दोनएक दिवसांत रवाना व्हायची होती. कुणी, कसे, का, ती सर्वसामग्री घातपाताने उडवून दिली याचा शेवटपर्यंत पत्ता लागला नाही. वर्तमानपत्रांनी मोठ्याच चवीने नाना बातम्या छापल्या आणि दोष इस्रायलच्या माथी मारला.

पण त्या स्फोटात नष्ट झालेल्या सामग्रीमुळे इराकला अणुबॉंब निर्माण करण्यासाठी ठरल्या वेळेपेक्षा आणखी दीड वर्ष उशीर होणार एवढीच प्रतिक्रिया आनंदाच्या उकळ्या लपवू न शकणाऱ्या इस्रायली प्रवक्त्याने व्यक्त केली. पुरावा काहीही नव्हता. होता तो फक्त परिस्थितिजन्य होता, बाकी सर्व अनुमानधपका होता. चूकही असू शकतो, बरोबरही; पण या स्फोटाचे श्रेय 'फ्रेंच पर्यावरणरक्षकगट' या नावाच्या तोवर अज्ञातच असलेल्या एका तथाकथित संस्थेने ले मॉन्दे वगैरे वृत्तपत्रांना फोन कर–करून आपल्याकडे घेतले.

तपासनिसाची दिशाभूल करण्याचा हा इस्रायलच्याच सुपीक मेंदूतून निघालेला उपाय आहे अशी मल्लीनाथी यावर भाष्यकारांनी केली. काडीचाही पुरावा नसताना एखादी घटना सुरस-कथेसारखी आश्चर्यकारक बारीकसारीक तपशिलासह देण्याची वर्तमानपत्रांच्या स्तंभलेखकांमध्ये चढाओढच लागली. स्टर्न या जर्मन साप्ताहिकात

अणुयुद्धाचा भडका हे आजच्या आपल्या जीवनातलं कठोर वास्तव आहे. पूर्वी दोनच महाशक्तीजवळ अण्वस्त्रे होती. आता पाकिस्तानी राज्यकर्ते कितीही नाकारत असतील तरी हा आपला शेजारचा देश अण्वस्त्रसज्ज आहे, हे ध्यानात घेऊनच यापुढे आपण आपले संरक्षणाचे धोरण आखायला हवे. हा देश अण्वस्त्रसज्ज कसा झाला ? त्यासाठी या देशातील शास्त्रज्ञ आणि राज्यकर्त्यांनी कोणकोणत्या युक्त्या-प्रयुक्त्या योजल्या ? कोणती कारस्थानं रचली? आतरराष्ट्रीय क्षेत्रात कशी हेरगिरी केली ?

हे सर्व मराठीतून प्रथमच सांगणाऱ्या या लेखमालेचा हा शेवटचा हप्ता.

एरिक फोलँय या अतिशय नामांकित पत्रकाराने 'अतरगातील गौप्यस्फोट' करण्याच्या शैलीत हे सर्व इस्रायलनेच कसे नाटकीय पद्धतीने घडवून आणले त्याची कहाणी खूपच सुरसपणे लिहिली. जगभर त्याच्या त्या कहाणीचे पुनर्मुद्रण अनेक पत्रपत्रिकांतून झाले. आम्हीही चौकशी केली; पण त्या सुरस-कथेतील तपशिलाप्रमाणे प्रत्यक्षात आम्हाला काहीच आढळले नाही. तो सर्व फोलँय यांचा कल्पनाविलास तरी असला पाहिजे किंवा खुद्द इस्रायलीनीच त्यांना ती माहिती 'खास तुम्हाला म्हणून सागतो!' पद्धतीने पुरवली असली पाहिजे.

ते काहीही असो, 'सीएनआयएम' मधील स्फोट कुणी केले याचा कोणताही सुगावा वा पुरावा हाती लागला नाही. अर्थातच असल्या साहसकथांचा संबंध आपल्याशी जोडण्यात येत असल्यास इस्रायलला मानसिकतेच्या दृष्टीने ते पथ्यावरच पडणारे होते. त्यामुळे फक्त एवढेच म्हणता येईल– इस्रायल असे करू शकला असता, इस्रायलने असे केले असते, कदाचित त्यानी तसे केले असेलही; पण प्रत्यक्षात इस्रायलने तसे केले काय ? याचे उत्तर कुणालाच देता येत नव्हते, इतका हा घातपात अगदी बेमालुम करण्यात आला होता. त्या स्फोटात फक्त इराकला जाणारेच नव्हे तर जर्मनी आणि बेल्जियमला जाणारे परमाणु–रिॲक्टर्सही उध्वस्त होऊन गेले होते.

इस्रायलीनी प्रत्यक्षात हा घातपात केला असेल वा नसेल; पण त्याचा दोष वा श्रेय इस्रायलला देण्यात इस्रायलची काहीच हरकत नव्हती. त्या घातपाताच्या सुमारास बॉनमध्ये असलेल्या इस्रायलच्या एका प्रसिद्धिअधिकाऱ्याने जेरुसलेम येथील एका कॉफीहाउसमध्ये आम्हाला सागितले, 'स्टर्नमध्ये आलेल्या त्या अतरंग–कहाणीचा मी निषेध केला नाही. कारण प्राजळपणे सागायचे तर, ती कहाणी खरी असो–नसो, आमच्यासाठी मात्र फारच विधायक होती. आमच्या शत्रूच्या कुठल्याही गोटात घुसण्याचे आणि एकही बळी न घेता आपले उद्दिष्ट साध्य करण्याचे सामर्थ्य आमच्यात आहे अशी आमची प्रतिमा त्यामुळे निर्माण झाली होती आणि ती आम्हाला हवीच होती.'

हा घातपात इस्रायलने घडवून आणलेला असो वा नसो, त्याने संपूर्ण जगाला प्रचंड हादरा दिला ! या घातपाताचा सूत्रधार कोण ते गुपितच राहिल्यामुळे तर हा हादरा जास्तच परिणामकारक ठरला. हे गूढ, गूढच राहिल्यामुळे आन्तर्राष्ट्रीय वृत्तपत्रांतून, टेलिव्हिजनवर आणि इराकला त्याच्या परमाणु–कार्यक्रमात–म्हणजेच अखेरीस अण्वस्त्र तयार करण्यात–मदत करणाऱ्या सर्वांच्या मनात इराकच्या अणुबॉंबचा धोका कायम राहिला. यातून सर्वत्र जी मानसिकता तयार झाली ती तर या हादऱ्यापेक्षाही जास्त महत्वाची होती !

तशातच पॅरिसच्या आलीशान आणि उच्चभ्रू लोकांचीच मुख्यतः वर्दळ असणाऱ्या वातानुकलित मेरिडियन हॉटेलात १४ जूनच्या भल्या पहाटे, म्हणजे सीएनआयएम कपनीत स्फोट झाल्याच्या बरोबर दोन महिन्याच्या आतच, इजिप्तने नामाकित अणुशास्त्रज्ञ डॉ. येहिया एल. मेहसाद याचा दंडुक्याने खून झाला ! त्याच्या खोलीत बाईच्या मेकअपचा टॉवेल मिळाला पोलिसानी छडा लावून तो टॉवेल मेरी मॅगल नावाच्या ३२ वर्षीय वेश्येचा असल्याचे शोधून काढले आपण त्या रात्री एल मेहसाद याच्याबरोबर आपला सौदा पटवण्याचा प्रयत्न केल्याचे, पण सौदा पूर्ण न झाल्याचे तिने मान्य केले; पण पोलिसाना आणखी काही सागण्याच्या आतच, अगदी सामान्य वाटावा असा, मोटर अपघातात मेरी दगावली ! येहिया एल. मेहसादचा खून, नतर त्यासबधात असलेल्या एकमेव साक्षीदार मेरीचा अपघाती मृत्यू या प्रकारामुळे सशय दाट होत गेला. दहशत मोठ्या प्रमाणावर पसरत गेली.

यातून आणखी एक मानसिकता निर्माण झाली की, दहशतवादी जर मेरीसारख्या एका बाजारबसवीलाही मारू शकतात, ते मेरेडियनसारख्या हॉटेलात, एल–मेहसादसारख्या नामाकित शास्त्रज्ञाचाही रानटी उपायांनी खून करू शकतात, तर मग आता कुणाचीच धडगत नाही ! त्यातल्या त्यात शास्त्रज्ञानाही आता वाईट दिवस आले आहेत असेच मानायला हवे. एका फ्रेंच शास्त्रज्ञाने आमच्याशी बोलताना नेमकी हीच मानसिकता व्यक्त केली. तो म्हणाला– 'पोलिसांनी मेरीला हुडकून काढले ना, तोवर आम्हाला आशा होती की आपण सुरक्षित राहू शकतो; पण पोलिसाना सर्व माहीत असताना मेरीचाही मृत्यू ओढवतो, तर मग पुढे काय घडेल कुणी सांगावे ? ती माणसे कुठेही पोचू शकतात आणि काहीही करू शकतात, असाच याचा अर्थ होतो. ती कुठल्या थराला जातील हे तरी कसे सांगणार ?'

सेनेसुरमेर येथील सीएनआयएम कंपनीत उडवून देण्यात आलेली परमाणुसामग्री, मेरेडियनमध्ये झालेला एल–मेहसाद यांचा खून आणि वेश्या मेरीचा लगेचच ओढवलेला अपघाती मृत्यू यामुळे निर्माण होत चाललेल्या सामाजिक मानसिकतेला आणखीच गडद रंग देणाऱ्या घटना घडू लागल्या. ७ एप्रिल १९८० रोजी उत्तर रात्रीच रोम येथे, इराकला परमाणु–प्रयोगशाळा व तीत वापरावयाची यंत्रोपकरणे पुरवणाऱ्या 'एसएनआय-एतेकिन्त' या कंपनीच्या

महानिर्देशकांच्या दाराशी बॉंबस्फोट झाला. महानिर्देशक होते इंजिनियर मॅरियो फायओरेली. जवळजवळ त्याच सुमारास फाय ओरेली याच्या कार्यालयातही दोन बॉंबस्फोट झाले.

घरी किंवा कार्यालयात त्या वेळी कुणीच नसल्यामुळे कुणी जखमी होण्याचा प्रश्नच नव्हता, पण कार्यालयात बॉंब ठेवणाऱ्यांनी इराक-संबंधीच्या फायली चाळल्या होत्या आणि त्यांची छायाचित्रेही घेतली होती असे नंतर आढळून आले. सेनेसुरमेर येथील सीएनआय-एम कंपनीतील स्फोटानंतर त्याचे श्रेय उपटण्यासाठी जसा एक तोवर अज्ञात असलेला गट पुढे आला होता, तसेच आता सीएनआयए तेकिन्तमधील या स्फोटानतर आणखी एक नवाच गट पुढे आला. त्याचेही नाव आजवर कुणी कधी ऐकलेच नव्हते. 'इस्लामिक क्राति संरक्षण समिती' या नावाने या गटाने नुसती फोनवरूनच नव्हे तर चक्क रेग्वो आपली ओळख करून दिली.

हे आणखी कसले नवेच गौडबंगाल आहे ते पाहून काढण्यासाठी आम्ही कित्येक दिवस जिवाचे रान केले आम्ही नेमलेल्या एका संशोधकाने तर त्यावर कित्येक आठवडे काम केले. आम्ही इटलीच्या परमाणु विभागातील अधिकाऱ्यांना भेटलो, त्या कंपनीच्या अधि-काऱ्यांशी चर्चा केली, पोलिसांना विचारले, इतकेच नव्हे तर, या 'इस्लामिक क्रांतिसरक्षण समितीने' ज्याना म्हणून धमकी देणारी पत्रे धाडली होती. त्याच्यहीपैकी काहीना भेटलो अखेरीस आम्हाला त्या पत्रांच्या मूळ प्रती आणि फोनवरून देण्यात आलेल्या धमक्याच्या समजा आणि आमच्या शत्रूला आमच्या क्रांतीविरुद्ध मदत करण्याचे परिणाम काय होतील ते आता तरी लक्षात घ्या. इराकसारख्या प्रतिगामी राजवटीला हस्ते-परहस्ते मदत करणाऱ्याची आम्ही वाट लावायला निघालो आहोत!'

इटलीप्रमाणेच इतरत्रही ज्या कपन्या परमाणु-परियोजनाच्या विविध कामात गुतलेल्या होत्या, त्याच्याही उच्चाधिकाऱ्याना आणि तंत्रज्ञाना या समितीवाल्यानी धमकीपत्रे पाठवली. या मंडळीना महत्त्वाच्या सर्व माणसाचे पत्ते नावनिशीवार माहीत होते हेच यावरून दिसले. विशेषत. ओसिराक अणुकेंद्राची मुख्य डिझाइनर कपनी टेक्निकॅटम हिच्यातील लोकाची त्याची यादी अगदी परिपूर्ण होती. ही सर्व पत्रे इराकमधील टपालशिक्क्याने आलेली असल्यामुळे इराकमधूनच टाकलेली असली पाहिजेत असे एका फ्रेंच अधिकाऱ्याने आम्हाला सांगितले. तुवैताह येथे इराकमध्ये काम करीत असणाऱ्या इजिनियर्सना आणि तंत्रज्ञांनाही अशी पत्रे गेली होती एसजीएन कपनीच्या इराकमध्ये काम करीत असणाऱ्या दोघा वरिष्ठानाही या पत्राची बानगी मिळाली होती. एक होते परियोजना-व्यवस्थापक आणि दुसरा होता स्टोअरकीपर याचा परिणाम असा झाला की, दहशतवाद्याना इराकसाठीच्या परियोजनेवर वरपासून खालपर्यंत कोण कोण कोणकोणत्या पदावर काम करीत आहे याची बित्तंबातमी आहे या कल्पनेनेच अनेकांचा थरकाप उडाला आणि दहशतीबरोबरच भीतीचेही वातावरण निर्माण झाले.

## धमकीपत्रांची योजनाही कल्पकतेने केली होती. विविध सिंडिकेटसना,

ध्वनिमुद्रित फितो मिळाल्या.

त्याच सुमाराला ३०० मैलावर जिनोआ येथे इटलीच्या एसएन-आयए तेकिन्तची भागीदार कंपनी आन्साल्दो मेकॅनिको न्युक्लियर हिच्या परिसरात बॉंबस्फोट झाले. तेथील स्फोटानतरही अनेकांना धमकीपत्रे आली आणि प्रत्येक पत्रावर त्याच 'इस्लामिक क्रांति-संरक्षण समितीचे' नाव होते. एक पत्र इटलीच्या परमाणु शक्ति राष्ट्रीय समितीचे अध्यक्ष डॉ. सिल्व्हिओ कॅओ यांना आले ते पत्र वाचून ते फारच हादरून गेले!

७ ऑगस्टच्याच रात्री फ्रान्सच्या परमाणु शक्ति आयोगाचे उच्चा-धिकारी जीन-जॅक्स ग्राफ याच्या दाराशी स्फोट झाला. ग्राफ ओसिराक प्रकल्पाचे काम हाताळणाऱ्या सीइएच्या 'टेकनिकॅटम' या उपशाखेचे ते मुख्य होते. त्यांनाही जवळजवळ त्याच अर्थाची आणि त्याच समितीची धमकी-पत्रे आली. इटली आणि फ्रान्स यातील बॉंबस्फोट, ते करण्यासाठी निवडण्यात आलेली माणसे, त्याना नंतर पाठवण्यात आलेली धमकीपत्रे आणि इस्लामिक क्रांति संरक्षण समिती हे नाव धारण करण्याची कल्पना सर्वच एकाच सुपीक मेंदूची उपज आहे यात वाद नव्हता.

कारण या स्फोटानंतर लगेचच ग्राफ यांना फोन आले आणि त्यात हीच गोष्ट स्पष्ट करण्यात आली की, 'तुम्हाला परमाणुक्षेत्रातील तुमची कामगिरी पाहून सर्वोच्च बहुमान मिळालाच आहे. आता आम्ही तुम्हाला तुमच्या खऱ्या लायकीचे हे बक्षीस दिले आहे असे

दहशतवाद्यांनी केलेले बॉंबस्फोट तसे काही फार मोठे नव्हते. बटाट्याच्या आकाराचे बॉंब असे कोणते नुकसान करणार होते? याहून मोठमोठे बॉंबस्फोट पाहिलेल्या इटालियनांना किंवा फ्रेंचाना तसे या स्फोटाचे काही वाटले नाही वृत्तपत्रादि माध्यमानीही या स्फोटाची मोठीशी दखल घेतली नाही; पण या धमकीपत्राचा परिणाम मात्र होऊ लागला. नाही तरी स्फोटानंतर वरचेवर फोनवरूनही देण्यात येणाऱ्या धमक्यामध्येही इतक्यातच कुणाच्या जिवाला अपाय करण्याची त्यांची इच्छा नसल्याचे जाणवतच होते; पण निषेधाचा हा जो मार्ग त्यानी पत्करला होता त्यामुळे त्या त्या ठिकाणच्या समाजाचीच एकंदर मानसिकता बदलण्यात त्याना यश आले असेच म्हणावे लागेल.

धमकीपत्राची योजनाही मोठ्याच कल्पकतेने केली होती. विविध सिंडिकेटसना, कामगारसंघटनांना आणि प्रातिनिधिक व्यक्तीना धमकीपत्रे पाठवली जात. त्यात मार्क्स, मोहंमद आणि मॅन्सन यांच्या विचारसरणीचे मिश्रण डोकावे. या पत्रांच्या प्रती आम्ही फ्रेंच नोकरशाही-साम्राज्यातून आमच्या सूत्रांकडून मिळवल्या. त्या वाचल्या म्हणजे समाजाचे मतपरिवर्तन करण्याचा किती दूरदर्शी विचार पत्रप्रेषकांनी केला होता ते दिसून येते.

'टेक्निकॅटम'च्या कामगाराना आलेल्या पत्रात म्हटले होते– 'बगदादच्या रक्तपिपासू हुकुमशहाच्या निर्लज्ज आणि घातक कार्याला हातभार लावू नका असा इशारा तुमच्या मालकाना

दिलेला आहेच. आता आम्ही तुम्हालाही इशारा देऊन ठेवतो की, तुमच्या कंपनीचे कुणी कर्मचारी बगदादमध्ये कामावर जायला तयार झाले तर रक्ताचे सडे शिंपले जातील ! हा रक्तपात व्हायला नको असेल तर तुम्ही आपल्या कर्मचारी बांधवांना बगदादला जाऊ देऊ नका !'

कॉमसिप या इलेक्ट्रॉनिक नियंत्रके तयार करणाऱ्या फर्मच्या कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना तर याहूनही जास्त भडक व जहाल पत्र आले– 'बायका-मुलांच्या रक्ताने माखलेल्या भाकऱ्या तुम्हाला खायच्या आहेत काय ? तशी तुमच्या कामगारांची इच्छा आहे काय ? तुमच्या कंपनीच्या संचालकाचा असेच करायचा विचार आहे. आपले खिसे गरम करण्यासाठी ते वाटेल त्या थराला जायला तयार झाले आहेत. त्यासाठी निरपराध रक्ताचे पाट वाहिले तरी त्याची त्यांना पर्वा नाही; पण तुम्ही कामगार आहात ! तुम्हाला माणुसकीचा विवेक आहे ना ?'

या पत्रात कॉमसिपच्या कामगाराना आवाहन करण्यात आले होते– 'इराकची फॅसिस्ट राजवट अणुबाँब तयार करायला निघाली आहे त्यामुळे भयंकर नरसंहार होणार आहे. मानवसमाजाचा हा विनाश टाळायचा असेल आणि सदसद्विवेकाने वागायचे असेल तर तुम्ही या अणुबाँबनिर्मितीसाठी लागणारी सामग्री, यंत्रोपकरणे इराकला देणाऱ्या तुमच्या कंपनीच्या भांडवलशाह मालकांच्या विरुद्ध कामगाराना जागृत करा. फॅसिस्ट आणि भ्रष्ट इरा-

पण कोण चालवत होते ही मोहीम? इस्रायली? पश्चिम आशियात कोठेही काही खुट्ट झाले तरी त्याचा संबंध इस्रायलशी आहे असे मानण्याची टूमच निघाली होती; पण 'या सर्व योजनेतील कल्पकता इतकी सफाईदार आहे की, तिचा उगम कोणत्याही इस्लामिक मेंदूतून सभवतच नाही, ते इस्रायलचेच काम !' असे आम्हाला फ्रेंच आणि इटालियन प्रवक्त्यांनी ठामपणे सांगितले. पुरावा मात्र काहीही नव्हता. त्यामुळे फक्त दहशत आणि भीतीचे वातावरण तेवढे फोफावत चालले होते.

इस्रायलबाबत असा धाक आणि दहशत पसरण्याची कारणेही तशीच होती. १९६२ मध्ये इजिप्तचे नासर यांनी ३५० मैल टप्प्याची रॉकेट्स तयार केली. बैरूतच्या दक्षिणेपर्यंत ही रॉकेट्स सहज मारा करू शकतील असेही त्यांनी जाहीरपणे सांगितले. ही प्रगती नाझी वैज्ञानिकांच्या मदतीनेच शक्य झाल्याची माहिती इस्रायलला मिळताच त्याच्या 'मोस्साद' या धडक–वीरांनी जर्मन-वैज्ञानिकांविरुद्धही अगदी अशीच स्फोट–धमकीपत्रे–फोन यांची दहशत–मोहीम सुरू केली होती. पत्रबाँब पाठवण्याचा धडाका सुरू केला होता. या दहशत–मोहिमेचे बळी ठरलेल्यांच्या वार्ता जगभर वर्तमानपत्रांत झळकत होत्या–

आज काय, 'पत्रातून आलेल्या बाँबमुळे एका सचिवाचा एक डोळाच उडाला !' उद्या काय, 'स्फोटात पाचजण ठार झाले !' 'स्वित्झर्लंडमध्ये एका जर्मन–वैज्ञानिकाच्या मुलीला जिवे मार-

## कामगार-संघटनांना आणि प्रातिनिधिक व्यक्तींना धमकीपत्रं पाठविली जात !

कची ही योजना हाणून पाडण्यासाठी कामगारांनी आवाज उठवलाच पाहिजे !'

या पत्रांचा ती पाठवणाऱ्याना हवा होता तोच परिणाम बरोबर झाला. कॉमसिपच्या कामगारानी आपल्या मालकांना खडे सवाल विचारले– ही जी धमकीपत्रे आली आहेत त्यातील धमक्या प्रत्यक्ष कृतीत येतील असे तुम्हाला वाटते काय ? कामगारांवर हल्ले झाले तर त्यांच्या रक्षणाची जबाबदारी कंपनी घेईल काय ? परमाणु-परियोजनेवर काम करण्यास नकार देऊनही कामगाराला आपली नोकरी कायम राखता येईल की नाही ? इराक इस्लामिक अणुबाँब तयार करणार नाही याची हमी कंपनी आम्हा कामगारांना देईल काय ?

हे धोके कमी लेखण्याचा प्रयत्न कॉमसिप आणि इतर कंपन्यांनी करून पाहिला; पण बाँबस्फोट आणि धमकीपत्रे या मोहिमेचा व्हायचा तोच परिणाम झाला. इराकमध्ये गेल्यास आपल्या कंपन्या ज्या दुप्पट–तिप्पट पगार देऊ करीत आहेत, तो घ्यावा की नाही ? कारण त्यात इतके धोके आहेत. असा प्रश्न कामगार उघड उघड विचारू लागले. इराक जर अणुबाँब तयार करणार असेल तर आपण कशासाठी त्याला मदत करायची असाही प्रश्न कामगारांना पडला. ही जी बाँबविरोधी मानसिकता निर्माण झाली ती निर्माण करण्याच्या हेतूनेच स्फोट आणि धमकीपत्रांची मोहीम चालवणाऱ्यांनी चालवली होती.

ण्याच्या धमकीखातर पोलिसानी एका इस्रायली अधिकाऱ्यास आणि त्याच्या जर्मन–खबऱ्यास अटक केली !' या मोहिमेचा अचूक परिणाम झाला जर्मन–शास्त्रज्ञ भयभीत झालेच; पण इस्रायलचेही नाव बद्दू झाले !

ही झाली १९६२ची गोष्ट; पण आताच्या मोहिमेत मागच्या चुका सुधारल्या होत्या. इस्लामिक क्रांति सरक्षण समिती कुणाचा जीवबीव घेत नव्हती; पण समजा चुकून कुठे कुणी दगावलेच, तर इराणमधील इस्लामिक क्रांतीचे आयातुल्ला खोमेनीचे लोकच बदनाम होणार होते, असे हे काहीसे परिष्कृत मोहीमतंत्र होते

पण ते कोण वापरीत होते ? 'इस्रायली नुसती धमकीपत्रे लिहून कधीही थाबायचे नाहीत' असे फ्रेंच आणि इटालियन वैज्ञानिक खात्रीपूर्वक सांगत. एकूणच यहुदी लोकाबद्दल युरोपात आणि अरब–विश्वात जो आकस पसरला आहे त्यामुळे 'काहीही झाले तरी ते इस्रायलनेच केले असे म्हणण्याची चूक आपण तरी करणार नाही' असेही ते म्हणत. एका फ्रेंच वैज्ञानिकाने आम्हाला पॅरिसच्या एका रेस्तराँमध्ये सांगितले की, 'इथे फ्रान्समध्ये अरब असले काही करू शकतील हे मानायलाच आम्ही तयार नाही. अरबाचा वकूबच तेवढा नाही; पण इराणला कमी लेखता येणार नाही. ते अतिशय प्रशिक्षित लोक आहेत आणि त्याचा आवाकाही तसाच आहे.'

असे हे गुप्त युद्ध चालू होते. या गुप्त युद्धाच्या पाठीशी कदाचित

एक-दोनच सुपीक डोकी असतील आणि कुठल्या तरी, पॅरिस-मधल्या किंवा बगदादमधल्या, एखाद्या लहानशा खोलीत टाइपरायटर घेऊन तेही मोहीम चालवीत असतील; पण ते कोण असावेत ? इस्रायली ? इराणी ? खोमेनीची ? त्यांचा एखादा गट असेल ? अनेक माणसे त्यात असतील ? काहीही कुणालाच सांगता येत नव्हते. लोकाना फक्त एकच कळत होते की, पश्चिम आशियातील नेहमीच्या युद्धात आपण मात्र लक्ष्य ठरत आहोत. का ? कशाकरता ? याची उत्तरे त्याच्याजवळ नव्हती; पण त्यांच्या हेही लक्षात येत नव्हते की, अणुबॉबचा प्रसार करण्यासाठी लागणारी सामग्री, यंत्रोपकरणे आणि तांत्रिक माहिती याचे वाटप करून आपण आता या घुमश्चक्रीच्या अगदी केंद्रस्थानी आलेलो आहोत.

¤

# पिसाट शर्यतीत विजय कोणाचा ?

एप्रिल १९७९ मध्ये ला-सेनेसुरमर येथे झालेल्या त्या रहस्यमय बॉबस्फोटापासून घातपात, दहशती, बॉबस्फोट, धमकीपत्रांची बरसात आणि खून त्याचे जे सत्र सुरू झाले ते ओसिराक येथील इराकी अणुकेंद्राच्या विध्वंसानंतरही थांबले नाही. या सर्व प्रकारांच्या पाठीशी इराण नव्हे, इस्रायलच आहे असा समज पसरला ओसिराकवरील हल्ल्यानंतर जेव्हा बेगिन यांनी स्वतःच जाहीर केले की, 'कोणत्याही परिस्थितीत इस्रायल इराकला अण्वस्त्रसज्ज होऊ देणार नाही आणि आपल्या कोणत्याही शत्रूची अणुबॉबनिर्मितीकडील वाटचाल तो वेळेआधीच नष्ट करून टाकायला कचरणार नाही !' तेव्हा तर जगभर इस्रायलची नाचक्की सुरू झाली.

पण प्रश्न उपस्थित झाला तो असा की, ओसिराक येथे असे काय होते किंवा होते तरी का, की इस्रायलने त्यावर असा हल्ला करावा ? या प्रश्नाचे उत्तर स्वतः बेगिन यांनीच कालांतराने दिले; पण तत्पूर्वी इराकच्या दिमतीला असलेल्या फ्रेंच आणि इटालियन शास्त्रज्ञामध्ये आणि तंत्रज्ञामध्ये मायदेशी परत जाण्याची लाट आली. आम्ही अनेकाना गाठले. सर्वांचे म्हणणे सारखेच होते- 'बोलून-चालून आम्ही आहोत शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ माणसे. आम्हाला करायच्याएत काय या भानगडी ? कशाला पडायचे या फंदात ? त्यापेक्षा आपापल्या घरी मुलाबाळामध्ये सुखाने, चार पैसे कमी मिळाले तरी, जाऊन रहाणेच केव्हाही इष्ट !'

चार पैसे कमी मिळाले तरी चालेल, ही भावना तशी वरकरणी होती असे संबधित कपान्यांच्या मालकानी आम्हाला सांगितले आणि पैशात वाढ करण्याचे मान्य करताच ही विशेषज्ञ मंडळी इराकला परतायला तयार झाली. किती भुर्दंड बसला असेल या कंपन्यांना ? २० टक्के ? आम्ही एका चालकाला विचारले. तो म्हणाला-'इतका नाही; पण बराच बसला !'

याचा अर्थ एकच होता की, इस्रायलच्या मते ओसिराक-विध्वंसानंतर इराकचे इस्लामिक बॉब तयार करण्याचे स्वप्न निदान दोन वर्षे तरी मागे पडले होते. या दरम्यान आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीचा भाग म्हणून इस्रायलने वृत्तपत्रातून एक इराक-विरोधी मोहीमच सुरू केली होती. अशा मोहिमांमध्ये खरे काय आहे त्यावर शिताफीने पांघरूण घालून तुम्ही म्हणता आहात तेच खरे आहे असे लोकांना वाटावे याची काळजी घेण्यात येत असते.

या मोहिमेचा परिणाम असा झाला की, पॅरिस येथील इराकी वकिलातीने 'सर्व प्रामाणिक आणि निष्पक्ष लेखकाच्या नावे' एक पत्रकच प्रसिद्धीला दिले. यहुदी कंपूने आमच्याविरुद्ध चालवलेला हा 'हेतुपुरस्सर' आणि 'दुष्ट' प्रचार असल्याचे या पत्रकात सरळसोटपणे म्हटले होते. इराकचा परमाणु-कार्यक्रम हा केवळ शांततापूर्ण कामांसाठीच आहे असे या पत्रकात भर देऊन सांगण्यात आले होते. इस्रायलने मोठ्याच हुषारीने वर्तमानपत्रांतून हा जो मसाला पेरायला सुरुवात केली आहे त्याचा उद्देश इराकवर त्याला उद्या जे लष्करी आक्रमण करायचे आहे त्याचे समर्थन करणारी मनोभूमी निर्माण करणे हाच आहे, असेही त्यात स्पष्टपणे म्हटले होते. तेव्हा इराकला आपल्यावर इस्रायली हल्ला होणार याची पूर्वकल्पना आलेली होती असेच यावरून म्हणावे लागते.

या पत्रकात अखेरीस इस्रायलवरही डाव उलटवण्याचा प्रयत्न केला होता. 'वंशवादी दक्षिण आफ्रिकेशी हातमिळवणी करून या यहुदी झोटिंगांनी अणुबॉब तयार केला आहे आणि नेगेव्ह वाळवंटातील एका व्याप्त प्रदेशात त्याचा चाचणी-स्फोटही केला आहे' असे या पत्रकात म्हटले होते. तसे पाहिले तर नेगेव्ह वाळवंट हा १९६७ पूर्वी इस्रायलचाच भाग होता; पण १९४९ आणि १९६७ या दरम्यानचा इस्रायल आणि १९६७ च्या युद्धात इस्रायलने बळकावलेला प्रदेश यामध्ये इराकी कोणताही फरक करायला तयार नसतात. ते काहीही असले तरी, या पत्रकात आणि नंतरही एका वेगळ्या मजकुरात थक्क करणाऱ्या दूरदृष्टीने बगदादने असा इषाराही दिला की, 'इस्रायल इराकवर लष्करी चढाई करण्याच्या योजना आखीत आहे आणि इराकमधल्या लक्ष्यावर अचूक मारा करू शकणारी अमेरिकन बांधणीची लढाऊ विमाने मिळवल्यापासून त्याच्या या योजनांना वेगही आलेला आहे.'

एक पार्श्वभूमी आणखीही विचारात घेण्यासारखी आहे. इराणशी असलेले जन्मजात वैर साधण्यासाठी इराक आणि इराणमध्ये भयंकर युद्ध माजले होते. त्या युद्धात निर्णय होत नव्हता. कुणीही विजयी होत नव्हते की कुणीही हरत नव्हते. इराकच्या सद्दाम हुसेन यांनी जे रूढ शस्त्रास्त्रानी साध्य करता आले नाही ते अणुबॉबने साध्य

करण्याची जबरदस्त आकांक्षा म्हणूनच बाळगली होती. त्यासाठी त्याला फ्रान्स, इटली वगैरे पाश्चात्य देश चक्क मदत करीत होते. इस्रायल चहूबाजूंनी शत्रुदेशांनी वेढलेला होता. त्यांच्यापैकी एकानेही अणुबाँब टाकला असता तर इस्रायल जगाच्या नकाशावरूनच पुसला गेला असता! इस्रायलला नेमकी हीच भीती वाटत होती. इराकची अणुबाँब बनविण्याच्या दिशेने चालू असलेली प्रगती थांबविली नाही, तर आपले अस्तित्वच धोक्यात येणार याबाबत इस्रायलीच्या मनात कोणताही संशय उरला नव्हता. राष्ट्राच्या जीवनमरणाचा प्रश्न आला असता, तात्त्विक काथ्याकूट आणि कालापहरण करीत बसण्यावर इस्रायलच्या धोरण आखणाऱ्या सत्ताधीशांचा विश्वास नव्हता. आता करू, मग करू किंवा असे केल्याने काय होईल, तसे केल्याने काय साधेल, यात हानी कोणती, फायदा कोणता, असला वांझोटा विचार करीत बसण्यास इस्रायलच्या नीतिनिर्धारकांना वेळही नव्हता म्हणून इस्रायलने ओसिराकवर तो विध्वंस करणारा हल्ला केला.

इस्रायल आपल्या त्या यशस्वी हल्ल्याचा सोहळा साजरा करीत होता तिकडे जगात त्याची याच हल्ल्यावरून नाचक्की होत होती; पण त्या आनंदसोहळ्यातून किंवा त्या नाचक्कीतून अनेक प्रश्न उपस्थित झाले होते. 'लांडगा आला' अशी हाळी बेगिन यांनी अवेळी मारली होती का? इस्रायली भूमिकेतून पाहिले तरी, ओसिराक–केन्द्रातून जे काही निष्पन्न होत होते, त्यामुळे इस्रायलचे अस्तित्व खरोखरच धोक्यात येण्याची शक्यता होती का? बेगिन यांनी बांधलेला तो कयास बरोबर होता का? रास्त होता का? ओसिराकमुळे पश्चिम आशियातील इस्लामिक बाँबचा प्रादुर्भाव खरोखरच होणार होता का? होऊ शकला असता का? ओसिराकमध्ये तेवढी क्षमता होती का? त्यातून एवढा धोका निर्माण झाला तरी असता की बेगिन यांनी, 'आधी ओसिराक उध्वस्त करतो मग काय विचारायचे ते विचारा!' असे जगाला सांगावे?

सप्टेंबर १९८० च्या अखेरच्या दिवशी ओसिराकवर केलेल्या या अपूर्व हल्ल्याची कारणमीमांसा युद्धपिपासू आणि झुंजार बेगिन यांनी स्वतःच पत्रकारांना चवदारपणे सांगितली. ते म्हणाले–' 'आम्हाला अत्यंत विश्वासू गोटातून अतिशय खात्रिलायकपणे माहिती मिळाली होती की, यंदा जुलै महिन्यात ओसिराक अणुकेन्द्रात उत्पादनाला सुरुवात होणार आहे. ही अणुभट्टी जुलैतच 'गरम' व्हावी यासाठी आपल्या सहकार्याचा वेग वाढवा असा आग्रह इराक फ्रान्सला करीत होता. याचा अर्थ आणखी दोनच महिन्यांनी ओसिराकमध्ये अण्वस्त्रोपयोगी युरेनियम तयार होऊ लागेल आणि मग आम्हाला काहीही करता येणार नाही. कारण अशा प्रकारे 'गरम' झालेल्या अणुभट्टीवर बाँब टाकण्याचा अर्थ झाला असता किरणोत्सर्गी सामग्रीचे लोटचे लोट आसमंतात पसरविणे, लक्षावधी निरपराध नागरिकांना–बायका मुलांनाही–त्यामुळे भयंकर यातना झाल्या असत्या. ओसिराक सुरू झाल्यानंतर निकट भविष्यात इराकच्या जुलमी सत्ताधीशांना २०–किलोटनचे हिरोशिमा–धर्तीचे तीन ते पाच अणुबाँब तयार करता आले असते. ते कार्य सुरू झाल्यानंतर ओसिराकवर बाँब टाकणे मूर्खपणाचेच झाले असते. मी तरी आपल्या सहकाऱ्यांना तसे करण्याची परवानगी कधीही दिली नसती!'

बेगिन अनेक तथ्ये समोर ठेवीत आपला मुद्दा समर्पकपणे मांडीत होते. निर्णय अतिशय कठोर होता; पण तो घेण्याची आताची वेळ टळली असती तर मग पुढे कधीही ओसिराक उध्वस्त करता आले नसते हा त्यांचा युक्तिवाद तसा पटणारा होता. बेगिन शेवटी म्हणाले, 'म्हणून आम्ही हाच क्षण निवडला. कारण नंतर फार उशीर झाला असता. कदाचित कायमचाच उशीर! मग आम्हाला नुसते हातावर हात ठेवून दोन–तीन वर्षांत–फारच झाले तर चार वर्षांत सद्दाम हुसेन यांनी चार–पाच अणुबाँब तयार केल्याचे पहावे लागले असते. हे प्रत्यक्ष सरळ सरळ आणि महाभयानक असे अरिष्ट आ वासून उभे राहिल्यानंतर आम्ही काय करू शकलो असतो? आम्ही काय केले असते? काहीच नाही! मग आमच्या या देशाचे, आमच्या या जनतेचे नामोनिशाणच राहिले नसते. त्या भयंकर नरसंहारानंतर दुसरा त्याहून महाभयंकर नरसंहार ज्यूंच्या इतिहासात झाला असता, असे होणे नाही, कालत्रयीही शक्य नाही, पुन्हा कधीच नाही!' बेगिन म्हणाले.

इस्रायलच्या या सामर्थ्याची भीती पाकिस्तानलाही वाटतेच. भारत हल्ला करील की नाही हा मुद्दा पाकिस्तानला गौण वाटतो; पण इस्रायलची महाभयंकर तरबेज असलेली विमाने, ओसिराकवर गेली त्याहूनही भयंकर रोमहर्षक अशा हवाईनाट्यात पाकिस्तानची सिहाला, कहूता आणि डेरा गाझी खान येथील अणुकेंद्रे अशीच उध्वस्त करतील की काय अशी धास्ती, नाही म्हटले तरी, पाकिस्तानच्या शासकांना पूर्वीही होती, आजही आहेच!

बेगिन हे महाधूर्त आणि अत्यंत वस्ताद मुत्सद्दी आहेत. ओसिराकवर बाँबहल्ला करून आल्यानंतरच्या गुरुवारी ब्रिटिश वकील जॉन रॉबिनसन यांना निरोप देण्यासाठी योजलेल्या एका समारंभात त्यांनी आणखी एक 'बाँब'च टाकला. ते म्हणाले–' इस्रायलने केलेल्या या अवचित हल्ल्याचे खरे लक्ष्य होते ओसिराकच्या भूगर्भात जवळजवळ ४० मीटर खाली–म्हणजे तेरा मजले खाली–फ्रेंचांनी इराकसाठी केलेले एक रहस्यपूर्ण बांधकाम! याच भूमिगत वास्तूत इराक अणुबाँब तयार करणार होता. इस्रायलच्या हल्ल्याचे खरे लक्ष्य हे होते.'

खुद्द बेगिन यांनीच सांगितलेली ही सुरस कहाणी लगेचच रॉयटरच्या टेलिप्रिंटरवरून जगभर पोहोचली. एका सुपरिचित इस्रायली पत्रकाराने मग 'अंतरंगातून' मिळवलेल्या माहितीच्या आधारे इस्रायलचा तळघरावरील हा हल्ला कसा झाला याची त्याहूनही सुरस आणि सनसनाटी बातमी दिली. इस्रायलच्या विमानांनी सोडलेली रॉकेट्स भूगर्भाचा भेद करीत या तळघरावर कशी आदळली तेही त्याने मोठ्याच तपशिलाने दिले. बेगिनची मोठीच पंचाईत झाली. हा प्रकार झाला गुरुवारी रात्री शुक्रवारी सकाळीच बेगिन यांनी रॉयटरच्या वार्ताहराला बोलावून स्पष्टीकरण दिले की, चाळीस मीटर भूगर्भात नव्हे चार मीटर खाली होती ती प्रयोगशाळा! आकडा उद्धृत करण्यात आपली चूक झाली असेही बेगिन यांनी

**खुद्द बेगिन यांनीच सांगितलेली ती सुरस कहाणी रॉयटरने जगभर पोचवली.**

मोठ्या प्रांजळपणे मान्य केले !

पुढल्या काही दिवसांत इस्रायली प्रवक्त्यांनी आणखी खुलासे केले. त्यातला एक खुलासा असा की, 'खरे म्हणाल तर जमिनीखाली गुप्त प्रयोगशाळा वगैरे काही नव्हतेच मुळी ! ती आपली नुसती कपोल-कल्पनाच होती म्हणा ना. तेथे फक्त एक लहानसे दालन भट्टीखाली होते आणि काही गुताागुतीच्या प्रयोगाखेरीज त्याला कोणतेही महत्त्व नव्हते !'

बेगिन यानी आणखी एक धक्का जगाला दिला. इराणने केला म्हणून ज्या पहिल्या हल्ल्याचा गवगवा झाला होता त्या हल्ल्यानंतर 'अल–थावरा' या बगदादच्या वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत सद्दाम हुसेन यानी आपली सर्व अणुतयारी इराणविरुद्ध नसून यहुदी तळाविरुद्ध आहे अशी खात्री दिली' असे बेगिन यानी सांगितले. सद्दाम हुसेन यांचे हे निवेदन ते इस्रायलविरुद्ध वापरण्यासाठी अणुबॉंब तयार करत असल्याची कबुलीच आहे असे सांगून बेगिन यानी आपल्या हल्ल्याचे समर्थन केले. वस्तुस्थिती काय आहे ते आम्ही पाहून काढले. मुळात तसले निवेदन सद्दाम हुसेन यांनी केलेच नव्हते! गुप्त आणि सांकेतिक शब्दात असंख्य तारा जगभर चक्कर मारीत राहिल्या; पण एकाही पत्रकाराला, एकाही मुत्सद्द्याला, वकिलाला ते निवेदन कोठेही आढळले नाही!

एका अमेरिकन मुत्सद्द्याने आम्हाला त्या निवेदनाचा तपास लागतो का पहा असे फोनवरून सांगितले होते. ते निवेदन काय आहे राहिला नाही. वगैरे.

परमाणुयुद्धाचा भडका हे आता आजच्या जीवनाचे एक कठोर वास्तव बनले आहे. परमाणु-व्यवस्था घोर संकटात सापडली आहे. जगातील दोन महाशक्तींच्या बरोबरीने आता आणखी तीन शक्ती-जवळ अणुबॉंब तयार आहे. महाशक्तीजवळ हे महाभयंकर अस्त्र गेली ३६ वर्षे आहे; पण भडका उडालेला नाही; परंतु महाशक्तींच्या या भयानक शर्यतीत आता आणखीही राष्ट्रे उतरली आहेत. अण्वस्त्राच्या प्रसाराला आळा बसणे तर राहोच; पण त्यांचा झपाट्याने प्रसार झालेला आहे. आजवर ज्या महाशक्तींच्या हाती अणुबॉंब होता त्यांच्या देशातील राज्यव्यवस्था मजबूत आणि स्थिर तरी होती; परतु आता कमालीच्या उच्छृंखल आणि अतिशय अस्थिर राजवटी लाभलेल्या पश्चिम व दक्षिण आशियातील देशांच्या हाती हे अस्त्र पोहोचले आहे.

रशिया आणि अमेरिका यांच्या नेतृत्वापेक्षा जनरल झिया, सद्दाम हुसेन, आयातुल्ला खोमेनी, इंदिरा गांधी किंवा मेनॅचेम बेगिन याचे नेतृत्व नेहमीच कमी जबाबदार असते असे आम्हाला सुचवायचे नाही. हे नेतृत्व पुरेसे 'सावध' नसते असेही आम्हाला म्हणायचे नाही. धर्मवेडे मुल्ला, लष्करी हुकुमशहा किंवा सामूहिक कत्तली करणारे इदि अमीन किंवा सम्राट ओकासा यांच्याबाबत कुणी काहीही म्हटले तरी युरोपातील गोऱ्या कातडीच्या ॲडॉल्फ हिटलर नावाच्या माणसानेच जगाला इतके भयंकर हादरे दिले की, तिसऱ्या जगातील

## जगातील दोन महाशक्तींच्या बरोबरीनें आणखी तीन शक्तींजवळ अणुबॉंब तयार आहे.

ते आम्हा दोघांना चांगले माहीत होते. कित्येक महिने आधीच एका इस्रायली अधिकाऱ्यानेच ते आम्हाला दिले होते; पण ते कुठे केलेले आहे, ते काही आम्हाला हुडकून काढता आलेले नव्हते. तसे आम्ही त्या इस्रायली अधिकाऱ्याला सांगितलेही; पण तो म्हणाला– 'विश्वासाने घ्या, आमच्यावर विश्वास ठेवा !' या इस्रायली माणसाने आम्हाला ज्या इतर गोष्टी सांगितल्या होत्या त्या खऱ्या होत्या आणि म्हणूनच आमची जाणूनबुजून दिशाभूल करण्याचा तो प्रयत्न करीत असेल असे मानण्याचे आम्हाला त्या वेळी तरी कोणतेही कारण दिसत नव्हते. बेगिन याना वाटत होते तसेच या इस्रायली माणसालाही प्रामाणिकपणे वाटत होते की, सद्दाम यानी तसे निवेदन केलेले आहे आणि इराकचा इरादा अणुबॉंब तयार करण्याचा आणि तो इस्रायलविरुद्ध वापरण्याचाच आहे.

वस्तुस्थिती अशी होती की, ते निवेदन चक्क बनवाबनवीचे होते. सद्दाम हुसेन यांनी तसे कोठेही म्हटलेलेच नव्हते आणि अल–थावरा या वृत्तपत्राने ते कधीही छापलेलेच नव्हते. मग इस्रायली अधिकाऱ्यांनी खुलासा केला की 'अल–जुमुहुरिया' या बगदादच्या सरकारी दैनिकाने संपादकीय लिहिले होते आणि त्यातील प्रतिपादनाचा तोंडावळा काहीसा या निवेदनासारखा होता; पण त्याचा अर्थ मात्र सर्वस्वी वेगळा होता. तेल अवीवच्या सरकारी भाषांतऱ्याने चूक केली आणि बेगिन यांनाही आपल्या समर्थनार्थ एक चागला मुद्दा मिळाल्यामुळे तो मांडण्याच्या घाईत तथ्ये तपासून घ्यायला वेळ कोणताही शासक कल्पनाही करू शकला नसता हे सत्य कुणीही विसरू नये ! त्याचप्रमाणे जपानवर पहिला अणुबॉंब अमेरिकेनेच टाकला हेही विसरता कामा नये !

असे असले तरी नव्याने अण्वस्त्रसज्ज झालेली राष्ट्रे त्यांचा वापर करण्याच्या बाबतीत जुन्या राष्ट्रांपेक्षा आधाडीवर राहतील अशीच शक्यता आहे. झियाचा पाकिस्तान कमालीचा अस्थिर आहे. राज्यक्रांती किंवा उघड बंड किंवा भयंकर यादवी माजवण्याचा संभव तेथे सर्वांत जास्त आहे. तेथील लष्कराजवळही अण्वस्त्राच्या माथेफिरू किंवा अनवधानाने होणाऱ्या वापरावर अंकुश ठेवू शकेल अशी अद्यावत यंत्रणा नाही. इराकच्याही बाबतीत परिस्थिती अशीच आहे. देशातीलच शिया आणि कुर्द या दोघांच्या विरोधात असलेला हुकुमशहा सद्दाम हुसेन तेथे राज्य करतो आहे खरा; पण इराणचा पराभव करता आला नाही आणि ओसिराकचे रक्षण करता आले नाही, या दोन जबरदस्त गोष्टी त्याच्याही विरुद्ध जाऊन त्याचे आसन डळमळीतच झालेले आहे.

लोकशाहीवादी आणि अंतर्गत स्थिरस्थावरता लाभलेल्या भारत आणि इस्रायल या दोन्ही अण्वस्त्रसज्ज होण्याचा मार्ग निष्कंटक असलेल्या देशातही त्यांच्यापाशी अणुबॉंब असणे हा मोठाच धोका बनलेला आहे. भारतातील लोकांना अजूनही आपल्या नेतृत्वाखाली अखंड भारतीय उपखंड यावा अशी स्वप्ने पडत आहेत आणि पाकिस्तान अणुबॉंब तयार करू लागला आहे ही गोष्ट त्यांना चांगलीच

अस्वस्थ करणारी ठरत आहे. पाकिस्तानी लोकांनाही भारताबद्दल नेमके असेच वाटत आहे. इस्रायल हे चारी बाजूंनी त्याच्या शत्रूंनी वेढलेले आणि सतत अस्तित्वलोपाच्या संकटात वावरणारे राष्ट्र आहे. आपले अस्तित्व धोक्यात येत आहे असे दिसताच क्षणार्धात भयंकर स्फोट उडवून देण्याच्या मनोवृत्तीचे आणि क्षमतेचे नेतृत्व बेगिन यांच्या रूपाने त्याला लाभलेले आहे.

आपल्या शत्रुदेशांना अण्वस्त्रसज्ज होण्यास मदत करणाऱ्या देशातील अधिकाऱ्यांना, कंपन्यांना, कामगारांना दहशत वाटावी असे इस्रायली बॉंबस्फोट व धमकीपत्रे अजूनही चालूच आहेत. अरबांनी जर इस्लामिक बॉंब आपल्यापाशी असल्याचे जाहीर केले, तर इस्रायल ‘आमच्यापाशी तो तुमच्याही आधीपासून आहे, हा पहा !’ असे म्हणत जाहीरपणे त्याचा स्फोट करून दाखवायला कमी करणार नाही. शक्तिसमतोलाने शांतता आजवर राहात होती. यापुढे ती भीतिसमतोलाने राहणार आहे; पण खरेच राहणार आहे काय ?

इंदिरा गांधी वरचेवर म्हणत आहेत की, आम्ही अणुबॉंब तयार करू शकतो; पण आम्हाला तो करायचा नाही. कुणाला वचक बसावा म्हणून भारताला अण्वस्त्रधारी व्हायचे नाही. फार चांगले विधान आहे हे; पण उद्या परिस्थिती बदलली तर अणुबॉंब तयार करायला भारत मोकळा आहे. पोखरण येथे मे १९७४ मध्ये अणुविस्फोट करून भारताने जगाला धक्का दिलेला आहे. त्याच ठिकाणी भारताने आता नवे बोगदे खोदायला सुरुवात केल्याची माहिती अमेरिकन गुप्तचरांनी जाहीर केलेली आहे. अण्वस्त्रप्रसारबंदी-तहावर सही करायला भारत अजूनही नकारच देतो आहे. तारापूर आणि तुर्भे येथील अणुभट्ट्यांपासून अक्षरशः शेकडो नागासकी धर्तीचे अणुबॉंब तयार करण्याचे सामर्थ्य भारताजवळ आलेले आहे. भारताजवळील प्लुटोनियमचे साठे अमेरिकेच्याही चिंतेचा विषय बनलेले आहेत. के. के. सुब्रह्मण्यम आणि कृष्णचंद्र पंत यांच्यासारखी जाणती माणसे भारताने अणुबॉंब का अगदी हायड्रोजनबॉंबदेखील बनवायला काहीच हरकत नाही असे म्हणत आहेत.

अशा प्रकारे एके काळी अण्वस्त्रप्रसाराला आळा घालण्याच्या बाबतीत बिनीवर असलेली राष्ट्रे आता मागे पडली आहेत. अण्वस्त्रांचा प्रसार झपाट्याने होत आहे. फक्त महाशक्तींमध्येच नव्हे तर पाच बड्या राष्ट्रांत आणि इस्रायलपासून भारतापर्यंत आणि पाकिस्तानपासून इराक आणि पलीकडील लहान लहान देशांपर्यंत अण्वस्त्रांचा प्रसार वेगाने झालेला दिसतो आहे. अण्वस्त्रप्रसाराला आळा घालणारी लक्ष्मणरेषा झपाट्याने पुसून चालली आहे. पाणलोटरेषा पाकिस्तान आहे. इस्लामिक बॉंब तेथे साकारला आहे. बाकी सर्व प्रतिक्रिया आहेत. अत्यंत ज्वालाग्राही प्रवृत्तीच्या अस्थिर राजकारणाने ग्रासलेल्या पश्चिम आशियासारख्या भूभागात अण्वस्त्रांचा प्रसार हा या पिसाट स्पर्धेचा परमोत्कर्ष किंवा अपकर्षबिंदू आहे.

ही पिसाट शर्यत आहे. वेडी धाव आहे. या शर्यतीत कुणाचाच विजय होणे शक्य नाही; पण लक्षात कोण घेतो ?

**समाप्त**


# आणखी एक पेन्शन!



निवृत्ती नंतर, आपण आयुष्यभर केलेल्या
सेवेची भरपाई म्हणून आपल्याला,
निवृत्ती वेतन, प्रॉव्हिडंड फंड
ग्रॅच्युइटी इ. फायदे मिळणारच!
पण मिंटीच्या सदाफुली सारख्या
योजनेत काही वर्ष बचत
केलीत तर आणखी एक
हक्काची पेन्शन सुरु होईल

केवळ आपल्यालाच नव्हे
तर वारसांना देखील! अधिक माहितीसाठी
आपल्या नजिकच्या आमच्या शाखेस
भेट द्या.

बॅंक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कचेरी : "लोकमंगल" शिवाजीनगर पुणे – ४११ ००५

RAAS

# १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध, मार्क्स आणि सावरकर

अविनाश सहस्रबुद्धे

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स ह्यांनी १८५७ ते १८५९ या तीन वर्षांत 'न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून'मधून त्याच काळात हिंदुस्थानात झालेल्या राष्ट्रीय मुक्ती–उठावाबाबत अनेक लेख लिहिले. त्यातील बहुतेक लेख हे मार्क्सने लिहिले होते. भारतीय फौजेविषयीचे लेख मात्र एंगल्सने लिहिले होते. हे लेख मार्क्स व एंगल्स ह्यांनी भारतात १८५७ चा विद्रोह पेटत असतानाच लिहिलेले असल्यामुळे त्याचे विशेष महत्त्व आहे. 'न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून'मधून लेखमालेच्या स्वरूपात लिहिलेले हे लेख नंतर बरोबर शंभर वर्षांनी म्हणजे १९५९ साली मॉस्कोहून 'हिंदुस्थानातील पहिले स्वातंत्र्ययुद्ध' ( The First Indian War of Independence ) या नावाने पुस्तकरूपाने प्रकाशित झाले. मार्क्सने भारतातील पहिल्या राष्ट्रीय विद्रोहाविषयी इतके विस्तृतपणे लिहिले असले तरी भारतात त्याची म्हणावी तशी दखल घेतली गेली नाही. अनेक मार्क्सवाद्यांनाही मार्क्सने १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धासंबंधी अशा प्रकारचे अनेक लेख लिहिले होते हे ठाऊकही नसेल ! या क्षेत्रातील जाणकारांनीही मार्क्सच्या भारतावरील १८५३ मधील लेखनावरच विशेष भर दिला. जणू काही १८५३ नंतर मार्क्सने भारतातील घडामोडींवर काही लिहिलेच नाही ! ज्या इतिहासकारांना १८५७चे स्वातंत्र्ययुद्ध हे स्वातंत्र्ययुद्ध वाटतच नव्हते तर केवळ 'शिपायाचे बंड' वाटत होते त्यांनी मार्क्सच्या या लेखाकडे दुर्लक्ष करणे तर अगदी स्वाभाविक होते.

'१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हे पुस्तक सावरकरांनी १९०८ साली म्हणजे वयाच्या पचविसाव्या वर्षी लंडनमध्ये लिहिले मुळात सावरकरांनी ते मराठीत लिहिले असले तरी आज त्याचे मूळ मराठी स्वरूप कितपत राहिले असावे याविषयी शंका आहे. १९०८ साली सावरकरांनी मूळ मराठी हस्तलिखित लंडनहून भारतात प्रकाशित करण्यासाठी पाठवले; परंतु इंग्रज सरकारने ते प्रकाशित होऊ दिले नाही. काही क्रांतिकारकांचा कसेही करून - पुस्तक छापायचेच असा निर्धार असल्यामुळे त्यांनी ते जर्मनीत छापण्याचा प्रयत्न केला; पण तेथे मराठी टाइप व जुळारी नसल्यामुळे मराठी हस्तलिखिताचे इंग्रजी भाषांतर करून ते बंदी असतानाही परदेशात १९०९ मध्ये छापण्यात आले. पुढे श्रीमती कामा, लाला हरदयाळ (गद्दर पार्टीचे संस्थापक) ह्यांनी त्याच्या आवृत्त्या छापल्या. जर्मन भाषेतही नंतर त्याचे भाषांतर झाले. १९२८–२९ मध्ये सरदार भगतसिंग यांनी लाहोरमध्ये त्याची भूमिगत आवृत्ती काढली. नंतर १९४५ साली रासबिहारी बोस यांनी जपानमध्ये आझाद हिंदसेनेसाठी एक स्वतंत्र आवृत्ती प्रसिद्ध केली. सन १९४६ मध्ये जेव्हा पुस्तकावरील बंदी उठली, तेव्हा मूळ मराठी प्रत उपलब्ध नसल्याने इंग्रजी प्रतीवरून मराठी भाषांतर करून ते गोडसे–आपटे ह्यांनी हिंदुराष्ट्र प्रकाशनाच्या वतीने प्रसिद्ध केले. नंतर डॉ कुरिन्हो यांनी ४० वर्षे जपून ठेवलेली मूळ मराठी प्रतही प्रकाशित झाली; परंतु त्यातील दोन प्रकरणे हरवलेली होती !

१८५७ चे युद्ध हे भारतातील पहिले स्वातंत्र्ययुद्ध होते किंवा नाही याविषयी खूप चर्चा झाली आहे. मार्क्सचे यासबंधी काय विचार होते याचा आधी विचार करू.

१८५० च्या आरंभापासूनच मार्क्स आणि एंगल्स ह्यांनी भांडवलदारी देशांच्या वासाहतिक धोरणाबद्दल बरेच लिहिले आहे. त्यांनी प्राच्य देशांच्या इतिहासाचा, आशियामधील वासाहतिक व पराधीन देशांच्या इतिहासाचा, त्यातही हिंदुस्थान आणि चीनचा विशेष अभ्यास केला होता. भांडवलदारी वासाहतिक धोरणाचे लक्ष्य ठरलेल्या ह्या देशांबद्दल त्यांना स्वारस्य वाटत होते. हिंदुस्थान आणि चीनमधील सरंजामशाहीचे भांडवलदारी विकासामध्ये स्थित्यंतर होत असताना त्यातून परिपक्व होत असलेल्या दूरगामी बदलांचा क्रांतिकारक प्रभाव हा एक नवा महत्त्वाचा घटक असून, नजीक यऊन ठेपलेल्या युरोपीय क्रांतीवर त्याचा अपरिहार्यपणे परिणाम होईल, असे त्यांचे मत होते. १८५७ मधील हिंदुस्थानातील घडामोडींचा मार्क्स आणि एंगल्स ह्यांनी एवढ्या बारकाईने, अगदी बारीक–सारीक तपशिलात शिरून मागोवा का घेतला याचा त्यामुळे खुलासा होतो. १८५७ च्या युद्धातील सर्व मुख्य घटनांवर त्यांनी आपली प्रतिक्रिया नोंदवली आहे हा विद्रोह घडण्याच्या कारणाची, त्याच्या पराभवाच्या कारणाची, संघर्षाची तसेच या युद्धाशी जाऊन पोहोचणाऱ्या सामाजिक–आर्थिक संबंधाचीही त्यांनी आपल्या लेखांमधून मीमांसा केली आहे. १८५० च्या सुमारास जवळजवळ सबंध आशियातील पराधीन देशांमध्ये आकार घेणाऱ्या सार्वत्रिक वसाहतविरोधी विमोचन लढ्याचाच भारतातील हा उठाव म्हणजे एक अंगभूत भाग आहे असे त्याचे स्पष्ट मत होते व हेच त्यांच्या या मीमांसेचे सूत्र आहे असे म्हणता येईल.

## शेतकरी का सामील झाले ?

१८५३ मध्ये ब्रिटिश संसदेने ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदाच्याची जी नव्याने सुधारणा केली त्यासंबंधात मार्क्सने, 'हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्ता', 'ईस्ट इंडिया कंपनी–तिचा इतिहास आणि तिच्या कार्याचे परिणाम' व 'हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्तेचे भावी परिणाम' असे तीन लेख लिहिले. हिंदुस्थानाच्या इतिहासावरील अधिकारी व्यक्तीच्या संपूर्ण अभ्यासावर आधारलेले असे हे लेख आहेत. राष्ट्रीय वासाहतिक प्रश्नावरील त्याच्या सर्वोत्तम लेखनकृती-

मध्ये या लेखांचा समावेश करावा लागेल. वास्तवात ह्या लेखांनी १८५७ चा उठाव हा अपरिहार्य का होता व त्याची कारणे तत्कालीन आर्थिक, राजकीय परिस्थितीत कशी होती हेच दाखवून दिले आहे. हिंदुस्थानला जिंकून त्याला गुलाम कसे बनविण्यात आले याचे सखोल व शास्त्रशुद्ध विवेचन या लेखामधून मार्क्सने केले आहे. ब्रिटिश वासाहतिक सत्तेच्या व शोषणाच्या विविध पद्धतीची चर्चाही त्यानी केली आहे ईस्ट इंडिया कंपनी हे हिंदुस्थान जिंकण्याचे एक साधन होते. *स्थानिक राजांमधील सरजामी* दुहीचा फायदा उठवून व हिंदुस्थानामधील जनतेत वाशिक, धार्मिक व जातिविषयक वैरभावना भडकवून, तसेच तिचे आर्थिक शोषण करून ब्रिटिशांनी या देशावर आपली सत्ता कायम केली असे मार्क्सने सांगितले आहे. इथल्या आर्थिक शोषणाची चर्चा करताना मार्क्सने हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्ताधाऱ्यानी रयत–किसानांवर असह्य करांचे ओझे लादून त्याला स्थानिक सरंजामी श्रीमंतांच्या व वासाहतिक राज्याच्या दुहेरी जोखडाला कसे जुपले हेही दाखवून दिले आहे. १८५७ च्या लढ्यात शेतकरीही सामील झाले त्याला हेही एक कारण आहे की, शेतकऱ्याला कराचे प्रचड ओझे सहन करावे लागत होते. तसेच करवसुली अधिकाऱ्याची बळजबरी, हिंसा, क्रूर वागणूकही सहन करावी लागत होती.

२८ जुलै, १८५७ च्या लेखात मार्क्सने ब्रिटिश मुत्सद्दी व टोरी पुढारी बेन्जामिन डिस्रायली ( Benjamin Disraeli 1804–81 ) याच्या भाषणातले उतारे दिले आहेत. डिस्रायलीच्या भाषणाचे सारतत्त्व हे होते की, भारतावरील ब्रिटिश साम्राज्य आता पतनाच्या मार्गावर आहे. भाषणाचा गोषवारा देऊन मार्क्स म्हणतो की, 'डिस्रायलीच्या मतानुसार, 'गेल्या दहा वर्षांपर्यंत हिंदुस्थानातील ब्रिटिश *साम्राज्य* divide et impera च्या जुन्या तत्त्वावर आधारलेले होते; पण हिंदुस्थान ज्या भिन्न राष्ट्रजमातींनी बनला त्या सर्वांचा मान राखून, त्यांच्या धर्मात ढवळाढवळ करण्याचे टाळून आणि त्यांची जमीनजुमल्याची मालमत्ता सुरक्षित राखून हे तत्त्व कृतीत आणले होते. देशातील वादळी भावना शोषून घेण्यास सुरक्षा–झडप म्हणून शिपायाच्या फौजेचा उपयोग झाला; परंतु अलीकडे हिंदुस्थान सरकार एक नवे तत्त्व अमलात आणीत आहे, ते म्हणजे हिंदुस्थानातील राष्ट्रजमाती नष्ट करणे. स्थानिक राजांचा बळजबरीने नाश करून, मालमत्तेच्या व्यवस्थेत गोंधळ निर्माण करून व लोकांच्या धर्मात ढवळाढवळ करून या तत्त्वाची अमलबजावणी केली जात आहे. १८४८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या आर्थिक अडचणी अशा थराला पोचल्या की, या ना त्या तऱ्हेने उत्पन्न वाढविणे त्याना भागच पडले. मग कौन्सिलमध्ये एक टिपण प्रसिद्ध करण्यात आले. त्यात अगदी उघडपणे नमूद करण्यात आले होते की, स्थानिक राजांच्या प्रदेशाचे अपहरण करून, पर्यायाने ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार करून केवळ उत्पन्न वाढविणे शक्य आहे. त्यानुसार सातारच्या राजाच्या ( अप्पासाहेब– ) मृत्यूनंतर, त्याच्या दत्तक वारसाला ईस्ट इंडिया कंपनीने मान्यता दिली नाही, उलट ते राज्य स्वतःच्या वर्चस्वाखाली सामील करून घेतले. तेव्हापासून जेव्हा जेव्हा नैसर्गिक वारसाविना स्थानिक राजा मृत्यू पावला, तेव्हा तेव्हा खालसाकरणाची पद्धत अंमलात आणली जाऊ लागली. हिंदुस्थानी समाजाची कोनशिला असलेले दत्तकविधानाचे तत्त्व सरकारने पद्धतशीरपणे बाजूला सारले. अशा प्रकारे १८४८ ते ५४ पर्यंतच्या काळात सुमारे डझनाहून अधिक स्वतंत्र राजांची राज्ये ब्रिटिश साम्राज्यात सक्तीने विलीन करण्यात आली! १८५४ मध्ये ८० हजार चौरस मैल टापूचे, अंदाजे ५० लक्ष लोकसंख्येचे वऱ्हाडचे राज्य व त्याचे प्रचंड खजिने सक्तीने ताब्यात घेण्यात आले. या सक्तीच्या खालसाकरणाची यादी डिस्रायलींनी अयोध्येच्या खालसाकरणाबरोबर संपवली आहे *या खालसाकरणामुळे ईस्ट इंडिया* सरकारचे केवळ हिंदूशीच नव्हे तर मुसलमानांशीही वैर निर्माण झाले!

## एक राष्ट्रीय उठाव

डिस्रायलीच्या या वक्तव्यावरून १८५७ च्या विद्रोहामागील राष्ट्रीय स्वरूप स्पष्ट होते. हे फक्त सैनिकांचे बंड नव्हते तर खालसा झालेल्या राज्यांचे राजेही त्यात सामील झाले होते. तसेच असह्य वासाहतिक दडपणाविरुद्ध संघर्ष करण्यासाठी एकत्र आलेली हिंदुस्थानी जनता हीच उठावामागील प्रेरक शक्ती होती. हा उठाव म्हणजे सशस्त्र शिपायाचे बंड होते असे चित्र रंगविण्याचा व *हिंदुस्थानी जनतेचा त्या उठावात सहभाग होता हे लपविण्याचा प्रयत्न* करणाऱ्या ब्रिटिश सत्ताधारी वर्गाच्या खोट्या मताला मार्क्स व एंगल्स यानी पार खोडून काढले आहे लेखकानी अगदी प्रथमपासून या आंदोलनाचे वर्णन, एक राष्ट्रीय उठाव–ब्रिटिश सत्तेविरुद्ध हिंदुस्थानी जनतेची क्रांती, असे केले आहे या उठावाने केवळ भिन्न धर्मांच्या ( हिंदु आणि मुस्लिम ) व जातींच्या ( ब्राह्मण, रजपूत आणि काही बाबतीत शीख) लोकानाच नव्हे तर भिन्न सामाजिक श्रेणींतील लोकांनाही एकत्र आणले ह्यावर मार्क्स आणि एंगल्स यानी भर दिला आहे मार्क्स यानी लिहिले आहे, 'प्रथमच शिपायाच्या तुकड्यांनी आपल्या युरोपीय अधिकाऱ्याचे खून केले, प्रथमच हिंदु–मुसलमान आपापसातील वैमनस्ये विसरून आपल्या सामायिक मालकांविरुद्ध एक झाले *प्रथमच हिंदूनी चालू केलेल्या* ह्या उठावाची परिणती प्रत्यक्षात दिल्लीच्या तख्तावर मुसलमान सम्राटाला बसविण्यात झाली. हे बंड काही जातीपुरते मर्यादित नव्हते.' (पृ. ४३)

या उठावामध्ये प्रचंड जनसमूह सहभागी झाले होते, ही वस्तुस्थिती दडपून टाकण्याचे ब्रिटिश वृत्तपत्रानी जरी आटोकाट प्रयत्न केले, तरी मार्क्सने आपल्या लेखामधून निःसंदिग्धपणे सांगितले की, या विद्रोहामागे हिंदुस्थानी जनतेची केवळ सहानुभूतीच नव्हती, तर तिने उठावाला हरतऱ्हेने पाठिंबा दिला. 'हिंदुस्थानातील उठाव' या लेखात मार्क्सने बहुसंख्य किसानानी उठावामध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कसा भाग घेतला होता हे दाखवून दिले आहे. *इंग्रजाना आपल्या फौजाना रसद पुरविण्यात व वाहतुकीत आलेल्या* असंख्य अडचणी, हिंदुस्थानी किसानवर्गाची इंग्रजाबद्दलची शत्रुत्वाची भावनाच सिद्ध करतात असे मार्क्सने म्हटले आहे.

१८५७ च्या युद्धात हिंदु–मुसलमानानी एकत्र येऊन इंग्रजांशी लढा दिला ही गोष्ट मार्क्सच्या मते राष्ट्रीय भावनेचे उदाहरण आहे. इंग्रजांच्या फौजेत त्यापूर्वीही विद्रोहाच्या ठिणग्या उडाल्या

होत्या; परंतु त्या विद्रोहामागे राष्ट्रीयतेची भावना कधीच नव्हती. त्यामुळे १८५७ च्या विद्रोहाचे गुणात्मक स्वरूपच वेगळे होते. देशी फौजेच्या स्थापनेबद्दल मार्क्सने म्हटले आहे की, 'अशा फौजेची उभारणी करून इंग्रजानी आपल्या विरुद्धच्या असतोषाचे पहिले केंद्र स्थापन केले.' (याचा मथितार्थ हाच की, देशी फौजेच्या स्थापनेचा अपरिहार्य परिणाम राष्ट्रीय विद्रोहातच होणार होता. भारत अनेक राज्यांमध्ये विभागलेला असल्यामुळे विद्रोहाची भावना मुळातच क्षीण होती; परंतु इंग्रजानी केंद्रबद्ध फौजेची स्थापना करून विद्रोहाला व्यापक बळ प्राप्त करून दिले. जसे भांडवलदार उद्योगपती कारखान्यात हजारोंच्या संख्येने कामगाराना एकत्र करून आपल्याच विरुद्ध लढण्याचे त्यांना प्रशिक्षण देतात, त्याचप्रमाणे ब्रिटिश साम्राज्यवाद्यानी भारतात देशी फौजेची स्थापना करून आपल्या विरुद्धच्या बडाचीच तयारी करून ठेवली होती.) मार्क्सच्या मते देशी फौजेने राष्ट्रीय विद्रोहात महत्त्वाची कामगिरी बजावावी अशी स्थिती इंग्रजानी स्वत:च निर्माण करून ठेवली होती.

स्वातंत्र्याची प्रत्येक चळवळ यशस्वी होईलच हे जसे खरे नव्हे, तसेच यशस्वी झाली नाही म्हणून ती चळवळ राष्ट्रीय नव्हती असे म्हणणेही योग्य ठरणार नाही एकमेव केंद्रीय, मध्यवर्ती राजकीय नेतृत्वाचा व एकमेव लष्करी नेतृत्वाचा अभाव, हे राष्ट्रीय सग्रामाच्या अपयशाच्या अनेक कारणापैकी एक कारण आहे, असे मार्क्स आणि एंगल्स यांचे मत होते. अतर्गत दुही आणि उठावाच्या छावणीत फूट याबाबत तेच लागू पडते. निकृष्ट लष्करी ताकद आणि सुसज्ज युरोपीय सेनेविरुद्ध लढाई करण्याचा अननुभव ह्या गोष्टीही उठावाच्या अतिम अपयशास मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरल्या. उठावाचा अंगभूत प्रकार अस्थिर होता, त्यामुळे लष्करी कारवायांच्या यशाच्या शक्यता कमी झाल्या आणि उठावाच्या नीतिधैर्यावर प्रतिकूल परिणाम घडला. उठावखोरामध्ये त्यामुळे गोंधळ माजला आणि अखेरीस त्यातच त्याचा पराभव झाला. ('दिल्लीचा पाडाव', 'लखनौचा पाडाव', 'लखनौवरील हल्ल्याचा तपशील' ही प्रकरणे). तरीही मार्क्स आणि एंगल्स नमूद करतात की, सर्व कष्ट आणि अडचणी सोसूनही, उठावखोरांनी उठावाच्या मुख्य ठाण्यावर—दिल्ली व लखनौ येथे—अत्यंत धैर्याने झुज दिली. दिल्लीचे रक्षण करण्यात अपयश आले, तरी एकूण राष्ट्रीय उठावाच्या पूर्ण ताकदीचे त्यांनी दर्शन घडविले. मात्र गनिमी युद्धतंत्रात त्याची ही ताकद दिसली तशी खुल्या लढायामध्ये दिसली नाही, असे एंगल्स यांनी नमूद केले आहे.

'सुसंस्कृत' ब्रिटिश वासाहतिक सेना, पराभूत क्रांतिकारकांना तिने दिलेली पाशवी वागणूक, काबीज केलेल्या उठावखोर शहराची व खेड्याची तिने केलेली लुटालूट यांचे वर्णन मार्क्स आणि एंगल्स यांनी आपल्या अनेक लेखामधून केले आहे.

१८५७ च्या राष्ट्रीय विद्रोहाच्या ऐतिहासिक प्रभावाचे मूल्यमापन करताना मार्क्सने दाखवून दिले की, हिंदुस्थानातील वासाहतिक राजवट काही सुस्पष्ट मर्यादेपर्यंत बदलण्यात त्याला अपयश आले असले, तरी त्याने वासाहतिक गुलामगिरीबाबत हिंदुस्थानी जनतेच्या मनात असणारा सार्वत्रिक तिटकारा व्यक्त केला व स्वातंत्र्याची तिची प्रेरणा व निर्धार दाखवून दिला. या विद्रोहामुळे ब्रिटिशांना आपल्या वासाहतिक सत्तेच्या प्रकारांमध्ये व पद्धतीमध्ये काही अंशी बदल करणे भाग पडले. इतर काही गोष्टीबरोबर, हिंदुस्थानी जनतेमध्ये आपल्या धोरणाने असंतोष निर्माण करणाऱ्या ईस्ट इंडिया कंपनीला त्यानी विसर्जित केले.

मार्क्सने इंग्रजी राजवटीत करवसुलीसाठी शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाचे व दमन–यंत्रणेचे, छळणुकीचे वर्णन केले आहे जे 'न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून'च्या माध्यमातून सर्वप्रथम जगासमोर आले. इंग्रजी राजवटीच्या या जुलुमशाहीतून सुटका करून घेण्यासाठीच भारतीय जनता १८५७ च्या आदोलनात सामील झाली होती. थोडक्यात जुन्या सरंजामी वर्गाचे स्थान इंग्रजांनी घेतले होते. त्यामुळे गरीब शेतकऱ्यावरील अत्याचार कमी न होता वाढलेच होते.

१८५७ च्या राष्ट्रीय आदोलनाचे, विद्रोहाचे मार्क्सने केलेले हे विवेचन व सावरकराची १८५७ च्या युद्धाविषयीची भूमिका आपण लक्षात घेतली तर असे दिसून येते की, दोघाच्याही विचारसरणीत बिलक्षण असे साम्य आहे. सावरकरानीही १८५७ च्या युद्धाला स्वातंत्र्याची लढाईच म्हटले आहे. त्याच्या दृष्टीने ही स्वधर्म व स्वराज्याची लढाई होती. इतकेच नव्हे तर ती क्राती होती. १८५७ च्या विद्रोहामागील हेतु काय होता, प्रेरणा कोणती होती, कोणत्या तत्त्वातून, परिस्थितीतून तो उद्भवला याचे विवेचन सावरकरांनी त्यांच्या पुस्तकात केले आहे सावरकरांची भाषा जरी ओजस्वी, अलंकारिक, पल्लेदार, भावपूर्ण अशी असली तरी त्याच्या विवेचनाची बैठक ऐतिहासिक आधारावरच आहे. स्वातंत्र्यचळवळीतील क्रातिकारकाना १८५७ च्या स्वातत्र्ययुद्धातून स्फूर्ती मिळावी हाच सावरकरांचा हे पुस्तक लिहिण्यामागचा उद्देश होता व तो पूर्णपणे सफलही झाला असे दिसते. या पुस्तकाने लाला हरदयाळासह अनेक क्रांतिकारकाना प्रभावित केले. नंतर भगतसिंहच्या पिढीतील क्रातिकारी तरुणानीही या पुस्तकातून विद्रोहाची प्रेरणा घेतली. भारतात त्या वेळी जे कोणी इंग्रजाविरुद्ध सशस्त्र आंदोलन करू इच्छीत होते ते गद्दरलाच आपला आदर्श समजत होते. त्याशिवाय अहिंसावादी नसलेले परंतु लगेच सशस्त्र आदोलनाचा पवित्राही घेऊ नये असे मानणारे जे होते तेही गद्दर (विद्रोह) परंपरेनेच प्रभावित झाले होते. सशस्त्र आदोलनाआधी शेतकरी व कामगारवर्गाला संघटित करणे महत्त्वाचे आहे अशी त्यांची धारणा होती.

## काडतुसाची कथा

सावरकराचे '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हे पुस्तक वाचल्यावर चटकन लक्षात येते ते हे की, सावरकरांनी गद्दर–परंपरेचा अगदी खोलात जाऊन अभ्यास केला होता. गद्दरसंबंधीच्या विवेचनात जे प्रश्न इतिहासकारांना पडले होते तेही त्यांनी समजावून घेतले होते. म्हणूनच काडतुसासंबंधीच्या प्रश्नावर ते इतके वस्तुनिष्ठ विचार मांडू शकले व इंग्रजांनी काडतुसांची जी कथा रचली होती ती कशी अनाठायी होती हेही दाखवू शकले. या कथेविषयी ते म्हणतात, '१८५७ सारखी प्रचड क्रांती असल्या कारणापासून उत्पन्न होईल हे म्हणणाऱ्या मंद किंवा दुष्ट बुद्धींना क्रांती म्हणजे एक 'अविचारी

मुर्खांचा समाज' होय असे वाटल्यास त्यात काही आश्चर्य नाही. जर ५७-ची क्रांती ही मुख्यतः काडतुसांवरूनच प्रदीप्त झाली होती, तर तिला नानासाहेब, दिल्लीचे बादशाह, झाशीची राणी, किंवा रोहिलखंडचे खानबहादुर खान हे का मिळाले; याना इंग्रजी लष्करात नोकरी धरावयाची नव्हती किंवा घरी बसले तरी ती लष्करी काडतुसे तोडलीच पाहिजेत असाही हुकूम कोणी त्याच्यावर केलेला नव्हता. जर ५७-ची उठावणी ही केवळ किंवा मुख्यतः काडतुसांच्या चर्बीनेच झाली होती तर हिंदुस्थानावरील इंग्रजी गव्हर्नर जनरलने ती न वापरण्याचा हुकूम सोडल्यावर ती झटकन शमलीही असती; परंतु शिपायानी आपल्या हाताने आपली काडतुसे बनवावी अशी सरकारी परवानगी मिळाल्यावरही तिचा उपयोग करून घेण्याऐवजी किंवा लष्करी नोकरी सोडून सर्वच कटकट मिटविण्याऐवजी लष्करी शिपायांनीच नव्हे, तर लष्कराशी ज्यांचा अर्थाअर्थी संबंध नाही अशा लाखो लोकांनी, राजांनी व महाराजानी आपले प्राण रणांगणात का खर्च केले? लष्करी व बिनलष्करी, राजा व रंक, हिंदु व मुसलमान या सर्वांना स्फुरण येण्यास असल्या किरकोळ गोष्टी कारणीभूत होत नसतात, तर त्या गोष्टीच्या मुळाशी असणारे तत्त्व त्यास कारणीभूत होत असते.' (पृ. ५)

## सर्वव्यापी असंतोष

सावरकरांनीच या गोष्टीकडे सर्वप्रथम इतिहासकारांचे लक्ष वेधले की, काडतुसामधील चर्बी जर युद्धाला कारणीभूत असती तर ती न वापरण्याची इंग्रजांनी घोषणा केल्यावर खर तर लढाई संपुष्टात यायला हवी होती; परंतु तसे झाले नाही व त्यानंतरही युद्ध चालूच राहिले. सावरकरांनी आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीकडे, वस्तुस्थितीकडे लक्ष वेधले. १७५७ च्या प्लासीच्या लढाईला १८५७ साली बरोबर शंभर वर्षे पूर्ण होत होती व त्याच वर्षी स्वातंत्र्य-युद्धाची सुरुवात करण्यात बंडखोरांनी, क्रांतिकारकानी एक प्रकारे औचित्यच साधले होते भारतीय इतिहासकारांनी हे कधी लक्षातच घेतले नाही की, शिपायांच्या मनात आपल्या गुलामगिरीची जाणीव १७५७ मध्येच सर्वप्रथम निर्माण झाली होती व ती नष्ट करण्यासाठी, तिच्याविरुद्ध लढा देण्यासाठी त्यानी १८५७ चे वर्ष निवडले होते. १८५७ च्या आधीही सैन्यात विद्रोहाचे, बंडाचे प्रसंग घडले होते व बंडखोर सैनिक भविष्यातील मोठ्या युद्धाचीच पार्श्वभूमी तयार करत होते. मार्क्सनेही याच गोष्टीकडे लक्ष वेधले आहे.

सावरकरांनी आपल्या पुस्तकात म्हटले आहे की, काडतुसाची भीती हे बडाचे प्रमुख कारण आहे ह्या म्हणण्यात जितकी अयथार्थता आहे तितकीच त्या बडाचा उगम केवळ अयोध्येच्या राजाला खालसा करण्यात आहे या म्हणण्यातही दिसून येईल.' (पृ. ५) सावरकर असे म्हणतात याचे कारण अयोध्येच्या राज्यातील हिताहिताशी ज्यांचा काहीएक संबंध नव्हता असे किती तरी लोक या युद्धात हातावर शिर घेऊन लढत होते! खुद्द अयोध्येचे नबाब तर कलकत्त्याच्या किल्ल्यात अटकेत होते व त्याची प्रजा इंग्लिश इतिहासकारांच्या म्हणण्याप्रमाणे नबाबाच्या अमलात अत्यंत नाखूष झालेली होती. मग पंजाबपासून ते बंगालपर्यंत फक्त राजेच नव्हेत किंवा फौजेतील शिपाईच नव्हेत तर सर्वसामान्य लोकही १८५७ च्या युद्धात सामील होण्याचे कारण काय? कारण एकच व ते म्हणजे जनसामान्यांपर्यंत पसरलेली इंग्रजी राजवटीविरुद्धची असंतोषाची, विद्रोहाची भावना! मार्क्सने १८५७ च्या विद्रोहातील जनसामान्याच्या सहभागाचे, विद्रोहाच्या व्यापक स्वरूपाचे जसे वर्णन केले आहे तसेच सावरकरांनीही केले आहे. तेव्हा काडतुसांची भीती किंवा अयोध्येचे खालसा केलेले राज्य ही आनुषंगिक व आकस्मिक कारणे होत. ह्यांनाच प्रधान कारण समजले तर सत्तावनच्या क्रांतीचे खरे स्वरूपच कळणार नाही!

मुसलमान जेव्हा भारतात विदेशी शासक म्हणून राज्य करीत होते तेव्हा त्यांच्याविरुद्ध येथे अनेक ठिकाणी-विशेषतः महाराष्ट्रात संघर्ष झाले होते. १८५७ च्या युद्धात प्रथमच हिंदु व मुसलमान विदेशी शासक इंग्रजांविरुद्ध लढले. नानासाहेब व अझीम उल्ला खान या दोघांचा सहयोग हा एक प्रकारे हिंदु-मुस्लिम-एकतेचाच प्रतीक होता. १९२० मध्ये महात्मा गांधी, मौलाना शौकत अली, मुहम्मद अली याच्यात जशी एकता स्थापित झाली होती, तिच्या तुलनेत नानासाहेब व अझीमउल्ला याच्यामधील एकी अधिक बळकट होती. तिची तुलना शहीद रामप्रसाद बिस्मिल व अशफाक उल्लाह याच्यातील मैत्रीशीच होऊ शकते. अझीमउल्लाची गणना सावरकरांनी स्वराज्यसंग्रामातील अत्यंत बुद्धिमान व प्रतिभाशाली व्यक्तीमध्ये केली आहे. मार्क्सप्रमाणेच सावरकरानीही बहादुरशहाच्या दिल्लीच्या गादीवर बसण्याच्या घटनेचा उल्लेख करून हिंदु-मुसलमान सत्तावनच्या युद्धात कसे एकत्र येऊन लढले हे सांगितले आहे.


**DIAMOND GROUP**

Ward 9, H. No. 637/1, Station Road,
ICHALKARANJI

*For* **quality Warping, Sizing, weaving, Bleaching, & Mercersing.**

*Phone : 2442*

## वीर–काव्याचा नायक

कुंवरसिंहाविषयी सावरकरांनी जे लिहिले आहे त्यातून त्याच्या रणकौशल्याची–विशेषेकरून गनिमी काव्यातील डावपेचांची–विस्तृत माहिती मिळते. सावरकरांनी कुंवरसिंहचे वर्णन असे केले आहे, ‘ कुंवरसिंहची भूमिका ही एखाद्या वीरकाव्याच्या नायकस्थानी शोभू शकेल. सत्तावन्नच्या क्रांतियुद्धाला जर कोणी सर्व दिशेने योग्य असा पुढारी शोभत असेल तर तो कुंवरसिंह होय ! युद्धकलेत तर त्याचा कोणीही हात धरणारा नव्हता. स्वातंत्र्ययुद्धात गनिमी काव्याचे किती महत्व आहे हे प्रथमतः कुंवरने ओळखले व शिवरायाच्या गनिमी काव्याची बरोबर नक्कल कशी करावी हे त्यानेच काय ते सिद्ध करून दाखवले ! तात्या टोपेंच्या व कुंवरसिंहाच्या युद्धचातुर्याची तुलना केल्यास कुंवरचां गनिमी पद्धतच जास्त बिनतोड होती असे दिसून येईल !’ (पृ. ३२५) तात्या टोपे व कुंवरसिंहच्या रणकौशल्याचा सावरकरांनी जो तुलनात्मक विचार केला आहे तो या पुस्तकातील श्रेष्ठ अंश आहे असे म्हणता येईल. या संदर्भात सावरकर म्हणतात, ‘ तात्यांनी गनिमी काव्याचा निषेधरूपात अत्यंत चातुर्याने प्रयोग केला; परंतु कुंवरने निषेधरूपाप्रमाणेच विधिरूपातही वृकयुद्धाची पूर्णता करून दाखविली! तात्यांनी सैन्याचा नाश तेवढा होऊ दिला नाही; परंतु कुंवरने ते करून शिवाय परसैन्याचाही वेळोवेळी नाश केलेला आहे. गनिमी काव्यात पूर्ण विजय येण्यासाठी ही सावधगिरी घेणे भाग असते की मोठ्या शत्रूच्या पुढून नेहमी पळत असता, त्या अपजयांनी स्वकीय सैन्य हताश वा भयभीत न झाले पाहिजे. जाणून–बुजून स्वीकारलेल्या पराजयांनी त्यांची आत्मनिष्ठा सुटणार नाही व लढाईच्या वारंवार चाललेल्या टाळाटाळीने लढाईचा त्यांना कायमचाच धाक बसणार नाही ह्याबद्दल वृकयुद्धाच्या सेनानींनी नेहमी काळजी घेतलेली असावी. लढाई टाळणे ही गोष्ट निराळी व लढाई देण्यात भित्रेपणाने अपयश घेऊन मागे फिरणे ही गोष्ट निराळी. तेव्हा गनिमीकाव्यात भित्रेपणाने अपयश घेऊन केव्हाही मागे फिरू नये तर लढाई देणेच झाले असता अशा रीतीने द्यावी की, शत्रूला आपल्या शौर्याचा जबर धाक व आपल्या सैन्याला आत्मनिष्ठेची स्फूर्ती प्राप्त व्हावी. मुख्य खुबी जी सेनानीच्या अंगी पाहिजे ती ही की, आपले फार नुकसान होईल अशा ठिकाणी तोंड देणेच टाळीत जावे; परंतु जेव्हा तोंड लागेल तेव्हा असे शौर्य गाजवावे की जसे बाजीने पावनखिंडीत वा कुंवरने तानूनदीवर गाजविले. सारांश, फायदेशीर नसल्यास लढाई टाळावी. फायदेशीर असल्यास लढाई द्यावी; परंतु केव्हाही रणामध्ये भित्रेपणाने वा बेशिस्तीने बदलौकिक करून घेऊ नये. शौर्याने अशी झुंज घेत रहावी की; रणात अपयश आले तरी जगात सत्कीर्तीच वाढली पाहिजे ! म्हणजे शत्रूला धाक बसतो. स्वसैन्यात अनीती वाढत नाही, शिस्त सुटत नाही, उत्साह वाढू लागतो, शौर्याचा उत्कर्ष होतो, विजय हटकून मिळतो. शत्रूने आपल्याला शौर्याने जिंकले असे कधीही होऊ देऊ नये ही गनिमीकाव्याची किल्ली आहे!’ (पृ. ३२६) गनिमीकाव्यातील अशा डावपेचांचे स्वरूप स्पष्ट केल्यावर सावरकर तात्या टोपे व कुंवरसिंह यांच्यातील फरक सांगतात तो असा, ‘तात्यांनी गनिमीकाव्याच्या या विधिरूपाचा अवलंब पुष्कळ वेळा केलेला नव्हता. ते नर्मदा उतरत असताना व कुंवरसिंह गंगा उतरत असताना त्या उभयतांच्या युद्धकौशल्यात हा फरक कसा वसत होता हे स्पष्ट दिसते. तात्यांना सैन्याच्या भित्रेपणाने वारंवार पराजय घेणे भाग पडे; परंतु कुंवरने मागे हटतानाही शत्रूला शौर्याची फुशारकी उरू न देता जेव्हा जेव्हा संधी सापडली तेव्हा तेव्हा उलट थपडाही अशा लागवाव्या की, रणामध्ये त्याच्याच सैन्यात जास्त आत्मनिष्ठा व वीरस्फूर्ती कायम असे. कुंवरसिंहने गनिमीकाव्याने लढत असताही सैन्यात कातरता व अनीती शिरू दिली नाही व लढाई टाळणे व लढाई मारणे ह्या विधि–निषेधांनी वृकयुद्धाच्या उभय स्वरूपांचाही अवलंब करण्यात अप्रतिम युद्धकौशल्य दाखविले.

सावरकरांच्या विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, जिथे जिथे गनिमी काव्याची लढाई यशस्वी झाली होती तिथे तिथे त्या भागातील शेतकऱ्यांचा तिला पाठिंबा मिळाला होता. मार्क्सनेही युद्धातील शेतकऱ्यांच्या या सहभागाविषयी लिहिले आहेच. बंडखोरांच्या गनिमी काव्यातील मुत्सद्दीपणाचाही मार्क्सने उल्लेख केला आहे.

मार्क्सचे १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धावरचे लेख १८५७ ते १८५९ या तीन वर्षांत ‘ न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून ’ मधून प्रसिद्ध झाले आणि सावरकरांनी वयाच्या पंचविसाव्या वर्षी म्हणजे १९०८ साली त्यांचे पुस्तक लिहिले असल्याने त्यांनी मार्क्सचे हे लेख वाचले असण्याची शक्यता नाही. तरीही या दोघांच्या विवेचनात इतके साम्य आढळते याचे महत्त्वाचे कारण म्हणजे १८५७ चे युद्ध हे भारतातील पहिले स्वातंत्र्ययुद्धच होते याविषयी दोघांच्याही मनात शंका नव्हती. हे खरे आहे की, १८५७ च्या काळातील आर्थिक, सामाजिक प्रश्नांविषयी सावरकरांनी फारसे लिहिलेले नाही. भारत व इंग्लंडमधील सामाजिक विकासाकडेही त्यांचे फारसे लक्ष गेले नाही, त्यामुळे इंग्लंडमधल्यासारखे भारतातील उत्पादन यंत्रांद्वारे होत नव्हते हेही १८५७ च्या युद्धातील पराजयाचे, अपयशाचे कारण होते का, अशा प्रश्नांचा विचार त्यांच्या पुस्तकात आढळत नाही. तसेच बंडखोर सैनिकांव्यतिरिक्त शेतकरी व समाजातील इतर घटकही या विद्रोहात सामील झाले होते, त्यांची या स्वातंत्र्ययुद्धामागची भूमिका काय होती, त्याचे विवेचनही सावरकरांनी विस्ताराने केलेले नाही; पण त्याचबरोबर आपण हेही लक्षात घेतले पाहिजे की, वयाच्या फक्त पंचविशीत लिहिलेले सावरकरांचे हे पहिलेच पुस्तक आहे. ज्यांना सावरकर आपल्या इतिहासाचे, १८५७ च्या युद्धाचे ‘ स्वातंत्र्ययुद्ध ’ संबोधून उदात्तीकरण करतात असे वाटते त्यांनी मार्क्सचे हे लेख मुळातूनच वाचले तर त्यांच्या असे लक्षात येईल की, मार्क्सच्या विवेचनातील सूत्रही तेच आहे आणि मार्क्सला भारतीय इतिहासाचे उदात्तीकरण करण्याचे काही कारण असावे असे संभवत नाही.



# शेरलॉक होम्स, झुंझार आणि कंपनी

माधव कर्वे

'लापता!'
'हरवला आहे.'
'महत्त्वाची कागदपत्रे गहाळ झालेली आहेत.'

यासारख्या जाहिराती नेहमी पाहण्यात येत असतात. टिव्हीवर अशा हरवलेल्या माणसांचे फोटो पाहतो किंवा वर्तमानपत्रातूनही 'लौकर निघून ये' या मजकुराआधी नाहीसा झाल्याची तारीख जवळजवळ महिनाभर आधी दिलेली वाचण्यात येते, त्या वेळी हळहळ व्यक्त होते. इतके दिवस ही माणसं कुठे असतात, यांच्यापैकी किती सापडतात, असे प्रश्न प्रत्येकाला पडत असतात. शेवटी पोलिसांच्या यंत्रणेलाही मर्यादा असतात असा विचार केला तर वाटतं, त्याबाहेरची एखादी यंत्रणा अस्तित्वात असती तर? म्हणजे, डिटेक्टिवज्सारखी?

'डिटेक्टिव' म्हटलं की, तो धो धो कोसळणारा वीजगर्जनेसह पाऊस, विजेच्या उजेडात चमकणारी पावसाच्या पाण्यानं निथळणारी खिडक्यांची तावदानं, लांबलचक रस्त्यावरच्या एखाद्या खांबाला टेकलेली, डोळ्यावर फेल्टहॅट ओढून ओव्हरकोट पेहनणारी, चिरूट किंवा पाइप ओढत कशाची तरी वाट पहाणारी व्यक्ती समोर येतेच.

मग शेरलॉक होम्स–वॅट्सन, पेरी मेसन–पॉल ड्रेक–डेला स्ट्रीट किंवा झुंझार, धनंजय अशी सगळी नावं. लगेच वातावरणनिर्मिती. एकच रुमाल सापडलाय. त्यावरचं काही तरी आद्याक्षर पलीकडे मृत व्यक्तीच्या खोलीची उघडी राहिलेली खिडकी. एखादी जुनी गढी. त्यातल्या व्यक्तींच्या रहस्यमय हालचाली आणि संभाषणं. गढीमागच्या जंगलातले हिमवृष्टीतले पाठलाग...

असे डिटेक्टिव्ह प्रत्यक्षात असतात की नाही असा संशयही असेल; पण आजघडीला देशभर अशा अडीचशे डिटेक्टिव्ह एजन्सीज काम करत आहेत असं सांगितलं तर हा संशय नक्कीच दूर होईल. अशा दहा संस्था तरी चांगल्याच व्यापक प्रमाणात कार्य करतात. त्यांचं स्वतःचं असं देशव्यापी आणि आंतरराष्ट्रीय जाळं आहे. या व्यवसायाला १९७२ पासून आपल्याकडे अधिक वेग आला आहे.

'लिटल्मोअर' सर्व्हिसेस ही अशीच एक संस्था। या संस्थेत आजमितीला ४६ कर्मचारी असून श्री. हेन्री एच वावा हे या संस्थेचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

एका कंपनीतल्या एका कर्मचाऱ्यानं कंपनीच्या उत्पादनाच्या गोपनीय ब्लू प्रिंटस् मिळवून स्वतःचं उत्पादन सुरू केलं. याची कुणकुण लागताच 'लिटल्मोअर'ला पाचारण करण्यात आलं आणि या प्रकरणाची पाळमुळं खणून काढण्यात आली.

यांच्याकडे जी कामं येतात, ती बहुतांशी औद्योगिक कट–कारस्थानांचा तलाश लावणं, परस्परांच्या उत्पादनांची माहिती बाहेर काढणं या स्वरूपाची असतात. उद्योगसमूहांमध्ये एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या दृष्टीने सतत छुप्या हालचाली चालू असतात आणि त्यासाठी अशा 'डिटेक्टिव्ह एजन्सीज' वापरल्या जातात. गेल्या वर्षी 'लिटल्मोअर'ची २५ लाखांची उलाढाल झाली, त्यापैकी ९० टक्के पैसा हा औद्योगिक समूहांकडून अशा स्वरूपाच्या कामासाठी आला होता.

कौटुंबिक कलहांपासून ते एखाद्या कंपनीच्या संशयास्पद कर्मचाऱ्यावर पाळत ठेवण्यापर्यंत, कसलेही काम अशा संस्थेकडे येऊ शकते.

दिल्लीमध्ये 'ग्लोब डिटेक्टिव्ह एजन्सी' ही अशीच दुसरी एक संस्था आहे. देशभर यांच्या दहा शाखा आहेत. या एजन्सीचीही गेल्या वर्षी जी ७० लाख रुपयांची उलाढाल झाली, त्यापैकी ९८ टक्के वाटा देशभरच्या उद्योगसमूहाचा होता.

'ग्लोबएजन्सी' सारख्या संस्थेलाही धमक्या देणाऱ्या पत्रांचं मूळ शोधून काढावं लागतं किंवा जोडीदाराच्या 'संशयास्पद' हालचालींवरही नजर ठेवावी लागते. शिवाय एखाद्या कंपनीत महत्त्वाच्या पदावर एखादी व्यक्ती घेताना त्या व्यक्तीची पार्श्वभूमी चाचपणे, कंपनीच्या उत्पादनाची रहस्यं फोडून 'दगलबाजी' करणारे कर्मचारी पकडून देणे यासारखी कामंही करावी लागतात.

काही वेळा, एखाद्या ख्यातनाम कंपनीचं बनावट चिन्ह वापरून बोगस माल खपवला जात आहे, असं संबंधित समूहाच्या नजरेस येताच 'ग्लोब'सारख्या संस्थाची मदत घेतली जाते; परंतु 'ग्लोबचेच रिजनल डायरेक्टर श्री. एस. के. जोशी यांच्या म्हणण्यानुसार असं बनावट उत्पादन खपवणारे पकडून दिले तरी त्यांना पंधरा दिवसांच्यावर शिक्षा होत नाही. ही शिक्षा भोगून आल्यावर अशी 'हस्तलाघवी' मंडळी पूर्ववत आपले उद्योग सुरू करू शकतात, म्हणजेच अशा प्रकारांना कायमचा आळा बसेल अशी तरतूद नाहीच. भेसळयुक्त औषधे, बनावट बिस्किटं सापडल्याची वृत्तं अधूनमधून येत असतात. त्यातली किती सापडत असतील, तेही अशी 'कुशल' मंडळीच जाणोत! शिवाय ज्या कंपन्या भक्कमपणे पाय रोवून उभ्या आहेत, त्यांच्या एकंदर विक्रीवर अशा बनावटाच्या हालचालींचा फारसा परिणामही होत नाही.

एखादा व्यवहार ज्या वेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर होत असतो, म्हणजे परकीय उद्योगसमूहीबरोबर किंवा व्यक्तीबरोबर होत असतो, त्या वेळी त्यांच्या नकळत डिटेक्टिव एजन्सीजकडून त्याची विश्वासार्हता चाचपली जात असते. या एजन्सीज त्यांच्या परदेशातील हस्तकांकरवी जरूर ती माहिती मिळवून त्या त्या उद्योगसमूहांना पुरवतात.

'बाँबे इंडस्ट्रिअल सिक्युरिटी ऑर्गनायझेशन अँड डिटेक्टिव एजन्सी प्रा. लि.' या

संस्थेचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत श्री. कुलदीप सिंग ! यांना मात्र एका प्रकरणाचा शोध घेता घेता स्वतःच्या जिवावर उदार होण्याची वेळ आली होती.

एकदा एका व्यक्तीनं स्वत: मृत असल्याचे सिद्ध करून विम्याच्या पैशांची प्रचंड रक्कम लाटण्याचा घाट घातला होता. याच प्रकरणाच्या तपासात श्री. कुलदीप सिंग जिवावरच्या संकटातून थोडक्यात बचावले. एकदा तर केवळ एका टाइपरायटरवरून सबंध प्रकरण उभं राहिलं होतं. ( आठवा : जेम्स हॅडले चेस. )

या अशा डिटेक्टिवज्‌ना कोणत्या दिव्यांतून जावं लागत असेल याची कल्पना यावरून येईल. प्रत्येक उद्योगसमूहाला आपल्या औद्योगिक परिसरात सुरळीत उत्पादनाच्या दृष्टीने शांतता हवी असते, मग ती प्रस्थापित करण्यासाठी असे समूह काय करू शकतात, याचा हा नमुना असाच आहे. एका कंपनीत युनियनकडून संपाचा दबाव आणला जात होता, तशी हवा सगळीकडे पसरली होती. कारखान्यात वातावरण अस्थिर होतं. या वेळी या एजन्सीचा एक हस्तक सरळ 'व्हाइस-प्रेसिडेंड' म्हणून त्या कारखान्यात वावरला, अधिकृतपणे ! लवकरच संप बारगळला आणि व्यवस्थापकांनी सुटकेचा श्वास टाकला. म्हणजे हे प्रत्यक्षातले डिटेक्टिवजही जेम्स बाँडइतके अष्टपैलू असतात म्हणायचे !

याच संस्थेतर्फे आग किंवा घरफोडी-सारख्या धोक्यांची सूचना देणारी यंत्रणाही पुरवली जाते. इतकंच नाही तर कोणाला संरक्षण हवं असेल तर त्याचीही व्यवस्था ही संस्था करू शकते.

या साऱ्या सेवांसाठी साधारणत: व्यक्तीमागे एका भेटीस रु. २५०/– इतका आकार घेतला जातो. पाश्चात्य देशामध्ये मात्र हाच आकार तब्बल दसपट असतो. या व्यवसायाला अजूनही तशी कायद्यानं मान्यता नसल्यामुळे एकूण कार्यपद्धतीला खूपच मर्यादा पडतात. तरीही सरकारी यंत्रणेबाहेर जाऊन काही करणे शक्य नसते. त्या वेळी त्यांच्या मानाने अशा एजन्सीज खूपच फायदेशीर पडतात. कारण त्या नियमात जखडलेल्या नसतात. एखाद्या प्रकरणात पुरावे गोळा करताना एकूण नियमबद्धतेमुळे पोलीस जिथे पोचू शकत नाहीत, तिथे अशा एजन्सीज पोचू शकतात. अर्थात या क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या मते पाश्चात्य देशांच्या तुलनेने आपल्याकडे अशा संस्थांची दखल कमी प्रमाणात घेतली जाते किंवा एकूणच जागरूकता कमी आहे, त्यामुळेच इथं इंडस्ट्रिअल सिक्युरिटी टाइम्ससारख्या पत्रिका काढाव्या लागतात.

एका एजन्सीला एका प्रख्यात टूथब्रश कंपनीसाठी असाच शोध घ्यावा लागला होता. अशा ब्रशचे निरनिराळे भाग निरनिराळ्या ठिकाणी तयार करून, मग ते हुबेहुब जुळवून पॅकिंगसह याच कंपनीच्या नावावर खपवले जात होते. आता अशा शोधांमध्ये केवळ सिक्स्थ सेन्सवर अवलंबून राहून चालत नाही.

पाश्चात्य देशांमध्ये जितकी अद्ययावत आणि अत्याधुनिक सामग्री वापरली जाते, तितकी अजून येथे वापरात आणली जात नसली तरी 'लेसर ट्रान्स्मिटर्स' सारखी उपकरण वापरली जातातच. त्यामुळं बंद खोलीतील संभाषण ऐकता येतं. 'मिनिएचर टेपरेकॉर्डर कम रिसिव्हरमुळे जवळजवळ वीस तासांचं संभाषण टेप केलं जाऊ शकतं. एखाद्या ठिकाणी दडवून ठेवलेल्या अतिशय छोट्या ट्रान्समीटरमुळे १ कि.मी. अंतरावरूनही असं संभाषण ऐकता येतं. सिगरेटपेक्षाही लहान कॅमेरे वापरून कीहोटलमधूनही चित्रण करता येतात.

आता आपल्याला जर वाटत असेल की, अशा पावलोपावली धोका घुटमळत असलेल्या क्षेत्रात सतत खच्चून ॲक्शन असेल, फुटा–फुटाला 'दे दनादन' चालत असेल तर मात्र तसं नाहीये. मासेमारीत गळ टाकल्यावर मासा गळाला लागेपर्यंत जशी शांतपणे नदीकाठी–तळ्याकाठी वाट बघत बसावी लागतं, तसंच इथंही ! तासन् तास दिवसन् दिवस किंवा त्याहीपेक्षा जास्त काळ आपल्याला हवी असलेली माहिती मिळवण्यासाठी सावधपणे, डोके शांत ठेवून, संयमानं काम करावं लागत. अशी खबरेगिरी करणं म्हणूनच तसं कटाळवाणं काम आहे. सूक्ष्म निरीक्षणशक्तीच्या जोडीनंच विविध क्षेत्रातले संबंध वापरून हवी ती त्या त्या पद्धतीनं माहिती गोळा करणं हे या क्षेत्रात महत्त्वाच ठरतं. त्यात किती कौशल्य दाखविलं जातं, यावर प्रकरणाचं यश अवलंबून असतं. खूपदा तर अशा माहितीसाठी ( कंपन्यांच्या गुपितांसारखी ) टेबलाखालूनही प्रेमांची देवाण–घेवाण आकड्यांच्या भाषेत मोठ्या प्रमाणावर करावी लागते.

तर असे हे प्रत्यक्षातले शेरलॉक होम्स, पेरी मेसन, झुंझार, धनंजय आणि कंपनीचे सनसनीखेज विश्व ! ☐

(डिटेक्टिवज् इन बिजनेस या सिग्नेचरमधील लेखावर आधारित )


**ज्यांना पहिली अपत्ये मुलीच आहेत आणि पुत्र व्हावा अशी इच्छा आहे त्यांनी संपर्क साधावा.**

**वैद्य एम्. वाय्. परांजपे**

संजीवन चिकित्सक
सदाशिव पेठ, नृसिंह सदन
जनता बँकेसमोर
बाजीराव रोड
पुणे ४११ ०३०

**संजीवन औषधालय**

वैद्य एम्. वाय्. परांजपे
लोटलीकर बिल्डिंग
१ ला मजला, १६, एल्. जे. रोड
सिटी लाईट सिनेमाजवळ
माटुंगा (प. रे.) मुंबई ४०० ०१६

# रफी,....तुझी जागा रिकामीच आहे !



आतापर्यंत एक ऑगस्टची आठवण
फक्त लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी
इथपर्यंतच मर्यादित होती.
पण १९८० चा एक ऑगस्ट आला तोच
मुळी
महंमद रफीच्या निधनाची काळीकुट्ट वार्ता
घेऊन !
आणि त्यानंतर आलेला प्रत्येक एक ऑगस्ट
लोकमान्यांबरोबरच
रफीचीही आठवण ताजी करून जाऊ
लागला—
न चुकता.
तसं पाह्यला गेलं तर
गायक म्हणून असलेली रफीची थोरवी
मनानं मान्य केलेली असूनही
रफी खूप आवडता गायक होता
अशातला भाग नाहीय.
निदानपक्षी तलतप्रमाणे त्याच्याशी
जिवाशिवाचं नातं जोडलं गेलं नव्हतं की,
मुकेशप्रमाणे त्याच्याबद्दल
अगदी तटतटून बोललं जात नव्हतं.
आणि असं असलं तरीही
पाण्यात राहून
पाण्यातल्या माशांशी वैर न धरता
त्यांच्यापासून अलगदपणे वेगळं राहण्याची
किमया साधलेल्या रफीच्या आयुष्याबद्दल
उत्सुकता होतीच
आणि या उत्सुकतेच्या आधारानं पुढं जाता
जाताच
रफीनं आपल्या आयुष्याचाही एक भाग
व्यापला असल्याची जाणीव झाली.
ही जाणीव अधिक तीव्रपणे करून दिली ती
दर वर्षी अनामिकशी हुरहुर लावणाऱ्या
एक ऑगस्टनं !
याचं मुख्य कारण म्हणजे
गायक म्हणून रफी जितका मोठा होता
तितकाच माणूस म्हणूनही !
गायक म्हणून रफीला मोठं केलं ते
त्याच्या अस्सल सुरांनी
तर माणूस म्हणून त्याला मोठं केलं
ते त्याच्या सरळ साध्या सच्चेपणानं !
मिनिटामिनिटाला जिथे
नव्या नव्या गॉसिपिंगच्या वावटळी
उठत असतात, अशा चित्रपटक्षेत्रात
उभी हयात घालवूनही
त्यानं कुणाचे तळतळाट घेतले नाहीत की,
कुणाचे शिव्याशाप घेतले नाहीत.
गायक म्हणून भलेही त्याच्यावर
टीका झाली असेल—
त्या काळात 'रफी विरुद्ध किशोरकुमार'
हा वाद
आजच्या 'दिलीपकुमार विरुद्ध अमिताभ'
पेक्षाही
जास्त गाजला होता;
पण माणूस म्हणून असलेलं त्याचं मोठेपण
सगळ्यांनीच एकमुखानं मान्य केलं होतं.
याच गुणाच्या बळावर रफीनं
चित्रपटसृष्टीतल्या सगळ्यांना
आपलंसं केलं होतं.
एके काळी सुरांची साथ घेऊन त्यानं
भिरभिरत्या मनानं चित्रपटसृष्टीत
प्रवेश केला होता.
अस्थिर वर्तमान आणि उज्ज्वल भविष्य
यांचा लपंडाव मनात चालू असतानाच
नौशादनं त्याला 'पहले आप' या
चित्रपटासाठी
गाण्याची संधी दिली.
पुढही अनेक चित्रपटांसाठी त्यानं
रफीचाच आवाज वापरला.
पहिलं गाणं नौशादसाठी गाऊन
आपल्या संगीतकारकीर्दीचा
पाया घालणाऱ्या रफीनं पुढं
मदन मोहन, ओ. पी. नय्यर, कल्याणजी
आनंदजी
अशा कित्येक संगीतकारांच्या
पहिल्या चित्रपटांसाठी गाणं गाऊन
त्यांच्याही कारकीर्दीचा पाया
भक्कमपणे घालून दिला.
संगीतकार आणि गीतकार
यांच्या विशुद्ध सूर संगमातून
निर्माण झालेली गाणीही कशी
'जमलेली' असतात, यासाठी
'तुम्हारे झुल्फके सायेमें शाम कर लूंगा'
मदनमोहन,
'मुझे तुमसे मोहब्बत है...'—
सरदार मलीक,
'कोई सागर दिलको बहलाता नही...'
नौशाद,
'दिन ढल जाए हाए रात न जा...'
सचिनदेव बर्मन,
'मन रे तू काहे न धीर धरे...'
रोशन,
एवढी उदाहरणं पुरेशी आहेत.
रफी आणि संगीतकार यांचे सूर
एकमेकांशी इतक्या चपखलपणे
जुळण्याचं आणखी एक कारण म्हणजे
कुठल्याही प्रकारच्या गाण्यात
अतिशय सहजी वळणारा आणि जुळणारा
त्याचा आवाज,

"मन तरपत हरिदर्शनको आज'
असा रागदारीच्या अंगांनी जाणारा त्याचा आवाज
'लाल छडी मैदान खडी क्या खूब लडी' सारखी
हलकीफुलकी उडती गाणीही
तितक्याच ढंगात रंगवत असे.
'टूटे हुए ख्वाबोंने हमको ये सिखाया है' मधून
झिरपणारी उदासी एवढी अस्सल वाटते.
तितकीच 'याऽहू, चाहे कोई मुझे जंगली कहे' मधली
उच्छृंखलताही सच्ची वाटते.
त्यामुळेच रफीकडे संगीतकारांची रीघ लागली
तर नवल नव्हतं.
जुन्या जाणत्या संगीतकारांबरोबरच
नवे संगीतकारही रफीनं आपल्यासाठी गावं
म्हणून धडपडत होते.
वास्तविक तोपर्यंत रफीच्या नावाची किंमत
वाढली होती.
संगातील गुणाच्या मिजासीवर
'वाट्टेल तसं' वागण्याचा
आणि त्याच्या सुरांनी खुळावलेल्या रसिकांनी
त्याला माफ करण्याचा परवाना
त्याच्या हातात होता;
पण फुलाचं हृदय घेऊन जन्माला आलेल्या रफीनं
कधी कुणाला दुखवलं असेल तर शपथ !
त्या कल्पनेनंसुद्धा बहुधा
तो कासावीस होत असावा.
त्यानं या नवीन संगीनकारांना
कधी कमी अथवा तुच्छ लेखलं नाही,
मग त्यांना नाकारण्याचा प्रश्न येतोच कुठे ?
अर्ध्या हळकुंडानं पिवळे होणारे
अनेक कलाकार अवती-भोवती असतानाही
रफीनं आपली पावलं जमिनीपासून
तसूभरही ढळू नयेत म्हणून
सतत प्रयत्न केला तो—
आपले उमेदवारीचे दिवस आठवून.
उमेदवारीच्या काळात
नशिबी आलेल्या
हालअपेष्टा, अपमान, अवहेलना
यांचं कधी भांडवल केलं नाही की,
आपण भोगलंय ना मग
नव्यांनीही भोगलंच पाहिजे
असा विचार केला नाही.
त्यामुळे रेकॉर्डिंगला उशीरा येणं,
आपल्या मूडाला आंजारत-गोंजारत
संगीत दिग्दर्शकाला सळो का पळो करून सोडणं,
पैशासाठी अडवून धरणं
या प्रकारांची झळ रफीकडून
कधीच कुणाला पोचली नाही.
उलट पहिल्यापासून शेवटपर्यंत
रफीच्या वागण्यात काहीही बदल झाला नाही
अगदी नव्या जुन्या अनेक
संगीतकारांकडे जवळजवळ
तीस हजारांच्यावर गाणी गायलेला रफी
मनानं मात्र पहिल्या गाण्यापाशीच
घुटमळत होता.
उमेदवारीच्या काळातले अपमान
खुल्या दिलानं विसरून जाणाऱ्या रफीनं
त्या काळात ज्यांनी मदतीचा हात
पुढं केला, त्यांची आठवण
कायम ठेवली
आणि या आठवणींना स्मरून
तो या ना त्या स्वरूपात
त्या ऋणाची परतफेडही करत राहिला.
एवढंच नाही तर
जात्याच अबोल असणाऱ्या
रफीची नजर अनेक गोष्टी
बारकाईनं सराईतपणे टिपत असे
आणि त्याच्या मदतीसाठी
रफीचा हात सदैव पुढे असेच.
रफीचं व्यक्तिमत्त्व तसं देखणं नव्हेच,
पण भारदस्त होतं.
या भारदस्तपणालाही
विलक्षण अशा निरागसतेची
लाभलेली हलकीशी किनार...
आणि चेहऱ्यावर विलसणारे
शांत भाव...
वागण्या-बोलण्यातून
ओसंडून वाहणारी ऋजुता, आदब...
रफीचं व्यक्तिमत्त्व आश्वासक होतं.
त्यामुळं रफीबरोबर गाणाऱ्या
नवागताला
एक प्रकारचा दिलासा मिळत असे.
सराईत गायकाबरोबर गायचंय
या कल्पनेनंच गर्भगळित होणारे
नवोदित गायक
रफीबरोबर गाताना मोकळे होत
किंवा त्यांना आपल्या कोशातून
बाहेर काढून
मोकळं करण्याची जबाबदारी
रफी आपखुशीनं स्वीकारत असे.
नेपोलियनच्या शब्दकोशात जसा
'अशक्य' हा शब्द नव्हता, तसा
रफीच्या शब्दकोशात 'मत्सर' हा शब्दच नसावा.
दिलीपकुमारपासून ऋषीकपूरपर्यंत
हिंदी चित्रपटसृष्टीतल्या अनेक नायकांनी
रफीच्या आवाजात नायिकांना साद घातली,
प्रसंगी छेडछाड केली, चेष्टा केली,
प्रणयाची कुजबुज केली,
विरहार्त मनाचं गूज सांगितलं;
पण हळूहळू काळाची पावलं बदलली तशी
'जिन्हे नाज है हिंदपर वो कहाँ है'
म्हणणारा रफी
'यचकयमला पगला दिवाना' सारखी
निरर्थक आणि टुकार,
किंवा 'मैंने पूछा चाँदसे, तूने देखा है कहीं' सारखी
गद्य गाणी म्हणायला लागला.
परिस्थितीशी सतत जुळवून घेण्याची
सवय असलेल्या रफीनं
खतावलेल्या मनानच
परिस्थितीशी मुकाट्यानं हातमिळवणी केली ती
अगदी मृत्यूपर्यंत !
पण या हातमिळवणीतही एक पथ्य
त्यानं इमाने-इतबारे पाळलं, ते म्हणजे
बनचुकेपणा न करण्याचं.
त्यामुळेच प्रत्येक नव्या गायकाच्या
आगमनाच्या वेळी 'रफी संपल्याच्या'
उठणाऱ्या आरोळ्या बिनबुडाच्या ठरल्याच,
पण अद्यापही रफीची जागा
रिकामीच आहे !

—शुभदा रानडे

## सर्चलाइट

# अमेरिकन आकडेवारी

सध्या प्रत्येक गोष्ट ही आकडेवारीने, नकाशाने, चार्टने दाखवण्याची पद्धत पडली आहे. ती अर्थात सोईची आहे. कारण त्यामुळे मोठमोठाले रिपोर्ट वाचत बसावे लागत नाही. एकदम तयार आकडेवारीवरून नजर टाकली की आपल्याला प्रत्येक गोष्ट चटकन स्पष्ट होते.

हे आकडेवारी करणं उपयोगी, सोईचं आणि सुटसुटीत असलं तरी त्याचा वापर हल्ली फार बोकाळला आहे असे मला वाटते. हे फॅड प्रथम अमेरिकेत निघाले आणि नंतर ते चुटकीसरशी सर्वत्र पसरले.

सर्व आकडेवाऱ्या या खऱ्या असतातच असे नाही; परंतु अनेक लोक त्याच्यावर आंधळेपणाने विश्वास ठेवतात. सरकारी आकडेवाऱ्या या प्रचंड फसव्या असतात हे तर उघड गुपित आहे. मधे अमेरिकेत एका अभ्यासगटाने एक मोठी गंमतीदार आकडेवारी प्रसिद्ध केली. त्यांनी अनेक लोकांना एक चुकीची आकडेवारी असलेला चार्ट दाखवला आणि त्यानंतर या संदर्भात काही प्रश्न विचारले. त्यावरून त्यांनी पुढील-प्रमाणे निष्कर्ष काढला.

१. ४३ टक्के लोक आकडेवारीवर प्रथमदर्शनी विश्वास ठेवतात.

२. ३८ टक्के लोक आकडेवारीबद्दल साशंक असतात; परंतु 'ज्या अर्थी लिहिलं आहे त्या अर्थी खरंच असणार' अशा प्रकारच्या भूमिकेत असतात.

३. १४ टक्के लोक संपूर्णपणे साशंक असतात.

४. ५ टक्के लोक मात्र ठामपणे हे चूक आहे असे सांगतात.

यावरून एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात येईल. सरकार अनेक प्रसिद्धिमाध्यमांचा उपयोग करून ज्या अनेक आकडेवाऱ्या प्रसिद्ध करते त्या खऱ्या असोत किंवा खोटया शेकडा ८० टक्के जनता त्याच्यावर विश्वास ठेवते. अर्थात ही अमेरिकन जनता; भारतात हा आकडा कदाचित जास्तच असेल !

आमच्या लहानपणी एखादी गोष्ट अशक्य असली किंवा अवघड असली किंवा न समजणारी असली की तिला 'अमेरिकन' म्हणून आम्ही मोकळे व्हायचो; परंतु आता हे अमेरिकन स्टॅटिस्टिक्स मात्र प्रत्येक अवघड गोष्ट सोपी करून सांगतं. उदाहरणार्थ समजा तुम्हाला कोणी

१. जगाची लोकसंख्या किती ?

२. त्याच्यात काळे, गोरे, पिवळे, लाल, आणि गहूवर्णी लोक किती ?

३. त्यांच्या वाढीचे प्रमाण किती ?

४. त्यांच्या वाढीला जगातले अन्न किती दिवस पुरेल ?

५. यात भारताची नेमकी जागा काय असेल ?

असे प्रश्न विचारले तर गडबडून जाल; परंतु अमेरिकेतल्या कुठल्याही मुलाला असले प्रश्न विचारा तो तडातड खालीलप्रमाणे उत्तरे देईल—

१. जगाची सध्याची लोकसंख्या १०० अब्ज आहे.

२. त्याच्यात ५० टक्के गोरे, १० टक्के काळे, १८ टक्के पिवळे, ५ टक्के लाल आणि १७ टक्के गहूवर्णी लोक आहेत.

३. त्यांची सरासरी प्रतिवर्षाची वाढ २.३३ टक्के आहे.

४. अजून बरोबर पन्नास वर्षे हाच लोकसंख्यावाढीचा वेग कायम राहिला तर त्या वेळेला जगातले ७० टक्के लोग अर्धपोटी असतील.

५. भारतात मात्र सन २००० मधेच ७० टक्के लोक अर्धपोटी असतील. त्यामुळे कम्युनिझम वाढवणाऱ्या रशियाला चांगलेच फावेल.

ही वरची जादा माहिती देऊन तो तुम्हाला गप्प तरी करेल किंवा तुम्हाला नवीन प्रश्न विचारायला भाग पाडेल. तुम्ही प्रश्न विचारणारे असाल तर विचाराल (१) जगात कम्युनिस्ट किती आहेत? (२) जगातली किती राष्ट्रे कम्युनिस्ट आहेत?

तो मुलगा लगेच त्याच्या गणकयंत्रासमान मेंदूतून नवीन डाटा बाहेर टाकेल.

१. जगातली कम्युनिस्टांची नक्की संख्या सांगणे कठीण आहे. उघडउघड कम्युनिझमचा पुरस्कार करणारे २१ टक्के लोक आहेत; परंतु अनेक लोकांच्या कम्युनिझमला 'आतून' पाठिंबा आहे. असे लोक तितकेच म्हणजे २१ टक्के आहेत.

२. जगातल्या २२८ छोटया-मोठया राष्ट्रांपैकी ९१ राष्ट्रे कम्युनिझमचा पुरस्कार करतात; परंतु अमेरिकेने जर वेळच्या वेळी दखल घेतली नाही तर अजून २४ राष्ट्रे रशियाच्या प्रभावाखाली येतील.

या प्रकारच्या वक्तव्यांमुळे तुम्ही प्रभावित व्हाल आणि त्या अतिशय स्मार्ट अमेरिकन मुलाला म्हणाल—'वा ! उत्तम, मनुष्य एवढया गतीने पुढे जात असेल असे आम्हाला वाटले नव्हते!' त्यावर तो अमेरिकन मुलगा म्हणेल 'हो,माणूस दहा पावलं जेवढया वेळात टाकतो तेवढे अंतर चालायला एका मुंगीला त्याच्या बरोबर वीसपट वेळ लागतो व १०००×६ पावलं टाकावी लागतात. (मुंगीला सहा पाय असतात म्हणून सहाने गुणले आहे.) एक हरण ते अंतर माणसाच्या निम्म्या वेळात व केवळ तीन उडयांमध्ये कापते तर चित्ता फक्त एका उडीमध्ये व माणसापेक्षा एकदशांश वेळात तेवढे अंतर कापतो !

अशा प्रकारची विचित्र, अमेरिकन आकडेवारी पाहून मी पण एक प्रयोग करायचे ठरवले. मी काय केलं की मित्राची एक मोटरसायकल उसनी आणली. भर दिवसा तिचा फोकस चालू करून एक आठवडाभर सर्व

पुण्यातून फिरवली. माझ्यामागे एका मित्राला बसवला. त्याला सांगितलं जेव्हा एखादा माणूस दिवा उघडा आहे असे सांगेल तेव्हा एक टिक करायची. त्यात मी अनेक कॉलम्स केले. ते पुढीलप्रमाणे–१. सांगणाऱ्या व्यक्तीचे अदाजे वय ( लहान मुलगा, मध्यम वयीन व वयस्क )

२. पेठ ( कुठल्या पेठेमध्ये हा माणूस भेटला. )

३. सांगणारी व्यक्ती वाहनावर होती का चालत होती ?

४. स्त्री का पुरुष ?

५. वेळ.

आठ दिवसांत माझ्याकडे प्रचंड डाटा तयार झाला. तो जेव्हा मी सुरळीत केला तेव्हा मोठी गमतीदार आकडेवारी तयार झाली. ती खालीलप्रमाणे–

१. रस्त्यातून जाणाऱ्या लोकांच्या केवळ दोन टक्के लोक दिवा उघडा आहे असे खुणेने सांगतात, तर ही गोष्ट पन्नास टक्के लोकांच्या लक्षातच येत नाही. उरलेले लोक लक्ष जाऊन सुद्धा दुर्लक्ष करतात !

[ २. हे प्रमाण प्रत्येक पेठेमध्ये वेगवेगळ आहे. कॅम्प,'सदाशिवपेठ आणि डे. जिमखाना या भागात सर्वांत कमी लोक दिवा उघडा असल्याचे खुणवितात. पर्वती, कोथरूड, अरण्येश्वर, कात्रजरस्ता या शहरापासून जरा लांब असलेल्या रस्त्यामध्ये मात्र सर्वांत जास्त प्रमाणात लोक जागरूक असतात. बाकी इतर पेठामध्ये तपशिलाप्रमाणे.

३. सर्वांत गमतीदार गोष्ट माझ्या जर कुठली लक्षात आली असेल तर चालणाऱ्या वाहनांवरून जाणाऱ्यानी फार मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. दिवा उघडा आहे असे सांगण्यासाठी कधी खुणेने तर कधी स्वतःच्या वाहनाचा दिवा लावून सांगणाऱ्या लोकांची संख्या एकूण सांगणाऱ्यांच्या ७० टक्के होती.

४. एकाही स्त्रीने एकदाही दिवा उघडा असल्याचे सांगितले नाही ! लहान मुले व मध्यम वयीन लोकांनी सर्वांत जास्त रिस्पॉन्स दिला. वयस्क लोकसुद्धा दुर्लक्ष करीत होते.

५. संध्याकाळपेक्षा सकाळी लोक जास्त दक्ष दिसत होते.

ही आकडेवारी अनेकाना मोठी गमतीदार वाटेल. अनेकाना हिचा उपयोग काय असा प्रश्न पडेल. त्याना उत्तर एकच, 'ही अमेरिकन आकडेवारी आहे.'

माझे मत विचाराल तर हल्ली मला प्रत्येक आकडेवारीमध्ये संशय दिसायला लागलेला आहे; पण ठामपणे नाही म्हणण्याइतका आपला अभ्यास नसल्याने तसे म्हणायचा माझा धीर होत नाही.

आपण आपला कधी विचार केला आहेत? तुम्ही सुरुवातीला सांगितलेल्या कुठल्या गटात मोडता? नक्की सांगता येत नसेल तर मी एक गोष्ट इथे सांगू इच्छितो. या लेखात असलेल्या सर्वच्या सर्व आकडेवाऱ्या खोट्या आहेत. हा लेख वाचून होईपर्यंत त्यातल्या कोणत्या आकडेवाऱ्या आपल्याला खऱ्या वाटल्या, कोणत्या शंकास्पद वाटल्या, तर कोणत्या खोट्या किंवा चूक वाटल्या हे स्वतः ठरवा. हिंमत असेल तर पत्राने मला कळवा. येणाऱ्या पत्रांवरून खरी आकडेवारी छापायची जबाबदारी माझी !

—अमृत पुरंदरे

## कोसळणाऱ्या इमारती

पृष्ठ ४ वरून

इमारती कोसळण्यामागे प्रामुख्याने तीन कारणे संभवतात–

१. इमारतबांधणीसाठी वापरलेल्या मालाचा दर्जा कमी प्रतीचा असणे. (सिमेंट इ.)

२. पोलाद आणि सिमेंट यांचा कमी वापर.

३. खर्च वाचविण्याच्या प्रवृत्तीमुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा कमी वापर. या कारणामुळे बिल्डरला ५० ते ६० टक्क्यापर्यंत जादा फायदा मिळतो खरा; पण या बांधकामांचं आयुष्य कमी झालेलं असतं.

सिमेंटच्या दर्जाबाबत सध्या बरीच ओरड होते आहे. अगदी जुन्या नावाजलेल्या कंपन्यांचं सिमेंटही बऱ्याचदा निर्दिष्ट दर्जापेक्षा कमी प्रतीचं आढळतं. याला कारण सिमेंटवरील नियंत्रण सैल झाल्याने मागणीचा पुरवठा करण्यासाठी कंपन्यानी आपल्या उत्पादनात प्रचंड वाढ केली. फायदा कमावण्याच्या या स्पर्धेत सिमेंटच्या दर्जाकडे मात्र दुर्लक्ष झाल. गेल्या २–२॥ वर्षांत ही समस्या उभी राहिली आहे.

सिमेंट आणि पोलाद यांच्या कमी वापराने बांधकामाचं आयुष्य कमी होतं. गृहनिर्माण मंडळाच्या बांधकामात आढळणारा भ्रष्टाचार सिमेंटच्या कमी वापराशी निगडित आहे. आर सी. सी. बांधकामात ( रिनफोर्स सिमेंट-कॉंक्रीट ) एक घनमीटर कॉंक्रीटमध्ये ३०० ते ३५० किलोग्रॅम सिमेंट वापरावे लागते. गृहनिर्माणमंडळाच्या बांधकामात अनेकदा या सिमेंटचे प्रमाण फक्त २०० ते २५० कि. ग्रॅ. असते. म्हणजे ५० ते १०० कि. ग्रॅ. सिमेंट हडप होते! गृहनिर्माणमंडळाच्या बांधकामातील हा भ्रष्टाचार सर्वत्र असल्याने नव्या इमारतीमध्ये राहायला गेलेल्या लोकाना पहिल्याच पावसा-

¤ वर्गीकरण करण्यात आलेल्या नादुरुस्त इमारतींचा तपशील

| | | | इमारतीची संख्या |
|---|---|---|---|
| १) | अ–वर्ग | १ सप्टेंबर १९४० पूर्वी बांधण्यात आलेल्या इमारती | १६५०२ |
| २) | ब–वर्ग | १ सप्टेंबर १९४० आणि ३१ डिसेंबर १९५० दरम्यान बांधण्यात आलेल्या इमारती | १४८९ |
| ३) | क–वर्ग | १ जानेवारी १९५१ ते ३० सप्टेंबर १९६९ दरम्यान बांधण्यात आलेल्या इमारती | १६५१ |
| | | एकूण | १९,६४२ |

¤ दुरुस्ती व पुनर्रचनेवरील खर्च
( ३१ मार्च १९८२ पर्यंत झालेला )

| | इमारतीची संख्या | खर्च¤ |
|---|---|---|
| दुरुस्ती | ६३७४ | रु. ६१.१६ कोटी |
| पुनर्रचना | १२७ | रु. ३०.८२ कोटी |
| निवासी गाळे | | ९६१३ |
| अनिवासी गाळे | | ४२१ |
| एकूण गाळे | | १०,०३४ |

¤ संक्रमण शिबिरातील गाळेबांधणीचा खर्चही यात अंतर्भूत आहे.

ळघात छपरांतून आंघोळ होते. सरकारी बांधकामात हा गोंधळ तर खाजगी बांधकामातील हैदोस कसा मोजणार ? उद्याच्या कोसळणाऱ्या इमारतींमागे हा भ्रष्टाचाराचा हैदोसच कारण असेल इतकंच ! □

---

### □ पुनर्वसन

घरदुरुस्ती आणि पुनर्रचनामंडळाद्वारे सुरू असलेले पुनर्वसन कोणत्या गतीने चालले आहे हे दर्शविणारी ही आकडेवारी—

३१ मार्च ८२ पर्यंत मंडळातर्फे फक्त १२७ इमारतींची पुनर्बांधणी झाली असून अशा इमारतींमधून भाडेकरूंना १०,०३४ गाळे उपलब्ध झाले.

धोकादायक इमारतींतील आणि कोसळलेल्या इमारतींमधील बेघर झालेल्या भाडेकरूंना पर्यायी जागा म्हणून ३१ मार्च, ८२ पर्यंत मंडळाने संक्रमणशिबिरात १६,६६० गाळे उपलब्ध करून दिलेत.

प्रत्यक्षात मोडकळीस आलेल्या इमारतींची संख्या आहे वीस हजार, तर पुनर्बांधणी झालेल्या इमारती आहेत फक्त १२७ दोन्ही नोंदी सरकारी दप्तरातल्याच.

---

### □ दुरुस्ती व पुनर्रचना कायद्याची अंमलबजावणी

हा कायदा १ ऑक्टोबर १९६९ पासून अंमलात आला गेली अकरा वर्षे या कायद्याच्या अंमलबजावणयातंर्गत झालेल्या कामाचा ३१ मार्च १९८२ पर्यंतचा तपशील पुढीलप्रमाणे—

| | |
|---|---|
| (१) अग्रक्रम यादीवरी इमारती | १०,९६९ |
| (२) दुरुस्त करण्यात आलेल्या इमारती : | |
| अ) गृहनिर्माण मंडळातर्फे | ५३७९ |
| ब) ना हरकत प्रमाणपत्राद्वारे | ९९५ |
| एकूण (अ+ब) | ६३७४ |
| (३) अग्रक्रम यादीतून वगळण्यात आलेल्या इमारती | १३१८ |
| (४) आर्थिकदृष्टया दुरुस्ती पलीकडील इमारती | १३२८ |
| (५) कार्यवाही करावयाच्या इमारती | १९४९ |
| यापैकी इमारत दुरुस्तीची सुरू असलेली कामे— | |
| —गृहनिर्माण मंडळातर्फे | ५३८ |
| ना हरकत प्रमाणपत्राद्वारे | ४८९ |
| एकूण— | १०२७ |

□

# नाट्यपंढरी



### पुंडलीक वरदा...

आषाढी वारीचे दिवस होते. रस्त्यात वारकऱ्यांची गर्दी होती. दहा—वीस वारकरी गटागटाने खांद्यावर पताका घेऊन, टाळ-मृदंगांच्या गजरात चालत होते. 'आर्यभूषण थिएटर'च्या रस्त्याकडील गॅलरीत गणपतराव जोशी ( नटसम्राट गणपतराव ) उभे होते. काही वारकऱ्यांची नि त्यांची नजरानजर झाली. त्यांनी वारकऱ्यांना भक्तिभावाने नमस्कार केला. वारकऱ्यांनी त्यांच्याकडे हात करून काही मागणी केली. गणपतरावांनी त्यांना थांबा अशी खूण करून ते खाली आले. पाच-सहा वारकरी आर्यभूषणच्या दरवाजापाशी थांबले. 'बोला मंडळी, काय इच्छा आहे आपली?' गणपतरावांनी विचारले. 'काय नाही. दुपारचं भोजन घेऊन, पुढच्या मुक्कामाकडे जाऊ म्हणतो!' वारकरी. गणपतरावांनी 'ठीक आहे' म्हणून कंपनीच्या आचाऱ्याला हाक मारली नि त्या मंडळींच्या जेवणाची व्यवस्था करायला सांगितले. तोच त्या वारकऱ्यांचा म्होरक्या पुढे होऊन म्हणाला, 'मालक, आमच्या दिंडीत शंभर—सव्वाशे माणूस आहे, त्यांना टाकून आम्हीच पोटोबा करून कसं चालेल?' एका क्षणाचीही उसंत न घेता, गणपतराव लगेच म्हणाले, 'जा, सगळयांना बोलवून आणा! तासाभरात तुमचे जेवण तयार होईल!' थोडया वेळाने सर्व वारकरी मंडळी आली. 'पुंडलीक वरदा हरिविठ्ठल'चा गजर होऊन पंगत बसली. गणपतराव हवेनको पहात होते. भोजन आटोपताच वारकरी—गणपतराव गळामिठी झाली नि हरिविठ्ठलाच्या गजरात वारकरी वाट चालू लागले!

### वंदीन चरण!

७ मार्च १९२१ ला गणपतरावांचे मुंबईत निधन झाले. त्यांच्या अंत्यदर्शनाला रसिकांच्या झुंडीच्या झुंडी लोटल्या. 'गंधर्व', 'ललित कलादर्श', 'लोकमान्य' या कंपन्यांचा मुक्काम मुंबईत असल्याने त्या कंपन्यांचे मालक नि नटवर्गासहित सर्व मंडळी हजर होतीच. तेवढयात नारायणराव बालगंधर्व आले. त्यांना अश्रू आवरत नव्हते. गणपतरावांच्या मृतदेहाजवळ गेले. गुलाबपुष्पांचा खूप मोठा हार घातला. अंगावर भरजरी शेला पांघरला. भरल्या डोळयांनी, ओघळत्या अश्रूंनी किती तरी वेळ ते गणपतरावांकडे एकटक पहात होते. जणू मावळता नटसम्राट, आपले सम्राटपद उगवत्याला अर्पण करीत होता! नारायणरावांनी पदस्पर्श करून गणपतरावांना नमस्कार केला. कदाचित मनात म्हणाले असतील 'देवा, आशीर्वाद असो द्यावा!'

### सौभद्र गणपती!

भाऊराव कोल्हटकर आले नि सौभद्राचे पहिले तीन अंक अण्णांनी मोठ्या उत्साहात पुरे केले; पण कां कुणास कळे पुढे अचानक गाडी अडली. लिखाण पुढेच सरकेना. एक दिवस मुंबईला, एका दुकानात त्यांना काचेची सुरेख गणेशमूर्ति दिसली ती त्यांनी विकत घेऊन, चांदीच्या प्रभावळीत बसवून पूजेच्या देवांत ठेवली. देवासमोर बसूनच अण्णा लिहू लागले. काय आश्चर्य पहा; बोलबोल म्हणता त्यांच्या हातून पुढचे दोन अंक पुरे झाले! सौभद्राला पुढे अपरंपार यश लाभले, 'ती' याच गणपतीची कृपा!' असे अण्णांच्या मनाने पक्के घेतले. म्हणूनच 'सौभद्र—गणपती' म्हणून किर्लोस्कर संगीत मंडळीत त्याची नित्य पूजाअर्चा होत राहिली.



MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28




## प्रकाशित

श्याम हा मध्यमवर्गातला, मध्यम आकाराचा, मध्यम विकारांचा
मध्यम बुद्धीचा, मध्यवर्ती सरकारातला मध्यम प्रतीचा अधिकारी.
साधा तसाच बेरकी. मिस्किलपणा हा त्याचा स्थायीभाव.
राधा त्याला कधी साथ करते तर कधी विरोध.
त्यांच्या संसाराच्या या कथा.

# काही दिवस श्यामचे, काही राधाचे

लेखक : फिरोज़ रानडे

मूल्य : पंचवीस रुपये

# श्रीग्रामायन । दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली.

लेखक : श्री. ग. माजगावकर

मूल्य : पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन